संगीत

राणा जगदेव.

ऐतिहासिक नाटक.

लेखक,

किरात.

प्रकाशक,

लोकमित्रकर्ते.

खानापूर धनंजय छापखाना.

सन १९०२ इसवी.

" This story of Jag Dev's listening to truth, absence of anger, valor, firmness, exploits, wisdom, generosity will spring up abundantly. In this world, when Rows and Rânâs hear the story, their want of courage, meanness, and little-mindedness will be dispelled; they will never fall into calamity. Considering this matter, readers will peruse, poets will recite, chieftains will listen. They will receive such joy as those who dwell in the City of Immortality. Such is the tale of the illustrious Jag Dev Purmâr–the full of valor."

Râs Mâla—*Forbes.*

सूचना–या नाटकाच्या प्रयोगाचे परवानगी संबंधानें पत्रव्यवहार करणें तो–पुणें आर्यभूषण छापखान्याचे म्यानेजर यांजकडे "**किरात**" यांचे नांवें करावा.

दोन शब्द.

इतिहासग्रंथाशीं परिचय असणाऱ्या वाचकांस फॉर्ब्स साहेबांची **रासमाला** ठाऊक नसेल असें क्वचितच होईल. या ग्रंथांत शूर रजपूत लोकांच्या वीररसात्मक अशा अनेक गोष्टी ग्रथित केल्या आहेत. त्या वाचीत असतां वाचकांच्या मनोवृत्तींची उचल झाल्या शिवाय रहात नाहीं. हा रासमाला ग्रंथ वाचीत असतां त्यांतील **जगदेव परमाराची** गोष्ट आमचे वाचण्यांत आली तेव्हां त्या कथानकावर लोकांच्या नवीन संगीत नाट्याभिरुचीस अनुसरून एखादें संगीत नाटक लिहावें असें आमचे मनांत आलें. पुढें सुरत येथें आमचा एकदां मुक्काम असतां प्रसिद्ध गुजराथी **मोर्वी** नाटक-मंडळीहि सुरतेस आली व तेथें त्यांचे नाट्यप्रयोग सुरू झाले. त्यावेळीं त्यांच्या **जगदेव परमार** या नाटकाच्या प्रयोगाची जाहिरात लागली. जगदेव परमाराच्या नांवाशीं रासमालेनें आमचा अगोदरच परिचय केला असल्यामुळें व त्या कथानकावर आमच्या मनांत नाटक लिहावयाची कल्पना एकवार आली असल्यामुळें गुजराथी भाषेशीं आमचा विशेषसा परिचय नसतांहि आम्ही मोठ्या कौतुकानें तो प्रयोग पाहण्यास गेलों. व त्याचा प्रयोगहि आम्हांस अत्यंत आवडला. व पुढें पाहतों तों त्याच नाटकाचे प्रयोग तेथें इतके लोकप्रिय झाले कीं, त्या नाटकाच्या सतत महिनाभर आवृत्त्यावर आवृत्त्या जरी होत होत्या तरी देखील प्रेक्षकांची तें पाहण्या विषयीं पूर्ण तृप्ति अशी कधींच झाली नाहीं! यामुळें वरील कथानकावर नाटक लिहिण्याची जी आमची पूर्व कल्पना ती दृढतर झाली. व त्या कल्पनेलाच आज हें दृश्य स्वरूप मिळत आहे. गुर्जरदेशस्थ रंगभूमी "जगदेव परमाराच्या अवतरणानें अगदीं वेडावून जाऊन रंगून गेली होती! आता तोच जगदेव परमार—**राणा जगदेव** या नामाभिधानानें महाराष्ट्र देशस्थ रंगभूमीच्या आदरास कितपत पात्र होतो तें पाहणें आहे.

नाटकांतील पात्रें व त्यांचीं कामें.

पात्रांचीं नांवें.	अंक १ प्र. ६	अंक २ प्र. ५	अंक ३ प्र. ६	अंक ४ प्र. १	अंक ५ प्र. ९
उदयादित्य–धारचा राजा	2,3,5	...	...	...	2,8,9
जगदेव–वीरप्र.राणीचा पु.	1,2,4,5	1,2,3	1,2,3	...	3 ते 9
रणधिंह–चंपा राणीचा पु.	2	...	...	...	2,9
बीजसिंग-वीरमतीचा बंधु	...	2,4	1	...	9
सिद्ध. जैसिंग-पट्टणचा रा.	...	...	...	1	1,3ते6,9
धीरसिंह-चंपावती. बंधु.	...	...	...	...	1,3 ते 9
क्रूरसिंह, भीमसिंग-जैसिंगाचे सरदार.	...	...	...	...	1,3,4,9
मानसिंग मानदुर्गचा राजा	...	...	...	...	2,9
मानदुर्गकरांचा सेनापति.	...	...	...	...	9
सुमति-जगदेवाचा सेवक.	1,2	...	...	...	7
गिरिधर-चंपेचा खोजा.	2,3,4,5	...	...	1	9
तुळशीराम-वसंती. नोकर.	...	...	2,3,4,6	...	...
लालजी- कोतवाल पुत्र.	...	...	5,6	...	...
कोतवाल–पट्टणचा.	...	...	...	1	...
बक्षी–पट्टणचे.	...	...	...	1	1,8
सरदार वगैरे.	...	...	...	...	1,2,9
वीरप्रसु-उदया. पहि स्त्री	...	1	...	...	...
चंपावती- ,, दुसरी स्त्री.	3,5	...	...	...	2,8,9
जया,विजया-वीरप्र. मुली	...	1	...	...	...
वीरमती-जगदेवाची स्त्री.	2	2,3,5	1,2,6	1	5,6,7
वसंती-पट्टणची वेश्या.	...	...	2,4,6	1	...
वसंतीच्या मुली. २	...	...	2,6	...	...
दासी, सेवक वगैरे.	...	2,5	1,2,4,6	1	2
सगुणा–लालजीची स्त्री.	...	...	5	...	...
देवी.	...	...	...	...	5,6
जयसिंह, जगपाळ जगदेवाचे पुत्र	...	...	...	...	1,5 ते 8

संगीत

राणा जगदेव

अंक १ ला.

नांदी

पद (श्रीहरि माधव सुमती दईने. या चा०)

वंदुनि आधीं जय श्री-रमणा ।
अखिल जगाच्या भव-भय हरणा ।
कुसुमांजलि ही अर्पित चरणां ॥ धृ० ॥
रम्य पयनि-धी भुवन जयाचें ।
मृदुतर शयनहि ज्या शेषाचें ।
कमला चुरिते चरण तयाचे ॥

सकलहि सुरवर । नुरावया महा भया ॥
गदाधरा परात्परा । चित्तिं धरिति प्रेमभाव ॥
शासनार्थ दानवांस । वंदु त्या रमाधवास ॥
ऑ ऑ ऑ ऑ ऑ ॥ १ ॥

सूत्रधार०—हे रसिक समाजन हो, नव नाटक प्रयोगाच्या दर्शनानं तुह्मांला संतुष्ट करावं आणि साधल्यास त्यानं आणखीहि एक हेतु साधावा एवढ्याच करितां आज—

साकी.

‘ किरात ’ विरचित रम्य चरित तें ‘ राणा जगदेवाचें ’।
स्वामिभक्ति दृढ, पातिव्रत्यादि, अद्भुत यत्कांतेचें ॥
मंडित जें यांहीं । रसिका रमविल तें कांहीं ॥ १ ॥

असं जाणून त्याचाच प्रयोग करून दाखवावा असा मी निश्चय केला. पण हें काम माझ्या एकट्याचे हातून रेटणार कसं? आणि एवढ्याच करितां प्रियेला मी लौकर ये म्हणून सांगितलं होतं. पण छेः ती कुठली लौकर यायला? आज ती माझा अन् या साऱ्या रसिक सभाजनांचा रसभंग करणार हेंच खचित! (इतक्यांत सुत्रधाराची प्रथम स्त्री भरत नामक पुत्रासह येते व तीं दोघेंहि त्याच्या पाया पडतात) (त्यांस उचलून) वाः तुम्हीं दोघेंही घरून कशी अगदीं वेळेवर निघालांत!

दिंडी.

खचित नाहीं रसभंग व्हावयाची।
भीति आतां ती किमपि उरलि साची॥

स्त्री–खरंच बाई, आतां या पुढं इकडचा रसभंग नाहीं व्हायचा! असं करायचं म्हणून दोघांचं जर अगोदरच ठरलं होतं तर मग आपणच आम्हांला घरांतून जा म्हणून सांगायचं होतं निच्याकडून कशाला आणखी आमची ही चारचौघांत शोभा करविली?

सूत्रधार–म्हणजे काय म्हणते आहेस तरी काय तूं हें? कायरे बाळा, काय म्हणते आहे ही हें? मला तरी कांहीं नाहीं कळत याचा अर्थ! तिच्याकडून कां कांहीं तुमचा प्रमाद घडला?

भरत–छेः प्रमाद कसचा यांत? त्यात कांहीं अर्थच नाहीं मुळीं तात. आह्मीं यावेळीं जे इथं आलों तें–

पद. (कसें मन मोडुनी असुबें या चा०)

दोघे–सुसेव्यचि या पदां नमुनी । अह्मी आतां ॥
भरत–दुरी जातों असो द्यावी । कृपा ताता ॥ धृ०॥
स्त्री–दुरी जातों असो द्यावी । दया नाथा ॥ धृ० ॥
दोघे-आजवरि तो अह्मी केला । किती रसभंग ॥
स्त्री–परी आतां करा रतिरंग । प्रिया कांता ॥
भरत–परी पुढती घडो सत्सग । तुझ्मां ताता ॥ १ ॥

भर०–आई चल चल. आतां इथं एक घटकाभर देखील राहून उपयोगी नाहीं.

सूत्र०–अरे, अरे, अरे!!! तीच तीच या सग-ळ्याचं कारण! देवा त्याच वेळीं जर मी हें दुसरं लग्न केलं नसतं तर? मग कशाला आला असता हा आजचा प्रसंग? प्रिये, दुसरं लग्न करून मीच तुझ्या साऱ्या सुखांत माती कालविली, याबद्दल तूं मला क्षमा कर.

भरत–आई बघतेस काय, चल, चल लवकर!

सूत्रधार–(पुत्रास पुढें घेऊन) बाळा नकोरे, असं नको करूंस!

साकी.

पुत्रस्नेहें पाझर फुटती क्रूर पशूसहि अंतीं ।
निज पुत्रच्छळ पाहुनि पितया ये न दया कां चित्तीं ॥
मग हा तुजसम-पुत्र असा । स्वकरें लोटूं दूर कसा ॥ १ ॥

नटी०–(पुढें येऊन रागानें) अग बाई! काय पण

मोह पडतोय हा! मघांपासून सगळं मी आडून ऐकतें आहे. बघतें आहे आपली सगळा तमाशा! आपल्या हातून नसेल लोटवत तर मी लोटतें. (भरताचा हात धरून तिरस्कारयुक्त ओढून व ढोंचून) बाळा, जा हां! संभाळून-खुशाल जा बरं! वाट फुटेल तिकडे जा हां! माझा बाबा तो. (त्याचे गालगुच्छ घेत.)

भरत०—आईसाहेब, आपण नका अशी उगीच तसदी घेऊं. अशानं आपल्याला उगीच श्रम मात्र होतात.

नटी—अरे मेल्या, लागलास चुर चुर बोलायला? श्रम होतात कां श्रम! हं हं अस्सं! श्रम! (पुनः गालगुच्छ घेत.)

भरत—(सख्या आईस) आई रडतेस काय अशी? चल, या आईसाहेबांच्याकडून यापुढं आणखी जास्त शोभा करून घेण्यापेक्षां अगोदरच आपण जाऊं.

स्त्री—बाळा, आतांपर्यंत काय बाकी राहिली आहे ती पुढं व्हायची?

नटी—हो थोडी राहिली आहे तर! (तिला पदरानें धरून) ही येवढीच राहिली होती समजलं? जा बरं आईसाहेब. जा आतां बाळासाहेबा बरोबर—

स्त्री—(सूत्रधारास उद्देशून नमस्कार करून) येतें तर—

भरत०—तात, येतों तर—

[तीं जातात.]

नटी—(पडद्याचे आंत जात असतां स्वगत)

ठुंबरी. (राग झिंजोटी—पंजाबी ठेका.)

जातिल किंवा परतुनि येतिल ॥
मधुरच बोलुनि प्रिय-मन हरितील ॥ धृ० ॥

तेंचि बघाया छपुनी बसतें ॥
नातरि हेतू विफलचि होतिल ॥ ? ॥

[जाते०]

सूत्रधार—(प्रेक्षकांकडे पाहून) प्रेक्षकहो, आतां तुह्मांला निमंत्रण करण्यांत मी मोठा प्रमाद केला हेंच खरं! घटकाभर तमचं मनरंजन करावं, ह्मणूनच तुह्मांला व्यर्थ तसदी दिली मी ही. आपल्याला जो ह्मणून सांगायला मी मोठा लाचार आहे. पण असं करण्याशिवाय दुसरा इलाजच उरला नाहीं आतां! त्याला मी तरी काय करूं! पण—

पद. (रंगी सांठीं या चा०)

हे सूज्ञानों! विनती माझी।
द्वितिया लग्ना व्हा नच राजी ॥ धृ० ॥
वनिता पहिली असतां दुसरी।
वरिता, धरितां हृदयींच सुरी ॥
कीं विष-कंटक निज कंठावरि।
धरिति असा ये अनुभव सहजीं ॥ १ ॥

अहो, मी एक फसलों ह्मणून तुह्मांला सांगतों, कीं बाबानों, तुह्मीं तरी फसू नका! आणि आजच्या येण्यापासून येवढंच शिकलों असं समजा! आणि आज माझ्या ह्या कृत्या स्त्रीच्या पायांत तुमचा रसभंग झाला याची मला माफी करून तुह्मीं आलांत तसे घरोघर निघून जा, हीच माझी तुह्मांला हात जोडून विनंती आहे!

नटी०—(पुढें येऊन रागानें) यांच्या पुढें हात

नको कांहीं जोडायला, कृत्या नाहीं का? कोण? कोण कृत्या? मीच नव्हे कां ती?

सूत्र०-तूं नव्हे, ती—(प्रेक्षकांस) महाराज, जा कमे तुह्मीं, कशाला बसतां उगीच माझी आणखी जास्त शोभा बघायला? अहो—

पद. (दया करा मजवरी० या चा०)

क्षमा करा सुजन हो मज जग।
पाहुं नका मम अवमानातें॥ धृ०॥
अवमानी जरि पतिला कांता।
खचितचि कर्मगतीचा फेरा।
जगतिं हांसतिल सज्जन दुर्जन।
कोठुनि पतिला मग जगिं थारा॥ १॥

नटी-तुम्हीं नका हो उठून जाऊं.

सूत्र०-महाराज इतका वेळ हें खुद्द माझं नाटक बघितलंत हें बस्स नाहीं कां झालं? तर जा आतां घरोघर मुकाट्यान!

नटी-हां जाऊं नका. विनंती आहे ही माझी तुम्हांला—

पद (मारा भाग्य तणो नहि० या चा०)

थांबा धीर धरा तुह्मि आज। छळिलें भारी भारी भारी॥ धृ०॥ दारा धारा-नृपतीची मी! होउनि छळ करणार॥ सवती पुत्रा, जगदेवा त्या। धारेवर धरणार॥ थांबा०॥ १॥ मुठींत ठेवुनि उदयादित्या। जगदेवा छळणार। सवतीला त्या वीर प्रसूला। फिरवुनि दारोदार॥२॥ राज्यीं स्थापिन रणसिंहाला।

येजियलें हें काज। भुजंग आला जगदेवच हा। लोकां जो युवराज ॥ थांबा० ॥ ३ ॥ हां हां ह्मणतां तुकडे करितें। ठेंचुनिया तोंडांस। जगद्देवची ये, जातें तरि मी। निश्चय न ढळे खास ॥ थांबा ॥ ४ ॥

(ही प्रस्तावना झाली.)

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थळ—धारा नगरीला लागून असणाऱ्या एका खेडेगांवचा बाह्य प्रदेश.

जगदेव—(स्वगत.)

पद. (थाट माट या चा०)

व्यर्थ व्यर्थ राजवंशीं व्यर्थ जन्मलों।
सहज प्राप्य त्याहि सुखा दूर जाहलों। धृ०।
धार-नृपति तनय ह्मणुनि कोणि हांसती।
वसन जीर्ण निरखुनि जन कोणि पाहती।
वीरप्रसू-तनय ह्मणुनि कोणि निंदिती।
खचित जगतिं पूर्ण सौख्य भरुनि पावलों॥ १॥

आणि तिकडे माझ्या आईची स्थिती तर काय विलक्षण होऊन गेली आहे. माझ्यापायीं तिला किती तरी यातना सोसाव्या लागताहेत! काय माझा हा जन्म.

पद. (ये काळ कसा० या चा०)

सुत दुःखद हो जननीस जरी । जगण्यांत तयें
नच अर्थ तरी ॥ धृ ०॥ जन्मतांच मी राजल-
क्ष्मितें, अंतरली मम माय अहे ॥ तात असुनि
मज,पतिसुख नच तिज, चित्र गती किति दैव
वरी ॥ १ ॥ भाग्यवंत जरि किंचित असतों,
काय भंगतें प्रेम तरी । दुर्दैवी मी पूर्ण अभागी !
जननिमुखीं विषबिंदु परी ॥ २ ॥

छेः हें असं झालं यांत माझा तरी काय अन्याय ? तो सुमती ह्मणत होता तेंच खरं ! महाराजांनीं दुसरं लग्न केल्यामुळं हा सारा प्रकार घडून येत आहे ! मी जर जन्मलोंच नसतों तर कदाचित् ती आईशीं चांगल्या रीतीनं वागली असती ! तर केवळ माझ्यामुळं आईला ही विपत्ती अन् वरचेवर अपमान सोसावे लागत आहेत ! (कांहीं वेळ विचार करून) पण खरं पाहूं गेलं असतां ह्या सगळ्याचं कारण ती एक मायजीच आहे ! तिला आमचं एक काडीभर दिखिल बरं पाहवत नाहीं ! रणसिंह माझ्याशीं हंसून बोलत होता, अन् महाराज गेल्यावर दरबारांतील मंडळी कित्येक बाबतींत माझा सल्ला घेत होती हें तिला बघवलं नाहीं, ह्मणून नुसता राजवाडाच नव्हे पण राजधानी सुद्धां मला वर्ज झाली ! महाराजांनीं आमची विपन्नावस्था पाहून आह्मांला नेमणूक करून दिली होती ! पण ती देखील धार सोडून महाराजांनां दोन दिवस झाले असतील नसतील तोंच बंद झाली. एकदरींत मायजींचा आमच्यावर फार लोभ ! पण मायजींची ही सारी कृती

महाराजांच्या कानावर जात असेल कां? छे: ही कशी जावी! मायजींच्या विरुद्ध महाराजांच्या पुढं एक अवाक्षर काढायची तरी कोणाची प्राज्ञा आहे? आणि घटकाभर असं समजलं कीं महाराजांनां सारं कळतं तरी पण मायजींच्या इच्छेविरुद्ध महाराजांच्या हातून जाववेल कसं! विजयी होऊन महाराजांनां येऊन आज दोन दिवस झाले. राजनगरी गुढ्या तोरणांनीं अगदीं फुलून गेली आहे. दरबार होऊन मोठमोठ्या वीरांना अन् समशेरबहाद्दरांनां कुणाला समशेरी, कुणाला कट्यारी, कुणाला पोषाख वगैरे दिल्याचं सुमतांच्या तोंडून ऐकतों, पण महाराजांनां आमची एका गोष्टीनं तरी आठवण होते आहे काय! अथवा उघडच आहे ती कां व्हावी! या जगांत—

पद. (मज गमे ऐसा. या चा०)

नच स्मरे कोणी अधनिका । लोकरीती ॥ धृ० ॥
तात सुतांत, सुत तातातें। नोळखती जगिं निर्धन
जरि ते । उत्सवांत मग दंग जधीं ते, व्हावि कशी
मग स्मृति त्या धनिकां ॥१॥ त्यांतुनि नृपमन मत्सर-
युत तें। सपत्न-जननी करुनि टाकिते। प्रेम नुरे।
मग कोठुनि स्मृति ते। दृष्टि होउं मम हर्म्य-विन्मुखा।२

(इतक्यांत सुमति येतो)

सुमति०–(हलकेच येऊन) महाराज, असं कां म्हणतां उगीच? थोरल्या महाराजांचं मन अगदीं निर्धूत स्वच्छ आहे. आपल्या संबंधानं तिथं काळं बेरं कांहीं नाहीं. महाराजांचं आपल्यावर किती प्रेम! मानदुर्गाहून

विजयी होऊन आल्यापासून त्यांनीं आपली कांहीं नाहीं तरी एक शंभर वेळ तरी आठवण काढली असेल.

जगदेव०–काय? महाराजांनीं माझी शंभर वेळ आठवण काढली! मग मला बोलाऊन न्यायला कुठं हत्ती अंबारी नाहीं आली अजून?

सुमति०–पण तुम्ही होतां कुठं अगोदर?

जग०–ह्मणजे?

सुम०–ह्मणजे काय? आपण आपल्या सासऱ्याकडे गेला होता नां, बाईसाहेबांच्या बरोबर?

जग०–काय? ह्मणतोस काय तूं हें?

सुम०–महाराज? मी आपल्या पदरचं कां कांहीं म्हणतो आहे हें!

जग०– तर—

सुम०–महाराजांनीं इथं आल्यावर आपली पहिल्यांदा चांगली एक दहा पंधरा वेळ आठवण काढली असेल, पण चोरांनीं कांहीं दाद लागू दिली असेल तर ना! इथून तिथून सगळी मायजींच्या सांगीनं कान भरलीं कत्री! आपण आपल्या सासऱ्याकडे वीरतोड्याला गेल्याचं सर्व सांगत!

जग०–मग मी इथं असल्याचं सांगून त्यांची तूं चांगली फजीती कां नांहीं केलीस?

सुम०–तसं मी मुद्दामच नाहीं केलं–कारण तशानं मायजींच्या कडचं कारस्थान कळायला मग मार्गच उरला नसता.

जग०–तेंहि खरंच ह्मणा–बरं पण पुढं काय झालं?

सुम०—पुढं! पुढं काय? महाराजांच्या जवळ कुणी नाहीं असं पाहून मी महाराजांच्या जवळ गेलों. अन् महाराजांना आपण इथं असल्याचं सांगणार, इतक्यांत महाराजांनीं आपण होऊनच मला विचारलं कीं "तुझे मोठे महाराज कधीं येणार आपल्या सासऱ्यांच्या कडून?"

जग०—हं? मग तूं काय दिलंस उत्तर?

सुम०—मी म्हटलं ते गेले आहेत कधीं अगोदर ते परत यायचे! त्या बरोबर महाराजांनाही आश्चर्य वाटल्या-सारखं दिसलं व त्यांच्या तोंडून "काय तर मग मला प्रियेनं हे सारं खोटंच सांगितलंन" असे शब्द त्या वेळीं बाहेर पडले! अन् त्यावरून मग मी सारं ताडलं, कीं हें आपल्या मायजींचच काम असावं!

जग०—शाबास! धन्य आहे एकून मायजींची!

पद (तव मुख निरखुनी या चा०)

सकलहि विजननी खरतर कृतांत।
तिजहुनि विषयुत भुजगहि प्रशांत॥ धृ०॥
फुसफुस करुनी करितिल दंशा।
होतिल कारण निज निर्वंशा।
परि नच त्यजितिल कधिही द्वेषा।
करितिल कुलांत॥ १॥

बरं पण तूं असं उत्तर दिल्यावर मग महाराज काय ह्मणाले?

सुम०—कांहीं वेळ स्तब्ध राहून मग महाराजांनीं मला "काय तर मग तो इथंच आहे" असं विचारलं! मी "होय इथंच आहेत" असं म्हटल्यावर त्यांनीं आपल्याला

तिथवर घेऊन येण्या करितां मला इकडं पाठिवलं. आणखी वीरमतीला पहायला बोलावण्या करितां ह्मणून त्याच वेळीं वाड्यांतल्या खासगीकडच्या दासी अन् मेणा पाठवून दिला आहे कदाचित् मेणा आलाही असेल इतक्यांत

जग०–तर मग तू मला बोलवायला आलास एकून !

सुम०–हो, मला सांगायला सांगितलय कीं जसा असशील तसा ये ह्मणावं.

जग०–चल तर आईचा निरोप घेऊन जाऊं.

साकी.

कृष्ण घनांनीं अदृश्याचि जरि केलें शशिकांतीतें ॥
शशिकांती ती स्पष्टचि होई जातां घन विलयातें ॥
तेंविच ताताची । प्रीती स्पष्टचि ही साची ॥

तर चल, त्यांच्याच आज्ञप्रमाणं असेच जाऊं त्यानां प्रणाम करायला. [जातात.]

प्रवेश २ रा.

स्थळ–राजमंदिर (उदयादित्य व रणसिंह बसले आहेत.)

उदया०–काय ह्मटलंस, रणसिंह ! जगदेवाशीं बोलूं नको ह्मणून तुला कुणी सांगितलंन ?

रण०– मायजीनं तात. आणखी तो वीरतोड्याला गेला ह्मणून सांगयला दिखील तिनंच सांगितलंन.

उदया०–काय ? एकून तुला दिखील हें ठाऊक आहे तर !

गिरिधर–(आपल्याशीं) काय करावं या पिसा-

टाला ! माईसाहेबांचं सगळं कारस्थान प्रत्यक्ष त्यांचे चिरंजीवच फोडतात याला काय करावं ! (सुमति व जगदेव येतो त्यांस पाहून) बरा वेळेवर आला हा जगदेव !

सुमति—छोटे महाराज, अन् त्यांचं कुटुंब अशीं दोघेंही आलीं आहेत सरकार—

उदया०—(जगदेव वंदन करीत असतां त्यास उठवून आपल्या उराशीं घट्ट धरून)

पद. (पाहिन सिंहासनीं० या चा०)

जनक हृदंतरीं मोद किती तरि देखुनि तनया होतसे।
धृ० ॥ पुत्रसुखा आजि पूर्णतेनें पावतसे हें वाटतें ।
चित्तवृत्ति मम सहजानंदीं मग्नचि होउनि जातसे ॥
आजवरी जें नच अनुभविलें, ऐसें हें सुख भासतें ।
यांस पाहतां कंठ दाटतो अश्रुहि येती फारसे ॥ १ ॥

उदया०—(वीरमती नमस्कार करते तिला उठवून) मुली तुझं नांव काय ? सांग, लाजूं नकोस.

वीरम०—(हलकेंच) वीरमती.

उदया०—जगदेव, काय ह्मणाली ही ? नीटसं ऐकूं नाहीं आलं मला ! (जगदेव लाजतो.)

रणसिंह०—वीरमती ह्मणे—(सर्व हंसतात.)

उदया०—मी आल्याला दोन दिवस झाले, आणि तूं आज आलास ?

जगदेव०—मानदुर्गाहून महाराजांची स्वारी आल्याचं ऐकल्याबरोबरच येणार होतों. पण राजधानीच्या शिवेच्या आंत येण्याची परवानगी कुठे होती मला ?

गिरिधर०–(एकीकडे) केलीन् यानं कावेबाजीला सुरवात केलीन.

उदया०–अरे, इथून जातांना तुला तर मी इथं मोती-बागेंत येऊन रहा ह्मणून सांगितलं होतं.

जग०–होय, पण इथली हवा चांगली नसल्यामुळं मला मायजींनीं आईकडेसच राह्याला सांगितलं. तेंव्हां इतकं प्रेमानीं सांगितल्यावर त्यांची आज्ञाहि मोडवेना मग मला ! (डोळ्यांत अश्रू येतात.)

उदया०–जगदेव, नको असं नको बोलूंस, कारण बायकांची बुद्धी क्षुद्र असते तिकडे नाहीं नजर देऊन उपयोग.

पद. (शुद्ध बीज तें० या चा०)

क्षुद्र बुद्धि ती धरी स्वभावताच अंगना ।
त्याज्य दुष्ट नारि-वचन हेंच युक्त सज्जना ॥
जग०–"मातृवचन भंग करिल तनय त्यास निंद्यता ।
जगांत खास ये," असें तुह्मिच मजशिं बोधिता ॥

उद०–अरे, असं जरी असलं तरी युक्त काय आणि अयुक्त काय हें पाहिलंच पाहिजे मनुष्यानें ! (जगदेवाचा भिकार पोषाख पाहून) जगदेवा, तुला नेमणूक करून दिली असतां अजून देखील हीं भिकार वस्त्रं कां धारण केलीं आहेस तूं ? आणि हिच्या अंगावरहि बेताबाताचेच अलंकार !

जगदे०–

पद. (किती कोमल तर तनु० या चा०)

किति प्रेमल मन करुनि अहा मजशिं वागवी ।
मातृप्रेम तेंहि तयें तुच्छ भासवी ॥ धृ० ॥

तनु माझी कोमल ही । पाहुनि तिस प्रेम येई ।
तेंच भूषणां मदीय आजि काढवी । किति० ॥१॥
रत्नखचित अवतंसें । ये तनुतें जी जडता ।
अव जडता तीच काय माय काढवी । किति० ।२।
वीट, चेट, चोर, तसे शठ, अनेक घातुकसे ।
मजशि मारितील म्हणुनि सकल काढवी । किति. ।३

जडजड वस्त्रं आणि अलंकार घालून माझी कुठंतरी प्रकृती बिघडेल म्हणून मायजींनीं ही खबरदारी ठेविली !

उद०-बाळा, असं नको म्हणूंस !

रण०-मग त्यानं काय खोटं बोलावं तर? (आपला शेला काढून त्याचे अंगावर घालतो) हा घेतूं, मी दुसरा घेईन.

जग०-नको बाबा, तझा नको आणखी ! तिकडं मायजींच्या प्रेमाला आणखी जास्त भरतं येईल !

उद०-रणसिंह, ठेव तो शेला. मी माझा पोषाख देतों याला. (उदयादित्य आपला पोषाख काढतो व रणसिंह तो जगदेवास घालतो.) (दासीस) सगुणे, जा आणि वीरमतीला हळद-कुंकवा दाखल जामदारखान्यांतून जवाहिर आणि वस्त्रालंकार आणून ठेवले आहेत, तेवढे घाल जा तिच्या अंगावर.

गिरिधर-(एकांकडे) आतांच्या आतां हें सारं माईसाहेबांनां जाऊन सांगितलं पाहिजे. महाराजांनां खचित वेड लागलं अन् दुसरं काय? पण रणसिंहानं जगदेवाला आपल्या हातानं पोषाख घातल्याच ऐकून माईसाहेबांनां फार खेद होईल. या वेडगळाला एवढं कळूं नये म्हणजे काय ?

जग०-(उदयादित्य आपले अलंकार व वस्त्रं जगदेवावर चढ-

वीत आहे. आपला कंबरपट्टा त्यास घालून कट्यार व समशेर खेचीत असतां) तात. हें आपल्या अंगावरचं काढून माझ्या अंगावर नको घालायला–

उदया–थांब, थांबरे–

पद. (गुरुदत्त निरंजन. या चा.)

मज भूषवुं दे तव काय। हर्ष हा मनीं नच
माय ॥ धृ० ॥ वीरवेष तव पाहुनि शत्रुहि स्व-
मनीं होतिल गुंग । समरकर्म ते विसरुनि
टकमक बघतिल होउनि दंग। पाहुनि ऐशा
सुंदर वेषा खचितचि होइल दृष्ट ॥

जग०–ह्मणुनिच ह्मणतों व्यर्थ कशाला ताता घेता कष्ट। (अलंकार काढूं लागतो) ताता, खरंच मला दृष्ट होईल ह्मणूनच काढतों हे.

उद०–वेडा नाहींतर. जगदेवा असं काय करतोस! मला पाहूंदे तरी तुला नीट डोळा भरून (एकीकडे) ह्याच्याकडे किती पाहिलं तरी पुरेसं होतच नाहीं!

जग०–(कांहीं वेळ थांबून) झालं ना पाहून! मला हें इतक झेंपायचं नाहीं–(काढूं लागतो)

गिरि०–(एकीकडे) झेंपायचं नाहीं! चोरा, पचायचं नाहीं ह्मण! महाराजांच्या कितीतरी पोटांत शिरतोय हा!

उद०–जगदेव, शपथ आहे तुला माझ्या गळ्याची हें काढशील तर–(त्याला छातीशीं घट्ट धरून) जगदेव, रणसिंहाहून तुंझ्यावर प्रेम माझं जास्त ओढ घेतं!

जग०—असं झालं तर मात्र याला माझा निरुपाय आहे.

गिरि०—(रणसिंहास) पाहिलंत महाराज, आतां घ्या आपल्याला शेले आणि तरवारी—

रण०—चलरे, मूर्ख नाहीं तर. हा पहा मी आपला मंदील घालतों त्याच्या डोक्यावर (घालून) खरंच बाबा, जगदेवाला या वेशांत पाहून—

पद. (मधुरवें मम. या चा०)

" चित्रवर्म "-कृति मजला देते आज स्मृती ।
वीर धनुर्धर अर्जुन जैसा। चित्रिं रेखिला दिसतो तैसा।

उद०—खरेंच कीं साम्य असे या दोहोंत किती । १ ।

जग०—

पद (जन्म का वृथा दिला. या चा०)

कृती जरी मुळीं नसे । साम्य तें वृथा असे ॥ धृ० ॥
वीर पार्थ विजय काय ! । शत्रु रडवि धाय धाय ॥
व्यर्थ वीर वेषिं नटुनि । शौर्य काय येतसे ? ॥ १ ॥
बाह्य भूषणांत कांय । अर्थ, जारि न प्राप्य विजय ।
हेंचि बोधिलें परी । वदतसां अजी कसें ॥ २ ॥

आणखी शिवाय हे अलंकार नेहेमीं टिकणारे नव्हेत. आतां आहेत, घटकेनं नाहींत. ह्मणून ह्मणतों तात, तेवढी शपथ मात्र घालूं नये.

गिरि०—(एकीकडे) घटकेनं नाहींत कां चोरा ? घटका तरी कशाला पाहिजे ?

उदया०—जगदेव, तुझ्या सारख्या वीरपुत्राला हें भाषण उचितच आहे पण हे तुला आतां काढतांच

नाहीं यायचे. आतां आहेत घटकेनं नाहींत असं कां म्हणतोस? या पुढें नाहीं असं व्हायचं, समजलास?

जग०—नाहीं, पण तात, माझ्या करितां या बद्दल पुढं मागं तातांच्या जिवाला मात्र व्यर्थ त्रास व्हायचा म्हणून म्हणतों कीं तातानीं मला व्यर्थ आग्रह करूं नये.

उद्या०—अरे पुढचा मागचा सगळा विचार करून देत आहे मी हे तुला समजलास? हे अलंकार अन् या वस्तू माझ्या स्वतःच्या आहेत. त्या मी वाटेल त्याला वाटेल तेव्हां देईन.

गिरि०—वाः चांगलं चाललयं एकून. तो राजमुकुट सुद्धां घाला त्याच्या डोक्यावर!

जग०—असं म्हटल्यावर मात्र माझा नाइलाज आहे! पण या पुढं खद्द तातानीं जरी यांतील एखादी वस्तू मागितली तरी देखील ती मी परत करणार नाहीं. हें असं होत असलं, अन् अशा बद्दलच अभिवचन मिळेल तरच मी हे अंगावर ठेवणार!

उद्या०—हो. हो. यांत एक काडीभर देखील तफावत पडणार नाहीं. मग तर झालं ना?

जग०-असं आहे तर मला अगोदर आईला नमस्कार करून आलं पाहिजे?

उद०—तें कां? त्याची कसली आली आहे घाई इतक्यांत?

जग०—घाई नाहीं; पण तसा माझा पहिल्या पासूनच निश्चय होता, कीं महाराजांकडून शत्रूवर चालून जाण्याचा निरोप मिळाला कीं पहिल्यानं तिला प्रणाम करायचा!

उद०—मग तुला कुणी दिला असा निरोप?

जग०–कोणी ह्मणजे ? खुद्द तातांनींच ! महाराजांनीं खुद्द आपण होऊन ही कट्यार आणि ही समशेर मला दिली ना? या पुढं तातांना नाहीं जावं लागणार शत्रूशीं झुंजायला. एक तातांच्या कीं एक परमेश्वराच्या आशीर्वादानं या पुण्यवान कट्यारीच्या अन् समशेरीच्या जोरावर शत्रूंना मी पादाक्रांत करून येईन !

उद०–रजपुतांच्या छाव्यांनीं ही अशी ईर्षा आणि हिंमत धरणं हेंच त्यांना शोभतं !

जग०–येऊं तर ? (वंदन करितो.)

वीर०–(येऊन वंदन करिते.)

उद०–पुत्रवती भव. तर मग तुह्मीं दोघेही एकदमच जाणार एकून ? ठीक आहे. या. पण जगदेव तूं कसा जाणार ? चालतच कीं काय ? वेडा नाहीं तर. (सेवक.स) अरे, मी मोतीबागेकडं जाणार ह्मणून विजयशेखर तयार ठेवायला सांगितला होता, आहे कीं नाहीं तो तयार ?

सेवक–राजवाड्याच्या पटांगणांत तयार आहे तो.

उद०– जगदेव, ह्या घोड्यानं परवाच्या झुंझांत माझे प्राण तीनदां बचावले आहेत. असा इमानी प्राणी मिळणार नाहीं. तो मी तुला मोठ्या आनंदानं देतां. मोठा यशस्वी प्राणी आहे. त्याला अपजय कसा तो हा वेळपर्यंत ठाऊक नाहीं.

गिरि०–(स्वगत) गादी तरी कशाला ठेवता, तीहि टाका देऊन. आतां इथं राहून नाहीं उपयोग ! अगोदर माईसाहेबांच्याकडं जाऊन त्यांना ही इथली सगळी बातमी दिली पाहिजे. चला रणसिंहजी, माईसाहेबाकडं जाऊं.

[रणसिंहास घेऊन जातो.]

जग०—असं आहे तर त्याला मी आपल्या जिवापेक्षां प्यार मानून जपेन. (वंदन करून) येतों तर तात.

(जाऊं लागतो.)

उद०—ये. (सुमतीस) अरे सुमती, मोतीबागेंत राहण्याची सगळी व्यवस्था झाली आहे कीं नाहीं ? नसली तर तूं पहा तिकडील सगळी व्यवस्था समजलं ? चुकूं नको. मी उदईक तिकडं येईन (स्वगत.)आतां प्रियेच्या मंदिरांत जावं. [जातो.]

जग०—(जात असतां)

पद. (ईश चिंता निवारील या चा०)

काल येई सुखाचा कधीं तो ।
वाट अशि आदरें प्राणि तो पाहतो ॥ धृ० ॥
काल इच्छित असा येत जेव्हां ।
विस्मृती पूर्विची पडुनि तेव्हां ।
जन सुखा अभिनवा वांच्छितो हा ।
मानवा मोह तो ना कधीं सोडतो ॥ १ ॥
तात देती मला दिव्य वस्त्रें ।
योग्य शूरां अशीं तक्ष्ण अस्त्रें ।
भूषणें, अश्व, तशि अतुल शस्त्रें ।
वाटतें मन्मनीं स्वर्गि कीं लाभतों ॥ २ ॥

प्रवेश ३ रा.

स्थळ—चंपावतीचा महाल. (गिरिधर व चंपावती

गिरि०—(कुजबुजल्या सारखें करून) हं महाराज येत आहेत वाटतं, मी जातों तर. मात्र ठरल्याप्रमाणें. हां. संभाळा,

नाहीं तर आतां यावेळीं जर कां पोकळ सोडलंत कीं पुढं जड गेलंच ह्मणून समजा.

चंपा०—काय?

पद. (चामराच्या चालीवर)

एकवार वचन देति तेहि काय मोडिती ।
पूर्ण वचनभंग करुनि पाप काय जोडिती ।
सुरा धरुनि चरचरा कंठ कां न कांपती ।
प्राण चरणिं अर्पितें नाथ जरि न ऐकती ॥ १ ॥

(राजा येतो असें पाहून मंचकावर अगदीं खिन्नमुख होऊन बसते व मधून मधून अलंकार काढून दूर फेंकते.)

(उदयादित्य प्रवेश करतो)

उदया०—

पद (बहुनीप तरू० या चा०)

अशि खिन्नवदन करुनि बसलि कां नकळे आज सुंदरी । जलदाकुल वदनचंद्र उदित मंदिरीं । कांतिहीन चंद्र-कला पसरली खरी । अवलोकित अचल नयन करुनि भूवरी । पूर्ण विकल हृदय दिसत; कष्टि अंतरीं । ही मधुन मधुन फेंकितसे आभरणें सारीं ॥ १ ॥

(पुढें जाऊन)

पद. (ही मुरली गुंगवी. या चा०)

वद मजशीं सुंदरी । ही मधुकरि कणितरि खंडिलि नव-यौवन-मंजिरी ॥ धृ० ॥ वदन कमल हें; प्रफुल्ल करुनी; गंध भरी मंदिरीं । सवेग ।

खचित दंडितों, तव अपराधि, सांग सखे सत्वरी। कवणतो॥ इंदुमुखी तव मौन असें हें घावरवी अंतरीं। मजला। नत तव चरणीं, प्रियकर बघ हा, रोष हरी लौकरी। अवघा॥ १॥

चंपावती–(त्यास दूर करून)

पद (दासि ऐशें. या चा.)

प्रेम नसुनि मजवरती काय उगी मनधरणी।
कपट सर्व कळत मशीं मुळिं नव्हतें ध्यानिं मनीं। धृ.।
लोभ वरति दावुनियां मान चिरिलि चरचरुनी।
मजशि राज्य सौख्य पुरे जातें मी घोर बना॥ १॥

[ती जाऊं लागते.]

उदया०–(तिच्या हातास धरून) प्रिये–

चंपावती–हें मला काय म्हणून म्हणायचं? अशी हांक मारून घ्यायला ती वीरप्रभु आहे कीं. मी कोण?

उदया०–प्रिये–

पद. (उद्यां बघ जाते. या चा०)

प्रिये प्रियकांतीं। युक्त कां रोष हा सुदती॥ धृ०॥ मधुकर गुंगत येतां नलिनी। रुचिर वदन जरि टाकी मिटुनी। विरहें प्रियकर जाई झुरुनी। तशी ही रीती। निपजवी अंतरीं भीती॥ १॥

चंपावती–किती व(?)कांतीं। प्रेम हें; कपट परि अंतीं॥ धृ०॥

उद्या०--प्रिये, प्रिय-कांतीं । रोष हा युक्त नच सुदती ॥ धृ० ॥ तुजविण प्रिय मज कोणिहि नसतां । हा तव वचनीं सादर असतां । सांग सखे कां होशी कुपिता । अशी ही रीती । अंतरीं निपजवी भीती ॥

चंपाव०--पुरे वर कांतीं । प्रेम हें; कपट परि अंतीं ॥ धृ० ॥ सौख्य न आतां मज नृप-सदनीं । स्मशान गमतें हें मज नयनीं । जाइन रणसिंहा सह विपिनीं । सुखें रसवंती ॥ वीरसू चरण घ्या हातीं ॥

(जाऊं लागते)

उद्या०--(तिचा हात धरूं लागतो.) सुंदरी--

चंपावती०--(त्याचा हात दूर करून)

पुरे वरकांतीं ॥ प्रेम हें; कपट परि अंतीं ॥

उद्या०--(विनम्र होऊन) प्रिये, नाहीं पण माझ्याकडून असं वर्तन तरी काय झालंय?

चंपा०--" वर्तन काय झालंय? " अग बाई ह्मणजे? जसं कांहीं त्या गांवचंच नाहीं--

उद्या०--तरी पण--

चंपा०--तरी पण नाहीं अन् कांहीं नाहीं?

उद्या०--मग ही अशी रागावलीस कां?

चंपा०--(आपल्याशीं) हं आतां असंच केलं पाहिजे. (उघड) रागावले आहे कां मी; छे; कुठं रागावले आहे

मी ? आपल्याला आपलं वाटतं झालं तसं, इतकंच. पण आज हा असा निर्धूत दिगंबर वेष कां ?

उदया०–(स्वगत) हं: जगदेवाला मी आपले सारे वस्त्रालंकार दिल्याचं हिला कळलं वाटतं सारं अन् ह्मणून ही हें असं ह्मणत आहे; बरं असो, आतां हिला असंच उत्तर दिलं पाहिजे. (उघड) आपण वनवासाला जायची तयारी केल्याचं ऐकलं ह्मणून मीहि हा असा वेष घेऊन आलों !

चंपा०-(क्रोधानें) अस्सं अस्सं ! मग हीं वस्त्रं तरी कशाला हवीं होतीं अंगावर ? राख फांसून वल्कलं धारण केलीं असतीं ह्मणजे बरं झालं असतं ! आतां इथं एक घटकाभर देखील नाहीं पुरवायचं मला राहयाला ! (इतक्यांत रणसिंह येतो त्यास हातानें धरून) बाळा चल बाबा, तूं तरी चल माझ्या बरोबर; आतां इथं राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं–

उदया०–प्रिये वेडी तर नाहींस तूं ?

चंपा०–हो हो ! वेडच लागलंय मला ! अन् ह्मणूनच तर मी जातें ना इथून निघून ?

उदया०–(तिचा हात धरतो.

चंपा०–(हात सोडविण्याचा प्रयत्न करिते.) सोडा सोडा, वेडी आहें मी !

पद (रामकरी जरि. या चा०)

जाऊंदे मज वनवासाला ।
धरित असा कां कर, वसनाला ॥
नेउनि मंदिरीं वीर-प्रसूला ।
राज्य हि द्या तिजशीं ॥ १ ॥

रणसिंहा सह जाउनि विपिनीं ।
टाकिन या वनराजा करुनी ॥
व्याघ्र-मुखीं निज कंठा अर्पुनी ।
राज्य करूं तेथें ॥ २ ॥

त्या जगदेवाला तुह्मी राज-कट्यार अन् आपलीं सर्व भूषणं वगैरे दिलींच आहेत तर आतां—

राज-वेष हा किरीट देउनी ।
जगदेवातें राज्यीं स्थापुनी ॥
वल्कल-वस्त्रें धारण करुनी ।
जोगच कां घ्यानां ? ॥ ३ ॥

उदया०—प्रिये, जगदेवाला मी आपले अलंकार दिले ह्मणून का हा इतका राग ?

चंपा०—(टोंचून.) छेः राग कसचा ! —पण माझ्या छबड्या रणसिंहाला आजपर्यंत कधीं आपल्या अंगावरचं कांहीं काढून दिल्याचं आठवतंय का इकडं ?

उदया०—पण असं प्रयोजनच नाहीं कधीं पडलं. प्रिये, त्याला जेव्हां आज अगदीं उघडा पाहिला तेव्हां माझ्या हातून राहवेनाच हें त्याला देवविल्या शिवाय—

चंपा०-ह्मणजे ? तर मग तो अगदीं उघडा बोडला आला होता तर ! एकून शर्थ आहे बाई मनुष्याची !

उदया०—मग त्याच्या अंगावर धडधाकड वस्त्र सुद्धां नव्हतं, आणखी काय सांगूं तुला—

चंपा०—(स्वगत मुद्दाम.) अगबाई, छेः ही सगळी त्या वीरमूचीच पढवणी, एरवीं जगदेवाला कुठली आली आहे इतकी अक्कल ! लग्नाच्या वेळीं रणसिंहाच्या बरोबरीनं

त्याच्या अंगावर जवाहिर पसरलं होतं, अन् आतां अगदीं उघडा आलानां? कोण तरी बाई पण ही नागिवण्याची तऱ्हा! आपलं भोळं माणूस पाहिलं कीं त्याला हवं त्यानीं हवं तसं लुबाडावं!

उदया०—काय, ह्मणते आहेस काय तूं हें?

चंपा०—नाहीं ह्मटलं खरोखरीच अगदीं दुबळीं दीन आहेत तीं! त्यांना हें एवढं राज्य टाकावं देऊन-ह्मणजे त्यांच्या वरचीं आलेलीं हीं संकटं तरी निवारण होतील!

उदया०—प्रिये, तूं काय ह्मणालीस तें सगळं ऐकलं मी; पण असं जर असेल तर मग ह्मणायची मोठी चूकच केली मी!

चंपा०—चूक! छेः यांत कसली आलीय चूक! त्या जगदेवाला गादीची कट्यार दिलीत तेव्हांच त्याच्याकडे युवराजपद गेलं. आतां रणसिंहानं अन् मी अरण्यांत जाऊनच राज्य करायचं! बर तर—येते मी. (जाऊं लागते.)

उदया०—छेः प्रिये, हें असं नाहीं उपयोगी! अग नुसती कट्यार दिली ह्मणजे सगळं राज्य दिलं असं कां होतं कुठं?

चंपा०—पण गादीची कट्यार ना ती!

उदया०—ह्मणून काय झालं? त्या कट्यारींत काय आहे! माझं सगळं प्रेम तुझ्यावर असतां रणसिंहाला सोडून त्या जगदेवाला कां मी राज्यावर बसवीन? वेडी नाहीं तर—

चंपा०—खचीत नाहींना पण? वचन द्यायचं तर मग—

उद०—वचन! वचन कशाला पाहिजे याला—

चंपा०-त्याला जर राज्यावर नाहीं बशिवणार तर वचन द्यायला तरी काय हरकत आहे?

उदया०-चल हें घे वचन.

चंपा०-बस्स आतां नाहीं हरकत! अगोदर हे पहा आतां एकच सांगते, तीन दिवसाचे आंत जगदेवाला दिलेलीं सारीं राजभूषणं, सारे अलंकार, तीं विजयी वीरवस्त्रं, ती गादीची समशेर, अन् ती कट्यार, इथं परत आलीं पाहिजेत- कारण युवराजा शिवाय त्यांवर दुसऱ्या कुणाचा हक्क नाहीं-

उद०-प्रिये, पण एकदां दिलेल्या वस्तू परत मागून आपला शब्द परत घेणं यासारखी मनुष्याला नामुष्कीची आणि दुर्लौकिक करणारी अशी दुसरी गोष्ट नाहीं. तर एकवेळ क्षमा कर. मला वचन नको परत घ्यायला लावूंस!

चंपा०-पण मला दिलेल्या वचनाची आहे कां आठवण? मला विचारल्याशिवाय कांहीं करायचं नव्हतंनां? अन् मग हें काय केलं बरं? आमच्याजवळ मात्र वचनं मोडलेली चालतात वाटतं?

उद०-(स्वगत) अरे अरे! हिनं मला बरोब्बर पकडलंन. (प्रकाश) प्रिये, तुम्हांला दिलेलं वचन एखाद वेळ मोडल्यास दुर्लौकिक नाहीं व्हायचा! पण दुसऱ्याला दिलेलं वचन मोडल्या बरोबर सगळ्या जगभर एका घटकेंत दुर्लौकिक व्हावयाचा! तर जगदेवाला दिलेल्या वस्तू मला परत मागायला नको सांगूस-रणसिंहाला त्यात्यापेक्षां सवाई करून देतो मग तर झालं कीं नाहीं?

चंपा०-छेः तें कांहीं नाहीं चालायचं-

उद०-खरंच, घरचीच मंडळी अन्न घ्यायला बसली

ह्मणजे मग तिथं काय करायचं ! छेः परमेश्वरा, मला या राजवंशांत कशाला घातलस तूं जन्माला ? इथं जन्माला येऊन जर सुख नाहीं तर मग तें सुख असणार तरी कुठं ?

चंपा०-इतकं नको कांहीं निराश व्हायला, मी कांहीं त्याला दिलेलं सगळं नाहीं परत आणायला सांगत. ती तेवढी गादीची कट्यार अन् समशेर तरी परत आणिवणं होईल कां ? छेः ते कसं होईल बाई इकडून ! हे पहा इतकं विचारांत पडण्याचं नाहीं कांहीं कारण; ही पहा मी चाललें आतां माझ्या छबकड्याला घेऊन. आपण त्या जगदेवाला आणि वीरमूला घेऊन खुशाल राज्य करावं. (स्वगत) अग अवदसे चंपे ! मालव वंशांतल्या एका सुद्धां राजानं आजपर्यंत आपलं वचन भंग होऊं दिलं नाहींन, अन् चांडाळणी तूं आज इकडं वचनभंग करायला लावते आहेस त्या अर्थी धिःकार असो तुला !

पद. (दासि ऐसें० या चा.)

एकवार वचन देति; तेंहि काय मोडविशी ।
वचन-भंग करवुनिया स्वकुल नरकिं लोटविशी । ध्रु० ।

तर वचनभंगासारखं घोर पातक करवणाऱ्या अशा ह्या चांडाळणीला ठेवली कशाला--

सुरा धरुनि चरचरा कंठनाळ कापुनियां ।
जगभर ती कीर्ति करा स्वकिय वचन पाळुनियां ॥
हेंच विनवि दासि पदीं; ये न कधीं वेळ अशी ॥

(पायावर डोकं ठेवते.)

उदया०-प्रिये, ऊठ ऊठ. हें काय ? काय हे भयंकर

शब्द उच्चारतेस! मालव वंशीयाकडून स्त्रीहत्या करवूं पाहतेस? काय, नुसत्या गादीच्या कट्यारी संबंधानंचना काय ती भानगड? ठीक आहे, हें पहा—जगदेवाला कट्यार पाठवून दे ह्मणून मी आतां पत्र लिहितो अन् देतो त्या सुमतीला पाठवून त्याच्याकडं. एवढ्याच करितां जर हा सर्व राग होता तर पहिल्यांदाच मला सांगायचं होतंस तसं, ह्मणजे तुला इतके श्रम तरी नसते झाले.

चंपा०—मला नाहीं बाई, पण इकडं मात्र झाले खरं!

उदया०—प्रिये, तुझ्या एका चुंबनानं हा वनवास अजीबात नाहींसा होईल! तर—

चंपा०—कांहीं तरी ह्मणायचं झालं.

पद (पिलू दादरा.)

मीच अदय-हृदय प्रिया । नाथा व्यर्थ कोपुनिया ॥
कपट रहित सदय प्रिया; । व्यर्थ छलियलें ॥ हो ॥
कपट रहित सदय प्रिया । व्यर्थ कपटि ठरवुनिया ॥
दासि छळत ही अदया । पदरिं घ्या हिला ॥ हो ॥
प्रेम असुनि मजवरती । नयन मिटुनि अंध-कृती ॥
केलि प्रिया कुटिल रीति । पदरिं घ्या हिला ॥ हो ॥

उदया०—छेः वेडी नाहीं तर, इतकं नको कांहीं करायला.

चंपा०—तर मग पत्र लिहायचं ना अगोदर?

उदया०—होय, तेंच लिहतो तर अगोदर—

(जातात.)

प्रवेश ४ था

स्थळ–मोतीबाग.

प्रवेश–जगदेव व गिरिधर बोलत आहेत.

जगदेव०–(पत्र हातांत असलेला) कायरे गिरिधर, पण तुला तातांनीं ज्या वेळेस हें पत्र दिलं त्या वेळेस तिथं ते एकटेच होते कां मायजी हि त्यांच्या जवळ होत्या? (स्वगत) हा रामोशी हें कबूल करणार! मग झालंच. चोरच जर चोरून नेलेला माल पुरून ठेवलेलं ठिकाण सांगेल तर आणखी काय पाहिजे!

गिरिधर–(स्वगत) काय धोरणी आहे पण ही स्वारी! असं नाहीं तर–आतां यांना हीच थाप दिली पाहिजे. (प्रकाश) मायजी नव्हत्या सरकार, पण रणसिंह मात्र जवळ होते.

जगदेव–(स्वगत) तर मग मायजींनीं रणसिंहाला मुद्दाम बोलावून आणिवलं असावं नाहीं तर ती स्वारी त्या वेळीं असायची लाल–मंदिरांत! (प्रकाश) पण ते त्या वेळींरे कशाला आले होते?

गिरिधर–ते कां आले होते तें नाहीं मला ठाऊक; पण आले होते इतकं मात्र खरं!

जगदेव–बरं तू हो पुढें अन् मीच येतों आहें ह्मणून सांग–(गिरिधर जातो) (पत्र वांचून) काय "तुला दिलेलं वचन मी पुरें स्मरतों आहे. पण काय करूं? तशाच भयंकर पेचांत सांपडलो आहे, तर कृपा करून माझ्यावर जर तुझं खरं प्रेम असेल तर–तुला काल दिलेली तेवढी कट्यार परत पाठवून दे. तुला तिच्या पेक्षां

जास्त मोलाची देईन! " काय हें! तरी त्याच वेळीं मला हें दुःस्वप्न पडलं होतं! छेः हे सगळे त्या मायजींचे खेळ! एकदां दिलेलं परत! शिव शिव! एखादा भिकारी सुद्धां नाहीं मागणार कीं तें! तर आतां:-

पद. (होतो द्वारका भुवनी या. चा०)

जातों प्रथम नृप-सदनीं। पाहतों नृपा नयनीं ॥
कसा बघतों ढळत वचनीं। काय देत नृप शील सोडुनी ॥ धृ० ॥ मी जाउनि बघुनी नृप-मन मग देउनि ही असि। नृप-करिं, वरि सकलहि मंडन वसन हि अर्पुनि, ठेविन शिर नृप-चरणीं। मग विपिनीं ॥ जातों० ॥

(जातो.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—राजमंदिर.

प्रवेश—(उदयादित्य व चंपावती बसलीं आहेत.)

चंपा—कायरे गिरिधर, कट्यार कुठं आहे ती? सांग-काम्या मेला! तुला कशाला पाठिवलं होतं मग!

गिरिधर—छोटे महाराज ह्मणाले—" तूं हो पुढें हा मी आलोंच " असं सांगितल्या वरच मग मी निघालों तिथून—

चंपा०—मला वाटलं होतं तुला कांहीं अक्कल असेल, पण जसा गेलास तसा हात हालवीत आलास.

उदया०—अगं त्याच्या कडे काय आहे अपराध!

जगदेव आपण होऊन जर येतो आहे तर मग तो ह्या-च्या जवळ काय ह्मणून देईल कट्यार—

चंपा०—काय ह्मणून ह्मणजे? इकडची आज्ञा होत आहे ह्मणून. (गिरिधरास) तो येतो आहे कां? (उदयादित्यास) तर मग तो आल्यावर कट्यार परत येण्याची तर नाहींच आशा—पण या कट्यारी बरोबर हा राजमुकुट आणि ही गादी अशीं दोन्हीहि त्याला देऊन टाकावीं ह्मणजे झालं—त्रास नको मग ह्यानां संभाळायचा!

गिरिधर०—महाराज, छोटे महाराज आले!

चंपा०—अरे लुच्च्या! छोटे महाराज ह्मणूं लागलास कां इतक्यांत त्याला? मग हा रणसिंह कोणरे? चोर का हा?

उदया०—प्रिये, त्याच्यावर कां अशी रागावतेस तूं उगीच? गड्या माणसांनी सुद्धां का तर मग त्याला ए-केरी नावानं हांक मारावी ह्मणतेस?

चंपा०—तसं नाहीं ह्मणत मी. (इतक्यांत जगदेव येतो.) आलाच हा. आतां मात्र खरी परीक्षेची वेळ आहे.

(जगदेव येऊन वंदन करितो.)

उदया०—जगदेव, तूंच कशाला आलास? तेवढी क-ट्यार पाठवून देतास ह्मणजे झालें असतें.

जगदे०—तात, पण ती कट्यार आपण त्या विजयी समशेरी बरोबर शत्रूशीं मी झुंजावें ह्मणून दिलीत ना? आणि आतां ती परत मागतां? या कट्यारीच्या अन् समशेरीच्या जोरावर तर मी शत्रूशीं झुंजणार होतों.

उदया०–लाडक्या, तुला माझा दुर्लौकिक का होऊं द्यायचा आहे! (त्याच्या कानांत कांहीं सांगता.)

चंपा०–हो! हो! असंच असंच बरं जगदेव. इकडच्या पाठीमागं तुलाच गादीवर बसवायचं हां! (रागानें) असंच सांगितलं असेल त्याला? असंच असंच ना जगदेव? काय बाई तरी मानभावी पणा हा? पुरुषांचे दाखवायचे दांत एक आणि खायचे एक!

जगदेव०–मायजी, महाराजांच्या वर नको कांहीं इतकं गरम व्हायला! (उदयादित्यास) तात, मी आपल्या आज्ञेच्या बाहेर नाहीं पण–

झंपा,

तात, हें सर्व हीं घेइ घेई । दैव ज्याचें तया
तारि पाही ॥ धृ० ॥ शत्रुकुल-कंदना कासया
मंडनें । हार, मुक्ताफळें, कुंडलें हीं ॥ दिव्य वस्त्रें
तशीं, असत किति व्यर्थ हीं । आज हें मज
कळे सर्वथाही ॥ १ ॥ जन्म जो देतसे श्रीश तो
अन्न दे । द्वैत नाहीं जया अंतिं कवहीं ॥ राव-
रंकास तो सम सदा लेखितो । सत्य तो सत्य
तारील मजही ॥ २ ॥ निजकरें जंबिया देऊनी मम करीं । पुनरपी मागतां काय म्हणुं-
या? ॥ निजवचा भंगुनी आणता निंद्यता ।
नृपकुला काय हें युक्त पितया? ॥ ३ ॥ तात
हे सर्व तरि घेइ घेई । मज नको जंबिया पाहि
पाही ॥ धृ० ॥ असति भुज-दंड हे दिव्य अस्त्रें
मशीं । कासया लोह हें भंग-शिल जें ॥

राणी०–मग दे कीं भेल्या तें टाकून? कशाला घेतलें आहेस तें आपल्या हातांत–टाक, टाक! तुझं दैव तुला तारणार ना? मग निलाजऱ्या सारखा कशाला राहिला आहेस इथं? करीनास कुठें तरी आपलं तोंड काळं–

जगदे०–याक्षणीं सोडितों नृपपुरी मज इथें। सेव्य
नच यापुढें बिंदु जलही ॥ ४ ॥ तात हे० ॥

[रागानें जातो.

(पडदा पडतो.)

[अंक १ ला समाप्त.]

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

प्रवेशः–(जगदेव, त्याची आई वीरप्रभू व त्याच्या जया विजया नांवाच्या दोन ८।१० वर्षांच्या ल्हान बहिणी येतात.)

जगदेव०–आई. माझ्या नोकरीचं कुठं जुळलं कीं लगेच नेतों तुह्मांला सगळ्यांना. इतकं वाईट वाटूं देऊन आपल्या मनाला दुःख नका करून घेऊं.

आई०–बाळा, हें बत्र तूं गेल्यावरः–

पद (जाइल कैसा तमये० या चा.)

कंठूं कैसा बाळा, काळ पहारे।
निशिदिनिं खाइल मजला वाटे हा रे ॥ ध्रु० ॥

कुग्रामहि त्वां नगरचि केलें ।
परी स्मशानाचि होइल सारें ॥ १ ॥ कंटू० ॥

जगदेव०–आई, ह्या दोघी जया, विजया तुझ्याजवळ असतां तुला असं वाटण्याचं कारण नाहीं. धीर दे, धीर दे आपल्या मनाला. आई हें बघ मी यशस्वी व्हावं ह्मणून माझ्या गळ्यांत घालण्या करितां ह्या हा विजयी हार गुंफून घेऊन आल्या आहेत. (बहिणीस) ताई, बाळे विजये, आईला तुह्मी दिला पाहिजे आतां धीर, समजलांत ?

पद (आा हार जोई या चा. नर्मदा)

जया विजया–
हा हार कंठीं घालुनी विजयी हो! हार कैसा हा शोभे । विजय-हार हा घालितों, भाई विजयि हो, पाहुनि तुजला मन लोभे ॥ कंठीं हार धरी । सत्वर ये घरीं ॥ ह्मणुनि घालितो हार भाई हो । आह्मीं साहुं कशा या विरहा रे ?॥

विजया–खेळूं कशी तुझ्या विण भाई रे ? ॥

जगदे०--बनडी—लाली—बिजली
कां आली अशि गालीं अश्रु–अवली ? ॥ १ ॥

जया विज०–हा हार कंठीं०–

विजया–भरवी मज कोणरे ?

जया–पुरवी लाड कोणरे ?

जगदे०–दुःख नका करूं गे, जय–हार हो; ।

जया विज०–पहा घालितों किति प्रेमभरें कंठीं ॥

जग०--रडुं नका; मला ही कंठी ॥ जये ॥

जया विज०–नाहीं बघ रडत रे । परि येशिल कधिं
रे? । पांडू भाइ पुन्हा कधिं हार हो ॥

जग०–सोडा ऐशा या अधिरा । मनिं धीर धरा ॥
चिरकाल स्मरा गौरिहरा ॥

जया विज०–भाई, होई, विजयी अजिं जाई । परि
येई रे लवकर । हा हार कंठीं ॥ २ ॥

जगदे०–(पडद्या बाहेर येऊन.) इथून तर मी निघालोंच. आतां पट्टणाकडे जावं. तिथला राजा सिद्धराज जयसिंग मोठा गुणग्राही आहे. त्याच्याकडे कांहीं नोकरीचं जमल्यास पहावं. पण वाटेंत बीरकोटा लागणार. आणि ती तर मुक्कामाची जागा. तिथं उतरावं कीं नाहीं? प्रियेला तिथं जाऊन कुठें दोन तीन दिवस होतात न होतात इतक्यांत जर तिच्या मागोमाग गेलों मी तिथं तर सासरची मंडळी काय ह्मणतील? आणि प्रियेलाही हें माझं एकदम येणं किती चमत्कारिक वाटेल? तर तिथं उतरावं कीं नाहीं? (विचारयुक्त) अथवा उतरायला काय हरकत आहे, बाहेरच्या बाहेर उतरून चालतं व्हावं, कुणाला भेटूं नये ह्मणजे झालं. बस्स, असंच! पण इथून निघतानां काय होते आहे माझी स्थिती अगोदरः–

श्लोक (हरिणी)

जननि–विरहें शोकें माझें किती मन दाटतें ॥
त्यजुनि भगिनी जातां कैसें मदंतर फाटतें ॥
पुनरपि कधीं यांची होई मला तरि भेट हें ॥
हृदयिं कितिदां येतें माझ्या! असह्यपि दुःख हें ॥१

प्रवेश २ रा.

स्थळ-वीरकोटा नगरा बाहेरील उद्यान.

प्रवेश-(जगदेव एका झाडाला आपला घोडा बांधून बागेंत फिरतो आहे असा.)

जगदेव०-आईला आणि बहिणींनां सोडून निघाल्या-पासून माझं मन अगदीं खिन्न होऊन गेलं होतं. पण इथं आल्यापासून-

पद (आज मज सद्गुज अला०)

होत किती हृदयिं मला आनंद ।
मधुप कुसुमीं पळे सुटतां मधु गंध ॥ होत० ॥
किती कुसुम तरू फुलुनि डुलती ।
वाहत सुखद पवन मंद ॥ १ ॥ हो० ॥
सुखें भृंगतती रमुनि रसालीं ।
होति मधुस पिउनि धुंद ॥ २ ॥ हो० ॥
इथें पिक-कंठीं मंजुल गाती ।
विटपिं बसुनि लुटति गंध ॥ ३ ॥ होत० ॥

(इतक्यांत एक दासी प्रवेश करिते)

माधवी-(झाडाच्या आड उभी राहून स्वगत.) हा कोण असावा बाई वीर पुरुष ? ह्याचा तोंडवळा आमच्या वीर-मतीच्या नवऱ्यासारखा दिसतो अगदीं. त्यांना मी कुठं एकदां लग्नांत पाहिलं होतं. त्यावर तेच जर हे असतील तर हें दुसऱ्यांदा.

जगदेव-(स्वगत) लग्नाच्या वेळीं ज्यावेळेस मी इथं आलो होतो त्या वेळेसहि हें लतागृह मला असंच रम्य दिसत होतं (लतागृहांत शिरतो.)

माधवी–आतां संशयच नको याबद्दल. तेच हे. तर आतां जाऊन वीरमतीला 'तुमचं दोघांचं ठरल्या प्रमाणं जगदेव आले आहेत' ह्मणून सांगून जरा गंमतच करते तिची ! [जाऊं लागते.]

(इतक्यांत वीरमती येते.)

अगबाई, ही वीरमतीच इकडं आली कीं !

वीरमती–अग माधवी, इथं करते आहेस काय तूं इतका वेळ ? तुला चार नारिंगं तोडून आण ह्मणून केव्हांच सांगितलं होतं पण तूं आपली इकडंच अजून ! (घोडा पाहून) अगं पण त्या बकुळीखालीं घोडा बांधलाय तो कुणाचा ? दादा बिदा आलाय कीं काय ?

माध०–वाः दादा का ? सखे, घोडा कुणाचा हें ओळखून संवरून मला मुद्दाम हा प्रश्न कां ? धारेहून इकडं निघून येतानां तुमचं दोघांचं ठरलं होतं त्याप्रमाणं तिकडून येणं झालं आहे.

वीरम०–काय मेली चावट आहे तरी–(तिचा पदर धरून) बोल-बोल ठरलं होतं का आमचं असं ? कुणी सांगितलं गं तुला हें ?

माध०–कुणी ह्मणजे ? आपणच बाईसाहेब.

वीर०-हो, सांगितलं असेल खरं. काल रात्रीं मी तुझ्या स्वप्नांत येऊन सांगितलं नाहीं ?

माध०–माझ्या स्वप्नांत नाहीं. पण आपणच आपल्या स्वप्नांत काल रात्रीं "अजुनि कां येत नाहीं, अजुनि कां येत नाहीं." असं चांगलं एक पांच सहादां तरी बडबडला असाल !

वीर०—चावट मेली. कांहीं तरी माणसाच्या अंगीं चिकटावायला बघायचा स्वभावच आहे तुझा—

माध०—तर मग, काय मी खोटी ? आतां दिसेलच कीं खरं कोण आणि खोटं कोण तें ! ते पहा कोण आलं तिकडून ?

वीर०—अग तुझ्या थट्टेला कांहीं शेंडा, बुडखा ? परका पुरुष असेल तो कोणी ? तेव्हां त्याच्याकडे आपल्याला पाहण्याचं कारण ?

माधवी—परका पुरुष असला तर त्याला या राजोद्यानांत येण्याचं कारण ? बाईसाहेब, जगदेव महाराजच ते. शंकाच नको त्याबद्दल. जरा अशा आड होऊन पहा ह्मणजे मी काय ह्मणते तें येईल प्रत्ययाला.

वीर०—(आड जाते.) चल तर. (आपल्याशीं) मी इकडं येण्याला निघाले तेव्हां आपण इकडं येणार हें मला कांहीं सांगितलं नसून हे एकदम कसं यायचं बाई !

जग०—हाच, हाच तो कुंज !

पद (आलों शरण तुला या चा०)

कुंजाचि मनिं भरला । संभ्रम चित्तीं परि शिरला ॥ धृ० ॥ चंद्रिकेविणें चंद्रलोक तो । तेंविच कुंज मला ॥ अथवा—

हरिविण जैसें श्रीहरि—मंदिर । तेंविच हाहि मला ॥ शुन्य दिसे कां मज हा नकळे । प्रिय जो हृदयाला । निकुंज द्वारें भयाण दिसती । काय ह्मणूं याला ॥ इकडुनि तिकडुनि सुंदरि येतां । मज जो प्रिय झाला ॥ १ ॥

अथवा असं व्हायला दुसरं कारण तरी काय असणार ? इथं प्रिया नसल्यामुळं माझ्या मनाचीच ही अशी स्थिती होत आहे अन् दुसरं काय ? जगदेवा! स्त्रियां सारखा असा अधीर नको होऊंस! तुझ्यासारख्या पुरुषांना शोभत नाहीं हें! अरे, अरे! हें सगळं समजतं मला, पण उमजत नाहीं याला मी तरी काय करूं ?

(वीरमती कुंजाच्या दरवाजांत येते.)

वीर०—छेः नांव सुद्धां कळलं, मग आतां कसला संशय ?

जग०—इथं येऊन नुसतं भेटून सुद्धां जायचं नाहीं! माझ्या प्रियेला—त्या वीरमतीला—हें समजलं तर ती काय ह्मणेल मला ? छेः

वीर०—अग बाई, पण इतक्यांत कां बरं यायचं ? त्या मायजींचे तर नसतील कांहीं खेळ ? तर आतां असं करून नाहीं उपयोगी—नाहीं पण थोडी गंमत करावी. जिथं आमचे लपंडाव चालत तोच कुंज हा! (कुंजाचे दरवाज्यांतून झपकन् जाते.)

जग०—अरे हें काय ? ही कोण ?

साकी.

कल्पलतांचा कुंजचि आहे अथवा उपवन
सारें। कल्पतरूनीं भरुनी गेलें; कां मनिं सं-
भ्रम पसरे ॥ नकळे मुळिं मजला। सुंदरि
पडते दृष्टीला ॥ १ ॥

(कुंजाच्या एका दरवाजाकडे तो जातो तों ती दुसऱ्या दरवाजांतून येते.)

अरे, लग्नाला इथं आलो होतो त्यावेळच्या सारखाच आज हा लपंडाव होत आहे हें कसं? ओ हो! काय ही लाज?

पद. (वसंत ऋतु बहु उडवी० या चा०)

चपले सम ही चमकत सुंदरी ॥
निशिदिनिं फिरते जी हृद्यांतरीं ॥ धृ० ॥
जागृत अथवा निद्रित आहे ॥
किंवा संभ्रमिं हें बघतोहे ॥
कांहिंच नकळे काय ह्मणूं तरी ॥ १ ॥चप०॥

वीरम०–(आपल्याशीं)

पद. (पाहुनी मुखचंद्रमा० या चा०)

संशयीं उगि पाडशी प्रिय कांत काय? न युक्त हें ॥ हो पुढें, झट टाकिगे, प्रिय कंठिं हात स्वयेंचि हे ॥ धृ० ॥ शंकिशी, अशि काय गे, नच अन्य हा युव कोणिही ॥

जगदे०–(ऐकून)

मग लाजशी, उगि सुंदरी, वद काय गे तुज युक्त हें? ॥ १ ॥ संशयीं उगि पाडशी निज नाथ कां तुज युक्त हें ॥ १ ॥

(वीरमती एकदम आड होते.)

छेः छेः काय मनाची स्थिती झाली आहे ही माझ्या–

स्वप्न हें, नच जागृती, उगि भास खासचि जाहला । प्रिय-संस्मृती हृदयांतरीं किति रेखिते स्मर–लेख हे ॥ भासली सखि पाहिली,

सखि बोलली, सखि हांसली, सखि लाजली।
परि वंचुनी मजला सखी मग आड हो ह्मणुं
काय हें ॥ २ ॥

वीर०–(हळूंच मागून येऊन) काय ह्मणजे? स्वप्न!

जग०–स्वप्न! पण मी चांगला जागा आहे.

वीर०–पण हें जागं असणं दिखील स्वप्नांतलच.

जग०–अरे प्रियाच ही! पण तूं इथं कशी या वेळेला? मी आजच इथं यायला, आणि तूंहि इथं यायला ही अशी एकदम कशी गांठ पडली?

वीर०–तशाच गांठी घातल्या आहेत परमेश्वरानं! मग कां नाहीं गांठी पडणार? पण बाई इतक्यांत कसं येणं व्हायचं?

जग०–तसंच कांहीं कारण झालं ह्मणून मी तडका फडकी निघालों. (तिला हळूच कांहीं सांगतो.)

वीर०–अस्सं! तर एकून मायजीच ह्या सगळ्याचं कारण! आणि इथं न उतरतांनां परस्पर जायचं होतं मनांतून?

जग०–मनांतून जरी नव्हतं तरी प्रसंग पाहून तसं करण्याचाच बेत केला होता.

वीर०–तर मग आज देवानंच आणलीन ह्मणायची मला इथं!

जग०–काय हवं तें ह्मण.

वीर०–तर मला आतां पट्टग पाह्यला मिळणार एकून?

जग०–छेः छेः छेः त्या भानगडींत मात्र नाहीं पडणार मी आतां पासून.

वीर०–तर मग हें असं सडंच जायचं? अथवा जायला तरी कशाला पाहिजे? इथंच राह्यलं तर–

जग०–छत् तेवढं मात्र नाहीं व्हायचं माझ्या हातनं!

वीर०–(एकीकडे) तें आतां कशाला बोलूं? बाबा-कडूनच सांगिवलं म्हणजे झालं! मग आपल्या आपण राह्यचं होईल. (उघड) पण नगरांत नाहीं का चलायचं?

जग०–तसल्या भानगडींत नको पाडूस आणखी. मी इथं आल्याचं आणि तुला भेटल्याचं कळवूं दिखील नकोस कुणाला.

वीर०–मी नसतं कळिवलं, पण माझ्या दासींनां या पुर्वींच कळलंय आल्याचं. यायची बातमी इतक्यांत साऱ्या नगरभर पसरली असेल!

(दासी व ब्रीजसिंग येतात.)

ब्रीज०–काय गं? ताई आणि जगदेवराय कुठं आहेत म्हटलंस? इथं याच कुंजात ना?

दासी०–हो याच. (दुसरीस) होय ना ग?

दु०दासी०–हो याच, याच. काय मेलीची आठवण पण! वेंधळी नाहीं तर!

वीर०–(जगदेवास) हा पहा दादा दिखील आला वाटतं इतक्यांत! (तो आंत येतो व ती लाजून उभी राहते.)

जग०–(ब्रीजसिंगास) कसं काय ब्रीजसिंग, खुशाल सारी मंडळी?

ब्रीज०–खुशाल. पण आपण असे सडे कुणीकडं इकडं? बरोबरचा परिवार वगैरे कुठं ठेवला आहे?

जग०–(तरवार दाखवून) बरोबरच आहे तो

सगळा आमच्या. आमचा परिवार ह्मटला ह्मणजे हा.

ब्रीज०—आणि ताई तूं कशी इथें?

वीर०—ह्या परिवारा पैकींच मी हि एक. (एकीकडे) दादा, तूं आतां इकडं कांहीं जास्त विचारूं नकोस. अगो-दर वाड्यांत जाऊं या—

ब्रीज० (जगदेवास) बरं पण नगरांत चलायचं ना?

जग०—नगरांत! (ओंठ चावून एकीकडे) अथवा असं कशाला? तिथं जाऊन हिची नीट समजूत घालून हलकेंच पाय काढूं ह्मणजे झालं. आतांच कशाला नाहीं ह्मणा? आणि मी नाहीं ह्मटलं तरी देखील हे मला आतां नगरांत घेऊन जाणारच. (उघड) चला कीं. माझ्या कडून कुठं ना आहे? चला हा तयार आहे मी.

(सर्व जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थल—वीरकोटा येथील वीरमतीचा महाल.

प्रवेश—(जगदेव आणि वीरमती बोलत आहेत अशी.)

जग०—

पद.

प्रिये, नेइन तुज लौकरी तरि अधिरि कां होशी। अशी सोज्वल नव चंद्रिका, कधिं फेंकिल कां शशी। सन्निध्र तारा ही प्रिय जया, टाकिल कां तिशी?। मग कैसा राहिन तुज सोडुनी, सांग रमणी। तूंच चंद्रिका मशीं ॥ प्रिये० ॥ १ ॥

वीर०—असं जर आहे तर मग या चंद्रिकेला सोडून का जायचं बरं ?

जग०—कोण जातंय? माझे पंचप्राण तर ह्या मंदिरांत घुटमळत राहणार; आणि हा देह मात्र नोकरी संपादण्या करितां इथून जाणार, इतकंच.

वीर०—मग इथंच राह्यलं तर नाहीं कां व्हायचं?

जग०—छेः तेवढी गोष्ट मात्र बोलूं नकोस. कारणः—

दिंडी.

श्वशुर गृहिं तें राहणें क्षत्रियांना ।
उचित नाहीं हें मान्य सर्व मान्या ॥
विक्रमाविण वीरांस तेज नाहीं ।
अधिर भीरू ते ठरति जगतिं पाही ॥ १ ॥

आणि तशांत मी तातांच्या जवळ काय प्रतिज्ञा करून आलों आहे तें तुला सांगितलंच आहे; असं असून तूं मला मोहांत घालूं पाहतेस हें चांगलं नव्हे. चार दिवस तूं इथं रहा. माझं कुठं जुळलं कीं आलोंच ह्मणून समज तुला घेऊन जायला.

वीर०—तेवढं बरीक नाहीं आतां व्हायचं. यापुढं जिथं हे पाय तिथं मी. बरोबर गडी नाहीं माणूस नाहीं, उन्ह आहे तान्ह आहे, आणि मी इथं या सुखांत काळजी आणि दुःख करीत राहूं? छेः बाई, मी नाहीं आतां इकडं सोडून राह्याची!

जग०—वेडी आहेस तूं. मनुष्याला घराबाहेर पडलं ह्मणजे कशीं आणि काय संकटं येतात तें समजतं एरवीं नाहीं;

कल्पनाच नाहीं तुला त्याची, आणि ह्मणूनच तूं असा आग्रह धरितेस.

वीर०–तर मग सुखाच्या वेळीं मात्र आह्मीं जवळ असावं, आणि दुःख आलं ह्मणजे मात्र लांब पळावं, असंच ना? कोणाच्या हातून हें असं करणं होत असेल तें होवो. मी तर बाई, आतां आपल्या मनाशीं पक्की गांठ घालून ठेविली आहे कीं कांहींहि होवो आपलं बरोबर असायचं!

जग०–प्रिये, भलत्याच गोष्टीविषयीं आग्रह धरण्यांत काय अर्थ? लाडके, सीतेनें रामचंद्राबरोबर जाण्याचा आग्रह धरल्यामुळं पुढं कसकसे प्रकार ओढवले ते तूं सगळे ऐकलेच आहेस. असं असून मग–

वीर०–"कां आग्रह" हेंच कीं नाहीं ह्मणायचं?– पण जवळ राहण्या इतकं सीताबाई इतकं जर माझं पुण्य असेल तर आणखी काय पाहिजे मला? ह्मणून ह्मणते मी आपली बरोबर येणार. कारणः–

पद. (नृपाल कोप शां० या चा०)

प्रियास सोडुनी कधीं तरी। राहि काय सा-
ध्वि ती जगांतरीं?। कोसळून संकटेंहि घोर
तिजवरी। धरी धिरा प्रिया खरी। काळ
कठिण तो असो किती तरी॥ १॥

जगदे०–राहि राहि कांहिं काल जनक–
मंदिरीं। धरूं नकोस व्यर्थ आग्रहास सुंदरी।
वीर०–सौख्य सेवण्यास राहुं काय मी इथें।

प्रियास सोडुनी दुरी । कठोरा वाणी काय वदतसा ॥ २ ॥

जग०–तर मग प्रत्यक्ष आपल्या आई बापांच्या पाशीं देखील राहण्याची तुझी इच्छा नाहीं?

पद.

माता पिता कोणी नको, चरण हे हवे, चरण हे हवे ॥ धृ० ॥ दीपाविण जेंवि प्रभा । प्राणा विण देह–लता । वस्तु विणें जशि छाया । प्रेमाविण जशि माया । नाथा विण तेंवि प्रिया । ह्मणुनि वदत चरण हे हवे ॥ १ ॥ म्यानाविण खड्गलता । शौर्याविण वीर जसा । तेजाविण रवि जैसा । कीं जोत्स्नेविण चंद्र जसा । नाथा विण तेंवि प्रिया । ह्मणुनि वदत चरण हे हवे ॥ २ ॥

जग०–(एकीकडे) आतां हिला जरा निक्षूनच सांगून पहावं. (उघड) तूं कांहीं ह्मण तुला राहिलंच पाहिजे. मनांतून राह्यचंच असेल ह्मणा, पण वरकांतीं मात्र बरोबर येण्याचा हा आग्रह दाखविते आहेस झालं!

वीरम०–इतकं सांगून देखील जर इकडं असंच वाटत असेल तर हीच माझी प्रतिज्ञाः—

पद. (कंठ चरचर चि० या चा०)

घोर विपिनीं भयद कंदरिं दिव्य अंबरिं स्वर्गिही । प्रियकरासह दासि जाइल कुंभिनीच्या गर्भिही । अग्निमाजी वायुमाजी टाकि उडि

ही सर्वथा । हाच निश्चय खचित माझा कधिं न होइल अन्यथा ॥ १ ॥

आणि इतकंही असून जर नसेलच न्यायची मला तर–

शस्त्र विजयी स्वकरिं घेउनि कंठ चरचर कापुनी । इच्छित स्थलिं मग सुखें जा आड ये नच वैरिणी । प्राण माझे मत्प्रियासह राहती; वच नान्यथा । नाथ चरणीं रत सदा मी, हाच निश्चय सर्वथा ॥ २ ॥

जगदे०–(हंसून.) वाः तर मग आपण इतक्या अगदीं निकरावर आलांत तर ?

वीर०–(डोळ्यांत पाणी आणून स्फुंदून मान फिरवून) पुरे बाई.

जगदे०–(तोंडावरून हात फिरवून) प्रिये, पण हें काय ? इतका जर तुझा निश्चय आहे तर चल, माझं काय जातं त्यांत !

वीर०–पण मनापासून नाहीं कांहीं हें. आमचा बायकाचा झटला म्हणजे आपला त्रासच असायचा !

जग०–छेः त्रास कसला ? चल म्हणतोना ?

वीर०–ठाऊक आहे. जसं कांहीं मनापासूनच असेल अगदीं सगळं !

जग०–अगदीं अगदीं मनापासून, मग तर झालं कीं नाहीं ?

वीर०–मनापासून असेल तर मग कांहीं म्हणणं नाहीं माझं; पण बाई असं जागायचं किती वेळ हें आतां ? किती रात्र झाली ठाऊक तरी आहे का कांहीं ?

पद. (प्रिये पहा रात्रीचा या. चा०)

पहा गडे रात्र कशी हलु हळुही संपत कीं चा-
लली ॥ धृ० ॥ दुंदुभिचा होय ध्वनी। जागी
करि खडबडुनी। परि जागीं कीं स्वप्नीं।
हेंचि ना कळे ॥ १ ॥ बोलुनिया रात्र
सारि। घालविली सौख्यभरी। झोंप प्रिया
क्षणभरही। येउं नच दिली ॥ २ ॥ पहा० ॥

ह्मणून ह्मणते—

क्षमा असो दासिस या। नत चरणीं पाहि प्रिया।

जगदे०-सोडि सोडि या विनया। फुकट रात्र
चालली ॥ ३ ॥ पहा प्रिय० ॥

प्रवेश ४ था.

[श्रीजसिंग प्रवेश करितो.]

श्रीजसिं०—वीरमतीनं जगदेवरायाच्या बरोबर जाण्याचा निश्चय केला आहेन. आणि तीं दोघंही पट्टणला वीरकोट्याहून जो अगदीं नजीकचा—पण धोक्याचा—रस्ता जातो आहे त्या रस्त्यानंच जाण्याचा त्यांचा आग्रह आहे. मी पट्टणपूरची हद्द लागेतोंपर्यंत बरोबर येतो ह्मटलं तर मला दोघंहि येऊं नको ह्मणतात. तर आतां असं करावं; त्यानां जाऊं द्यावं पुढं, आणि आपण त्यांच्या मागोमाग असावं. ही वाट आज किती दिवसपर्यंत एका सिंहाच्या ओडप्यानं आडवून सोडली आहे, ह्मणून सांगितलं त्यानां तरी देखील हे ह्या वाटेनं जाण्याचा आपला हेका सोडीत नाहींत. तर आपण यांना पुढं जाऊं देऊन मागून लगळी.

बातमी ठेऊन प्रसंगच पडल्यास आपण यांच्या मदतीला जावं. यापेक्षां दुसरं काय करणार मी? माझ्या शिबंदी पैकीं शिकारी मंडळी तयार आहेत का नाहींत हें पाहूं अगोदर.

[जातो.]

प्रवेश ५ वा.

स्थळ—वीरकोटा येथील वीरमतीचें मंदिर.

प्रवेश—(वीरमति जावयास निघाली आहे व तिच्या सख्या सभोंवती जमल्या आहेत.)

पद (गर्भा-सखि विरहीं० या० च०)

सख्या—सखि भावी विरहें होय । मन हें व्याकुल गे ॥ साहूं कैशा या विरहास । अंतर दाटे गे ॥ धृ० ॥ काय वदूं स्फुर उर होत । शब्द न उमटे गे ॥ नयनाश्रुजलें हे आर्द्र । दृश्य न मुख तव गे ॥ दुःख जगीं प्रेमाऽऽऽमुळें । जननचि प्रेमीं जाण ॥

वीरम०—भेटा सखयें कडकडुनी । न करा शोकें व्याकुल प्राण ॥ आण गळ्याचिच गे ॥

सख्या०-सखे काय उगी ही आण । हृदयचि उलतें गे ॥ विरह सहाया नच मुळिं त्राण । मन हें भ्रमतें गे ॥ १ ॥ सखि, भावी विरहें ॥ धृ० ॥

वीरमती०—विरह-भयें मन दाटतें । अंतरिं शोक

न माय। नाथा होइल त्रास गे। हेंचि मनांत येई फार ॥ मन हें अधिरां गे ॥

सख्या०–पति हा स्त्रीचा प्राणाधार। मत सखि सकलां गे ॥

वीर०–प्रिय प्राणा मी विसरूं काय ॥

सख्या०–वच तव दुःखद गे ॥ २ ॥ सखि भावी० ॥ धृ० ॥ सखे, सुखें जा सोडुनी। भाजत विरह मनास ॥

[इतक्यांत निषण्याच्या तयारीनें जगदेव येतो त्यांस पाहून]

प्राणाधार पातला। सखे वीरमणी जगदेव विजयी राणा गे ॥ पहा पराक्रमी परमार। आला इकडे गे ॥ रणीं समर-रमण रणधीर। होईल विजयी ग ॥ ३ ॥ सखि भावी० ॥ धृ० ॥

सख्या०–(पुनः पहिलें कडवें म्हणतात.)

वीर०–भेटा सखये कडकडुनी ॥ (त्या भेटतात.)

सख्या–(सखि भावी इ० म्हणतात.)

वीर०–येते तर.

(पडदा पडतो.)

अंक २ रा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थल–जंगल, देखावा:–बंदुकीचा आवाज होतो.

प्रवेश–(जगदेव व वीरमती आश्चर्यचकित झालेली.)

जगदेव–(वीरमतीस) केवढं धूड हें !

वीरम०–पण एवढं धूड दिखील नेमकी गोळी टाकून आणि समशेरीचा नेमका वार करून लोळविलं तेव्हां काय ह्मणायचं बाई ? याला शक्तीहि लागते आणि युक्तीहि पण लागते !

जगदेव–(सिंहिणीच्या गर्जना ऐकूं येतांच.) हं ऐकलीस गर्जना ! आपण सिंहाचं आणि सिंहिणीचं इथं एक जोडपं आहे ह्मणून ऐकत होतों, तेव्हां तीच मंडळी ही. (पुन: गर्जना होते) थांब मी पुढं जातो तिच्या अंगावर चालून. तूंहि आपली समशेर सरसावून ऐस.

[धांवून जातो. व सिंहिणीच्या तोंडांत शेला बांधलेला हात देतो व दुसऱ्या हातानें तिच्यावर वार करितो. इतक्यांत वीरमती तिच्यावर भाला फेंकून वार करिते. व ती सिंहीण तडफडून पडते व जगदेव निभावतो.]

वीरम०–छे: बाई. मी अगदीं घाबरलें होतें ! ह्मटलं काय प्रकार होतो अन् काय नाहीं !

जगदेव–खुद्द अशी वीर बहाद्दर मंडळी जवळ असल्यावर काय प्रकार होतो अन् काय नाहीं असं वाटण्याचं कारण ?

पद. (मोठे यक ताई या. चा०)

वीरम०–नाथा रक्षियलें हरिनें । संकटांतुनी ॥
नाथा रक्षि० ॥ धृ० ॥ ही कैशी, कैशी वेळा
कैशी आली होती । झालें होतें अंतरवैरी ॥
नाथा रक्षीयलें ॥ १ ॥ नाथा हेच चरण-
कमल हेच, दासी ही–दासी ही–चुरिल सतत
अशी ॥ नाथा हेच कमलवदन हेच, दासी
ही–दासी ही–बघिल सतत अशी ॥ २ ॥
नाथा० ॥ सोडुनि प्राणरमण रमणि कोण
सोडुनि ती राहिल ह्या जगतिं कशी ॥
मृगांक चंद्रकर विरहित, धरि नील कमलिनि
ती वदनातें विहसित कशी ॥ नाथा० ॥

[इतक्यांत बंदुकीचे बार होतात.]

जगदेव–थांब. हे बंदुकांचे बार कुठून येतात ऐकूं?

वीर०–कोणी चोर-लुटारू तर नसतील?

जग०–कोणी का असेनात. अशी शूर आणि तर-वार बहाद्दर–

[इतक्यांत ब्रीजसिंग येतो.]

ब्रीजसिंग, तुह्मी कसे इथं?

ब्रीज०-आमचं ह्मणणं न ऐकतां आपण आलांत. वाटेंत हीं दोन भयंकर घुडं असल्याचं माझ्या पुरं लक्षांत होतं. आणि ह्मणूनच एखादवेळ भलताच प्रसंग ओढ-वेल ह्मणून मी वीरटोका सोडल्यापासून तुमच्या मागोमाग शिकारीचा सुमार घेत घेतच येत होतो.

जग०–बरं पण, आतां तुह्मी ही बंदुकीची फैर को-णावर झाडलींत?

श्रीज०—त्या सिंहिणीवर ! तुमच्या दोघांच्या वारांनीं ती जरा बेशुद्ध होऊन पडली होती. तिच्या जवळून तुह्मीं गेलांत मात्र तों ती पुन्हा उठून शेपटी हापटूं लागली तोंच गोळी टाकून मी तिला ठार केली.

वीर०—शाबास, तर तूंहि आमचें रक्षण करण्याकरितांच आलास एकून !

पद. (निष्फल माझे प्राण या. चा०)

निर्मल बंधु प्रेम । कीर्ति तरी । सदा जगतिं वसो हें । धृ० ।
घोर वनीं ही येउनि रक्षी, ऐसा नेमानेम ॥ १ ॥

बरं पण दादा तूं आणखी कुठवर येणार पुढें ? इथूनच परत तूं आतां.

श्रीज०—आमची हद्द ह्या नदीपर्यंत. तिथवर येणार मी. पुढें मग पट्टणचीच हद्द लागली. तिथून रस्ताहि मग बरा आहे. आणि वाटेंत भीतीबीतींहि नाहीं कसली. ह्या नदाचे कांठच्या आंबराईत उतरून आंघुळी वगैरे करून थोडा फराळ करून घेऊं; आणि मग तुह्मीं पुढें जा आणि मी मागें परतेन.

जग०—चला. [जातात.]

प्रवेश २ रा

स्थळ—पट्टणनगरा बाहेरील सहस्रलिंग तलाव व शिवालय.

प्रवेश—(जगदेव व वीरमती आपले घोडे झाडास बांधून स्नानें वगैरे आटोपून उभी आहेत.)

जगदेव०—आज काय सोमवार आहे आपल्याला, फ-

राळ ना बिराळ. संध्याकाळपर्यंत कांहीं करायचं नाहीं उरलं आतां. इथं आपण स्नानं आटपून घेतलींच आहेत. मी गावांत जाऊन जागेपागेची व्यवस्था लावून येतो. तों-पर्यंत इथं ह्या झाडाखालींच बसून रहा तूं स्वस्थ. घोडे बिडे मात्र कुठं जातील तर त्यांच्याकडे मात्र लक्ष असूं दे.

वीरम०—ह्मणजे ! अगबाई.—

पद (प्रिया मुज प्राण० या चा० चंद्रकांता, गुजराथी.)

प्रियाविण राहूं कशी ? ।

जगदेव—खाशी खाशी ! ।

वीर०—राहूं कशी एकाकी ? । केव्हां यायचं ?—

जग०-एका घटकेंत आलों पहा ॥

वीर०-मला पडे भीती गडे ।

जग०—असुनी इतुकि शूर ॥ दिसत गे पुरहर्म्य हे ।

नगर नसत दूर ॥

वीर०—दासी ही घाबरी, कितीतरी अंतरीं ।

याची नाहीं स्मृति । मुळीं

जग०—स्मृति सारी ॥ १ ॥

आपल्या सारख्या वीरांना कोणी खाणार आहे कीं काय इथं ?

वीर०-इश्श बाई, तेवढ्याबद्दल इतकं नको कांहीं मेलं अगदीं हरभऱ्याच्या झाडावर चढवायला एखाद्याला ! तें असूं दे—पण मी ह्मणते एकदम मिळूनच जायला तरी काय हरकत आहे ? उन्हाचं अन् चाळत जाऊन पुन्हा परत यायचं, ह्मणजे कोण बाई त्रास होईल ?

जग०—तर मग भीती वाटण्याचं सारं ढोंगच तर ?

वीर०—काय वाटेल तें ह्मणावं—आणखी त्यांतून आज सोमवारचा उपास ह्मणून ह्मणते—

जग०—अशावेळीं—आणि अशा मोठ्या नगरांत जाऊन रस्तोरस्तीं इथं उतरायची सोय होईल कांहो, ह्मणून दीनवाणं भिकाऱ्यासारखं विचारीत सुटणं मला तरी नाहीं पसंत!

वीर०—खरंच, हें बरीक नव्हतं बाई आलं माझ्या लक्षांत! जावं तर. पण लवकर यायचं मात्र. नाहींतर मला उगीच वाटेकडे डोळे लाऊन बसावं लागेल; अन् करमायचं देखील नाहीं कांहीं वर आणखी!

जग०—हा आलोंच. फार वेळ नाहीं लावीत मी. तूं अगदीं बेफिकीर ऐस.

[तो जातो, वीरमती तलावाची शोभा पहात तलावाचे-कांठीं उभी राहते व इतर स्त्रिया पाणी भरून नेत आहेत.]

वीर०—

पद. (सुटला पितृ दिश० या चा०)

सर हें रम्य किती तरि दिसतें ॥
नयना आनंदचि बहु देतें।
मन प्रसन्न तैसें होतें। पाहतां यातें ॥ ध्रु० ॥
रजनिस सोडुनि जातां शशी।
पडली चंद्रिका कां सरसीं।
कीं शशि मानिं होउनि चूर,
अवचित घेई उडी,
कां शिव-हासित देत दाद ही अशी। १। सर०।

या सभोंवतालच्या झाडांची छाया कशी यांत पडली आहे?– ही पाहून असं वाटतं कीं:—

सरसीं पसंत चित्रचि लिहिलें।
कुसुमित तरुवर दिसती फुलले।
अंबर सरसीं दिसतें सकंपित सगळे।
चित्र मनोहर लिहिलें। कोणी नकळे॥ २॥

आणि इकडं:—

हे कलहंस इथें क्रीडती।
हंसीसह हे सरसीं रमती।

अग बाई, पण हें काय मध्येंच:—

ही बकी हंसिस मारी चंचू
विव्हल हो अबलाऽऽ–
भयदाकुल चित्तीं–दोघें रडती॥ ३॥ सर हें०

(दोन दासी–शरयू व चांगणा व एक गडी असे येतात.)

शरयू०–(वीरमतीस पाहून आश्चर्यानें स्वगत.)

पद.

अबला सुंदर दिसते। अबला सुंदर दिसते॥
॥ किति ही॥
नजर हिची गहिरी, अप्सरा जशी कीं दिसते॥
॥ मज ही॥
पुरुषाविण ही एकलि प्रमदा॥ मृगनयना कां
॥ एकटि येथें?॥
रूप मनोहर दंगवि मज ही॥ वृत्त विचारूं काय
॥ इयेतें॥ १॥

(गड्यास) शुः तुळशीराम, हे बत्र तूं जा आणि बाईसाहेबांनां ह्मणावं आपल्या कोतवाल साहेबांच्या ला-लजी करितां इथं एक नवं पांखरूं हेरलं आहे. तुह्मी येस-तोंपर्यंत त्याला जाळ्यांत अडकिवते ह्मणावं साधल्यास. पण तुह्मीं मोठ्या दरबारी थाटानं शिपाई प्यादे घेऊन गाडींतून नाहींतर मेण्यांतून या. आणखी ह्मणाव मुलीनांहि घेऊन या. जा–जा तर झटपट. [तो जातो.] कोण बर असावी ही ? अथवा त्यानांच विचारलं ह्मणजे झालं. (पुढे जाऊन.) बाई, तुह्मी कोण ? कुणीकडून आलांत ? आणि हे दोन घोडे कोणाचे ?

वीर०–आह्मीं आपली पांथस्थ आहों झालं. तुह्मीं कोण ?

दासी–मी इथं राणी साहेबांच्या आश्रयाला असते झालं. पण आपण कुणीकडून आलांत ? अन् जायचं कुठं तुह्माला ?

वीर०–आह्मी–तिकडचीं दूरचीं–धारेकडचीं आहोंत. अन् इथंच राहावं ह्मणून आलों आहों आह्मी !

दासी–अस्सं ! बर पण आपलं सासर कुठं ?

वीर०–धारेस.

दा०–खुद्द धारेस ?

वीर०–हो खुद्द धारेस !

दासी–कुणाकडे ?

वीर०–(उसासा टाकून) काय सांगू बाई ?

दासी–का उसासा कां टाकलात असा ? तुह्मीं अशा कष्टी कां बरं झालां ? सासरचं नांव विचारल्या बरोबर तुह्मांला असं अगदीं उमळून कां बर आल ?

वीर०–कांहीं नाहीं! उदयादित्यराय माझे मामंजी!

दासी–(आश्चर्यानें) अगबाई, ह्मणजे! तिथले महाराजच तर मग! अन् मग तुह्मी कां अशी सडी? ना गडी ना माणूस!

वीर०–काय सांगू बाई!

दासी–तर मग हा दुसरा घोडा कुणाचा?

वीर०–(सलज्ज) कुणाचा ह्मणजे? हें काय बाई विचारणं?

दासी–ह्मणजे आपल्या यजमानांचा वाटतं! पण नांव काय त्यांचं?

वीर०–ही काय बाई विचारण्याची तऱ्हा?

दासी०–होय, असं विचारूं नव्हे खरं, पण विचारल्या शिवाय कळावं कसं?

वीर०–तेंय खरंच. त्या घोड्यावरच्या झालरीवर कलाबतूनं नांव लिहिलंय तें पहा वाचायला येत असलं तर.

दासी–(झालर हातानें खालीं काढून व नीट पसरून.) अगबाई! कोणाचं नांव हें? "वीरसिंह राजपुत्र जगदेव" आणि हें चित्र कसलं बाई! हे घोड्यावर बसून सिंहाला मारताहेत, असं दाखिवलं आहे. आणि ही दुसऱ्या घोड्यावर बसून सिंहाचे बरगडींत आपला भाला खुपसते आहे? हिचंय नांव दिलंय कीं इथं! "वीरांगना वीरमति" तर मग त्यांचं नांव वीरसिंह जगदेव आणि आपलं वीरमति वाटतं?

वीर०–(लाजते)

दासी–कां? हो सुद्धां का ह्मणायला येत नाहीं? या वरून आपण दोघंहि मोठी शूर आहांत असं दिसतं!

पण एवढ्या वयांत आपल्यावर घर सोडून निघायचा प्रसंग का आला? सासरी कांहीं सवतावळा बिवतावळा आहे वाटतं? जिथं बघावं तिथं मेलं हेंच! पण सासरी कोण कोण तरी आहेत आपल्याला?

वीर०–दोन सासूबाई, एक दीर, एक जाऊ, आणि बन्सं! इतकीच काय ती सासरची मंडळी. वन्सनां आणि माझ्या सख्या सासूबाईनां धार सोडून एका खेड्यांत–एकीकडे–दिलंय अगदीं ठेवून.

दासी–खरंच बाई, जें म्हणतात कीं:– जिथं सवता-वळा तिथं कुठली सुखकळा, तें कांहीं खोटं नाहीं! बरं पण ह्या आपल्या सासूबाईचं नांव?

वीर०–राणी वीरसू.

दासी–आणि दुसऱ्यांचं?

वीर०–राणी चंपावती.

दासी–आणि दीर आहे ह्मणता ते याच चंपावतीचे चिरंजीव वाटतं? नांव काय आपल्या दीराचं?

वीर०–रणसिंह.

दा०–नांव तर बाई सगळ्यांचीच गोड दिसतात. पण हे दीर कसे काय आहेत?

वीर०–कसे आहेत अन् काय आहेत तें मी तरी काय सांगू? पण अंमळ वडसरापैकींच ह्मटलं असतां चालेल!

दासी–अन् याच चंपाराणीच्या पायांतच आपल्याला घरांतून बाहेर पडाव लागलं तर एकून! त्यांना आपल्या चिरंजिवांना राज्य पाहिजे असेल. अन् दुसरं काय!

एकंदरींत दुःखद श्रीमंतीच्या परी, सुखाची गरीबी बरी, हें कांहीं खोटं नाहीं.

वीर०—हो—असं तर खरंच.

पद. (दारिद्र्यानें छळिलें या. चा.)

दारिद्र्यहि तें उत्तम पाहीं ।
त्याज्य राज्य जरि सौख्य न लवही ॥
राजवंशि या जन्मुनि ऐशी ।
हाय! विपत्ती यावी कां ही ? ॥
गरिबा घरिं ही सौख्य असें जें ।
गंध तयाचा नृप-गृहिं नाहीं ॥
आनंदानें गरीब नांदती ।
मद धुंदी त्या शिवतचि नाहीं ॥ १ ॥

शर०—खरं बाई, तुह्मी ह्मगता हें एका परीनं सगळं खरं! पण तुमचं माहेर कुठं ?

वीर०—वीरकोट्यास.

शर०—अस्सं! ह्मणजे राजराज्यांच्या कन्या कीं काय आपण ? त्यांना ब्रीजसिंग ह्मणून एक मोठा शूर पुत्र आहे नाहीं ?

वीर०—हो!

शरयू—मग तिथं कां नाहीं जाऊन राहिलात आपण?

वीर०—तुह्मी विचारतां तें ठीकच, पणः—

दिंडी.

श्वशुर गृहिं तें राहणें क्षत्रियांना !
उचित नाहीं हें मान्य सर्व मान्या ॥

विक्रमाविण वीरास तेज नाहीं ।
अखेर भीरु ते ठरति जगीं पाही ॥

तिकडे असं वाटलं ह्मणूनच बाहेर पडायचं.

शरयू-अस्सं! असं असेल तर नीटच आहे ह्मणायचं मग सगळं! गावांत जागा बिगा पाह्याला गेले आहेत वाटतं?

वीर०-हो. त्याच करता जायचं.

शरयू-आपल्या सारख्या माणसानां जागेला हो काय कमी? असल्या पाहुण्यांचे मुद्दाम पाय लागूंद्या ह्मटल्यानें लागायचे नाहींत! धारेस तुह्मी आपलं सासर ह्मणाला नाहीं कां? मला वाटतं आमच्या बाईसाहेबांचं माहेरच कायससं तिथं! मला तरी पुरतसं माहीत नाहीं ह्मणा. पण परवा कशावरूनशा गोष्टी निघाल्या होत्या तेव्हां बाईसाहेब ह्मणाल्या कीं, माझ्या माहेरीं लग्नं झालीं पण मला कांहीं जायला झालं नाहीं छेः बाई तुमच्याशीं किती वेळ तरी बोलत उभी राहिलें मी इथं! गेलंच पाहिजे मला, बाईसाहेबांना हीं कमळं नेऊन दिलीं पाहिजेत मला पूजेला. त्यांना सोमवारची पूजा असते शंकराची, मला वाटतं तुह्मी आल्याची बातमी बाईसाहेबांना कळण्याचा अवकाश त्या लगेच अगदीं अगत्यपूर्वक इथं येतील. राह्याच्या नाहींत आल्याशिवाय. जातेच तर मी-चांगुणे, तूं रहा ग इथं यांच्याजवळ. मी बाईसाहेबानां अशी अशी पाहुणीं आली आहेत ह्मणून वर्दी देतें. (एकीकडे) का कसं पसरलं आहे जाळं!

(जाते.)

[तळ्याच्या पाळीं दोघीहि बसतात.]

चांगुणा–ह्या तळ्याला सहस्रलिंग तलाव ह्मणतात. आणखी हें शिवमंदिर. इथल्या मोठमोठ्या धनाढ्य नागरिणींनीं भडाभड आपल्या अंगावरचे दागीने काढून देऊन त्या पैशावर बांधिवलं आहे हें. ह्या पूर्वी ह्या तलावाचे जागीं जागजागीं इथं शंकराच्या हजारों शाळुंका होत्या. अन् सध्या हें जें देऊळ दिसतं आहे हें एक लहानसं शिवमंदिर होतं. पण पुढें एकदां अशी गंमत झाली. एका श्रावण सोमवारीं सगळ्या नागरिणी जमल्या आणि प्रार्थना करूं लागल्या कीं:—

दद. (यादवराया या चा०)

गिरिजा–रमणा, चंद्रशेखरा धांव पांव मजला ।
भव-बंधातुनि सोडिव सत्वरि, विनती ही तुजला ॥
पतिविण सतिला दुसरें नाहीं दैवत या जगतीं ।
ह्मणुनि प्रार्थिती शिवमंदिरिं त्या विनयभरें युवती ॥
सेवा घडुं दे अभंग आह्मां पतिच्या चरणांची ।
प्रीति आमुची जमुंदे जैशी धूर्जटि गिरिजेची ॥
हें वच ऐकुनि हंसुनी खदखद गंगा मग वदली ।
केशकलापीं मी असतांना प्रीत खरी कुठली ॥
तों तिज गिरिजा रोषें ओढी, गंगा घाबरली ।
क्षमा मागतां तिजला त्याहीं सरिं या स्थिर केली ।१।

वीर०–अस्सं !

चांगु०–आणि मग जशीं हजारों लिंगं पूजायला मिळेनाशी झाली तशी त्यांनीं हें मोठ्ठं मंदिर बांधिवलं.

वीर०–अशी भक्ती पाहिजे देवावर.

[ह्या दोघींचें कांहीं बोलणें चालतें.]

प्रवेश–शरयू, वसंती व तिच्या दोन मुली व तुळशीराम.

शरयू०–(वसंतीशीं हळू हळू कांहीं बोलत आहे अशी) मी तर अशी बतावणी करून ठेवली आहे! याच्या पुढची बतावणी तुमच्याकडून झाली पाहिजे.

वसंती०–त्याची नको तुला काळजी तें आतां माझं काम सारं. बघ तर खरी तिला मी आतां कशी जाळ्यांत अडकिवते ती.

शर०–(वीरमतीजवळ पोंचतांच, वसंतीस) अक्कासाहेब, मी धारची पाहुणी ह्मणाल तीं हींच.

वसं०–अस्सं! (किंचित हंसून व आनंद दर्शवून) मुली,

वीर०–(वसंतीचें पोक्त वय व सगळा थाटमाट पाहून तिला नमस्कार करते.)

वसंती–ऊठ बाई, अष्टपुत्रा सौभाग्यवती हो. ऊठ मुली ऊठ. माझ्या मनांत किती होतं कीं तुमचं वीरकोट्यास लग्न झालं तेव्हां यावं ह्मणून. पण योगायोगच नाहीं तसा त्याला कोण काय करणार? ही ह्मणाली धारच्या उदयादित्यांची सून आली आहे. तेव्हां मी हिला ह्मटलं, चल तर जाऊं तिच्याकडं, ती माझी भाचेसून होते. कारण उदयादित्य माझा भाऊ, तुला नाहीं का ठाऊक? अथवा कुठून ठाऊक असणार? आलेंच असते लग्नाला बा, तर असतं माहीत; पण इथून कुठं सुटतो आहे माझा पाय? अरे दादा:—

पद (झिंजोटी-त्रिवट)

तनयातें टाकूनी ॥ कां ॥ तनयातें टाकूनी ॥
कसा देशीरे टाकूनी ॥ धृ० ॥
असति जयातें पुत्र, हाय! सोडिती ।
ज्यास नसति ते रडति धाय धाय रे ॥ १ ॥ तन० ॥
कां वनवासी यांस करिशि सोडुनी ।
कुणि चेटकि रे घाली कां मोहनी! ॥ २ ॥ तन० ॥

पोरं असणाऱ्यांचं हें असं, अन् नसणाऱ्यांचं हें असं. (डोळ्यानें पाणी काढते)

मुली०—आई, काय मेली उगीच वारंवार आठवण काढतेस गं?

वसं०—तुह्मी पोरं आहांत अजूनी. हे डाग कसे असतात हें तुह्माला काय कळणार? (वीरमतीस) मुली, तूं कांहीं सासू अन् सूनपणाचं नातं आणूं नको हो अगदीं सुद्धां मनांत! जशा ह्या दोघी तशीच तूं मला तिसरी. बरं पण जगदेव कुठं गेला आहे? नगरांत कीं काय?

वीर०—जागा पाह्यला ह्मणून जायचं.

वसं०—'जागा पाह्यला?'

पद (हजारा मेरा या चा०)

नृपतनया काल असा यावा ॥ धृ० ॥
नृपमंदिर तें सुटुनी त्याचें ।
दैवें कां फिरवावा ॥ १ ॥ नृप० ॥
राजपुरी ती अंतरुनी कां ।
देशोधडिं फिरवावा ॥ २ ॥ नृप० ॥

अथवा मी इथं आहे हें त्याला तरी काय मांहीत!

त्याला मी लहान असतानां कुठं पाहिला होता. त्यावर हा आज येतो आहे योगायोग. आणि तोही हा असा चमत्कारिक? तें असूं दे ह्मणा. पण इथं हें असं किती वेळ राह्याचं तिष्ठत? चला तर आपण नगरांत जाऊं. आणि तिथंच आणवूं त्याला शोध करवून. कोण आहेरे! तुळशीराम, तूं इथं या घोड्यांच्या जवळ उभा रहा, आणखी इतक्यांत आमचे भाचे–वीरसिंह जगदेव– जर इथं आले तर त्यांना–आह्मीं पुढं गेलों, तुह्मांलाही घेऊन यायला सांगितलं आहे असं सांगून त्यालाही वाड्याकडे घेऊन ये. समजलास? नाहींतर राहशील बघत वेंधळ्या सारखा भलती कडेच!

तुळशी०–नाहीं बाईसाहेब. आज्ञे प्रमाणं करतो अगदीं.

वसं०–(वीरमतीकडे पाहून) अगबाई, काय तुझं तोंड सुकून गेलं आहे हें अगदीं!–अशा उन्हाळ्या दिवसांत–अन् भूक नाहीं तहान नाहीं–अन् दोघानींच अगदीं सडं यायचं तेव्हां:—

पद. (अरसिक किती हा० या चा०)

विपरित दैवगती ही। जन्मुनि यावी राजकुलीं ही॥ धृ० ॥ कन्या नृपति–मणीची। तूं कांता तशी नृप–तनयाची॥ नाजुक सुम सम साची। ही कुठार पडतां दैवगतीची॥ काय दशा तव होई। (अगं) हेंचि मनातें टोंची पाही॥ १ ॥ विपरित० ॥

(दुःख आंवरून) चल माझ्या बरोबर! कां घोटाळतेस

कां अशी? जगदेवाची नको तूं काळजी करूंस. त्याला आणिवते मी शोध करवून.

वीर०–(स्वगत)

पद (नृपाल कोप या चा०)

पुरींत नाथ जाति त्यांस सोडुनी। जाउं काय
सांग तूं 'मना,' मला ॥ कांहिं सुचत मजशिं
नाहिं काय मी करूं। उगी असा विचार हा ॥
काय खुळे करिशि तूं जाइ जाइ गे ॥ १ ॥

(उघड) जशी वडिलांची आज्ञा. ही तयार आहे मी.

वसं०– (दासीस) चांगुगे, तूं पुढं हो आणि गाडीं-वरले बुरखे नीट करायला सांग.

(दासी जाते)

प्रवेश ३ रा.

स्थल–पट्टणपूरा बाहेरील तलाव.

प्रवेश–जगदेव येतो.

जगदेव–(वीरमतीस शोधून शोधून दमतो.)

पद. (मालकंस–त्रिवट.)

पाहुं कुठें गुणखाणी। प्रिया हो। रूपखाणी ॥
एकटि सोडुनि गेलों सखिला। कुपिता होई
वाटत मतिला ॥ अश्वहि पडती नच दृष्टीला।
गेलि कुठें मज सुंदरि टाकुनि ॥ १ ॥ पाहुं० ॥
तृषाकुल सखी सरोवराशीं। जातां पडली
नकळे मजशीं ॥ कां चोरानीं बघतां तिजशीं।
धनाभिलाषें टाकिलि मारुनि ॥ २ ॥ पाहुं० ॥

मी मघापासून इतका फिरफिर फिरतो आहे, आणि अजून ज्या अर्थी कुठें कांहीं पत्ता अथवा मागमूस लागत नाहीं त्या अर्थी आतां असं नाहीं उपयोगी. नगरांत जाऊन तिथं अगोदर नीट शोध घ्यावा कदाचित् मला यायला उशीर लागला ह्मणून न जाणो ती नगराकडेच गेली असेल! (जातो)

प्रवेश ४ था

स्थल—वसंती नामक गणिकेचें घर.

प्रवे०—(वसंती व तुळशा.)

वसंती०—लाल साहेबानां वर्दी दिलीस ना एकदांची! किती वाजतां सांगितलं आहेस यायला त्यानां? सणंग पण सणंग आहे. हिच्यावर स्वारी तर फार फिदा होऊन जाणार अन् हें असं परस्पर भागलं ह्मणजे बरं. आपल्याला नको गुंतून बसायला. दोघा पोरींच्या करतां कोणी तरी दोन चांगली गब्बर कुळं गांठली ह्मणजे झालं. या कोतवालाच्या पोरापासून काय मिळणार? तें असो. पण हें बघ इतका वेळ त्या मेल्या जगदेवाला महाराजांनीं वाड्यांत ठेऊन घेतल्याची जशी त्या पोरीपुढं बतावणी केलीस तशीच आत्तांहि कर. समजलं? ह्मणावं, "महाराजांनीं त्याला जेवायला मुद्दाम राहून घेतलं आहे. अन् मला असं सांगायला सांगितलं आहे कीं, "सोमवार सोडल्याबरोबर लागलेंच लावून देतो त्याला. वाट नका पाहत बसूं." आणखी त्या जगदेवाची महाराज इतकी कांहीं स्तुती करीत होते ह्मणून सांग कीं ज्याचं नांव तें!

तुझ्या जिभलीवर अमृत आहेच ह्मणा ओतलेंचं अगोदर. तुला नकोच सांगायला–तरी पण आपलं सांगितलं. अरे पण हें पहा लाल साहेबानां तिनं जगदेवाचा सांगितलान तसा पोषाख करून यायला सांगितलंस कां?–कां विसरलास?

तुळशा०–तें कसा विसरेन? लाल साहेबानां असं असं सणग आहे ह्मणून सांगितलं मात्र, तों त्यानां काय आंतल्या आंत अगदीं गुदगुल्यावर गुदगुल्या होऊं लागल्या! अन् त्यानीं डोळे मिचकून-मला जे कांहीं गमतीदार प्रश्नावर प्रश्न विचारले ते तर कांहीं विचारूंच नका.

वसंती०–काय बोवा ते असे प्रश्न?

तुळ०–स्वारी अगदीं कुलकुलीत येऊन मला ह्मणाली कीं ती—

पद.

ठेंगणी कां ठुसकी, बोल् बोल् कशी आहे
चिमखडी बिजली। आहे नाजूक सडक पातळ,
कां अंगानं भरली॥ गोरी गोरी पान जशी
केतकी फुलली। लाली लाली लाल जशी
कुसुंब्याची लाली॥ नजर बेजार, करि वार,
काय चमकत जशी तरवार। बोल बोल पो-
फळी बाग फुलली, का नारिंगि मोहो-
रली॥ ठेंगणी० बोल् बोल् इ० ॥ १ ॥

असं ह्मणून स्वारीनं जी माझ्या पाठीवर एक थाप मारली ती कांहीं विचारूं नका.

वसं०–एकंदरींत स्वारी फारच खुलली आहे ह्मणायची तर आज!

तुळ०–तें कांहीं विचारूं नका. स्वारीच्या प्रश्नांना योग्य उत्तरं देऊन मी जशी परत यायला लागलो तशी हें (दागीना दाखऊन) माझ्या हातावर ठेवून स्वारी ह्मणाली:–" आमच्या बुलबुल पक्ष्याला ह्मणावं:—

पद (सुजात इमे गांयङ्गा या चा०)

वयांत हा लालजी, अन् तूंही भरलीस वयांत।
खावंद, हुजूर, कोतवाल, ह्मणती।
आहे काय कमती माझ्यांत ॥ १ ॥ वयांत० ॥
पांच, हिना, अत्तर, गुलाब, वाळा।
चमेली, मोगरि, एक जात।
फांसून रंगून करूं गरदी।
चल् बेशक दिनरात ॥ २ ॥ वयांत हा० ॥

असं ह्मणून स्वारीनं ही अत्तराची पेटी माझ्या स्वाधीन केली. अन् मला सांगितलं, तुळशीरामबोवा, तिथली सगळी व्यवस्था तुह्मांला ठेवली पाहिजे.

वसं०–आणि हा दुसरा डबा रे कसला तुझ्या हातांत ?

तुळ०–हा डबा आहे दागिन्यांचा. यांत नुसतं जवाहीर आहे. तिला नक्षत्रासारखी फुलिवली पाहिजे यांतील जवाहिरानं, असा हुकूम झालाय आपल्याला. (डबा देतो)

वसंती०–आजपर्यंत स्वारीकडून एक छदामहि आला नाहीं. त्या सगळ्याचा वचपा घेऊं काढून आतां! एकंदरींत स्वारी आज फारच हुरळली आहे तर! छेः असं फार वेळ बोलत राहून नाहीं उपयोगी इथं. उगीच संशयाला कारण. आत्तांच फिसकटून बसायचं सगळं! मी जाते तर आतां. पूजा झालीच आहे. जेवणखाण आट-

पून त्याचीच वाट पहात बसते. त्याला नीट बेतानं घेऊन ये. आणखी त्याला ह्मणावं तूं आल्याबरोबर कांहीं तरी मीष करून मी दिवा मालवून टाकीन, त्याबरोबर तूं तडक्‌दिशीं नेहेमीच्या खोलींत शीर आणि आंतून कडी लावून घे. कारण पात्र जरा घरगुती आहे, समजलं? चुकूं नको हां! (जाऊं लागते, व फिरून परत येऊन) हो पण, मी विसरलेंच होते कीं अगदीं! मी जाते आतां. तूं तसा तिकडून बाहेरून आल्याचं सोंग करून जगदेवाला महाराजांनीं आग्रह करून जेवायला ठेऊन घेतला ह्मणून सांग. जा, जा तर.

(दोघे दोन्हीकडे जातात. ती जातां जातां—)

पद. (हे मना या. चा.)

सुंदरीं, आजि मम करीं, आलि ही खरी,
वेळ बरी आली । ही तिलोत्तमा । खास चालुनी आली ॥ १ ॥ लक्ष्मि ती, चालुनी घरीं,
येत जर तरी, काय दवडावी । मूर्खपणाची
जोड पदरिं घ्यावी ॥ २ ॥

(जाते.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—कोतवालाचें घर.

प्रवेश—(कोतवालपुत्र लालजी व त्याची स्त्री सगुणा)

सगुणा—नाहीं पण आज हे इतकं सजून कुठं जायचं बाई! आणि तेंहि अशा रात्रीचं.

लाल०—त्याची पंचाईत तुला? हा लालजी आजकाळ इथला राजा आहे. ती नथ दे काढून. आणि तो रत्नहार आण इकडं.

सगु०—घरांत सासूबाई काय ह्मणतील मला?

लाल०—काय ह्मणणार काय ती? सांडला ह्मणून सांग ह्मणजे झालं.

सगु०—ह्मणजे! इकडं देऊन संवरून आणि खोटं बोलूं वर? मी नाहीं बाई देत हे.

लाल०—नाहीं देत? (मारून काढून घेतो व पोषाखाचा जम पाहून बदामपाक खातो, व मद्याच्या सुरया झोडतो.)

सगु०—

पद. (ब्यांडची चाल.)

जगांत एक देव स्त्रीस पति खरा ।
सतीस त्याविणें नसे मुळींच आसरा ॥
मद्यपी जरी पती जुगार द्यूत खेळतो ।
सतीस तोच सत्य देव, लोकिं जरिहि निंद्य तो ॥ १ ॥
विश्वनाथ! मत्पतीस सुमति देशि तूं जरी ।
तरीच या जगीं असे सुगति मजशि ती खरी ॥

अरे, अरे! काय हा भयंकर सपाटा चालिवला आहे आज? हा गांजा आणि ही दारू यानीं कहर दिलाय उसळून आज.

लाल०—(" बयांत हा लालजी० " इत्यादि पुटपुटतो.)

सगु०—(जवळ जाऊन) पुरे बाई, काय हें अगदीं बेसुमार चालिवलंय आज!

लाल०—चल् चल् मोठी शिकवायला आली आहे

मला! (मद्याची बाटली घेऊनें दुसरीकडे कपाटापाशीं जातो व दारू ठोसतो.)

सगु०—छेः बाई आज ताळ सोडलाय अगदीं! काय आहे समजत नाहीं! पुनः पेला, अरे देवा काय हें—

पद. (क्षणभंगुर संसार या. चा.)

मदिरा दुःखद फार ॥ खरोखर ॥ घडवित ही अविचार० ॥ तन, मन, बुद्धी भ्रष्ट करे ही मळवी धर्माचार ॥ मदिरा० ॥ लज्जा, अब्रू, मान, सुकीर्ती, करि ही सर्वहि ठार ॥ मदिरा० ॥ रावातें ही रंक करुनिया फिरवी दारोदार ॥ मदिरा० ॥ निर्मल कुलही, मळवुनि करि ही सकलाहि भ्रष्टाकार ॥ मदिरा० ॥

(जवळ जाऊन) हें पहा, आज किनई वर सोडून तरी जाऊं नये कुठं बाहेर. लोकं हंसतील ह्मणून ह्मणतें—

लाल०—

पद. (ओबदकार या. चा.)

वाह अकल! वाह अकल! मला हंसतील, मला हंसतील, ॥ चल चल, पळ पळ, झट्पट् इथे राहशील तरी मरशील ॥

सगु०—(हात जोडून विनयपूर्वक) नम्र दासि प्राण-
नाथ कोप न करा हा आज ॥ १ ॥

ला०—(तिचे हात फिसकाडून) वाह अकल! वाह
अकल! मला हंसतील० ॥ इ०

———

प्रवेश ६ वा.

स्थल—वसंतीचे घरचा दिवाणखाना.

प्रवेश—वसंती, चंद्रा व सुंदरा तिच्या मुली, व तुळशीराम

चंद्रा— (वसंतीस) आई, अजून कसा येत नाहीं ग तुझा भाचा!

वसं०—माझा भाचा! ह्मणजे—जसं तुझं अन् त्याचं कांहीं नातच नाहीं लागत तर?

तुळ०—(लगबगीनें येऊन) बाईसाहेब, वीरसिंह जगदेवराय आले.

वसं०—पाह्यलंस शंभर वर्सं औक्ष आहे जगदेवाला. तूं आउवण काढायला आणि तो यायला एक गांठ. (एकीकडे) अर्धशिशीच्या निमित्तानं इथले दिवे नाहींसे केले आहेत हें एक बरंच झालंय.

[सर्वजणी चटदिशीं उठून त्याला सामोऱ्या जातात. व वीरमती विनयानें व लज्जेने दिवाणखान्यांस लागून असणाऱ्या खोलीच्या दरवाज्याचे आंत होते.]

(दासीस) अग चांगुणे, पुढें कर अंमळसा तो दिवा.

[दासी जिन्याशीं दिवा नेते, तो दिवा जात; इकडे वीरमती खोलींत जळत असलेलें शामदान आणण्यास जाते, तोंच लालजी एकदम खोलींत शिरतो व आंतून कडा घालून घेतो; वसंती वगैरे बाहेरून कड्या लावतात, व जाऊं लागतात.]

वसंती, चंद्रा, व सुंदराः—(वसंती पुढें, तिच्या उजव्या खांद्यावर चंद्रानें डावा हात ठेवला आहे, त्याचप्रमाणें सुंदरानें चंद्राच्या ठेऊन त्या तिघी दुसऱ्या बाजूनें जात आहेत.)

लावणी.

आह्मीं बाजारच्या कसबिणी
कुणा कळे आमची करणी? ॥ धृ ॥
गरती गरती मायुक पोरी आणतो फुसला-
वुनी। भोळ्या भाबड्या सुंदर ललना आणतो
कशा घेरुनी। टांकुनि जाळी मैना अचानक
धरतो फांसा मधिं अडकुनी। पोपट पंचरंगी
किति येति इथं पंख फडफडुनी ॥ खरं पुसाल
तर नाहीं खरं आह्मा कुणी घरधनी ॥ देतिल
पैका मोजमोजुन तेच आमचं धनी। परि
कदान् कदा हे फुकटे शिपाई होतात आमचं
धनी ॥ आह्मीं बाजार०-

(जातात.)

(जाळीचा पडदा वर होतो.)

वीरम०—छेः शंकाच नको आतां. घात केलान रांडेनं. कोण मानभावी पणा तरी! भाचेमुन केलीन मला भाचेमुन! कुठली बुद्धी झाली मला तिथुन ह्या असल्या वेस्वांच्या बरोबर यायची! मी नव्हतेंच येत. पण तिनं भाचेमुन ह्मणून-नातं लावून-काय भुरळ पाडलीन मला? अरे देवा! कुठं येऊन पडले रे मी ही इथं!

पद. (मेरे गमका तराना या. चा.)

कोणी त्राता न मशीं, पडत फशीं, हाय रमा-
धवा! ॥ मज एकलि अशी, त्यजिलि कशी,
मी वनवासी हाय रमाधवा ॥ हा काळ, कीं
व्याल, धरित विष जलाल ॥ काढूं कैशी वेळ
ही ऐशी नशिबिं काय हाल ॥ रमाकांता हि

दासी, ऐशी वनवासी, पडत फर्शी आज ॥
हाय ॥ रमाधवा कोणी त्रा० ॥ १ ॥

लाल०—कां ! विचार कसला चालला आहे इतका ! उभं रा-राहून पाय दुखुं लागले असतील. (असें म्हणून एक मद्याचें बदकाचे आकाराचें चिनी भांडें मेजावर ठेवतो.) मला ठाऊक आपल्याला श्रम होतील म्हणून, आणि म्हणूनच हें गुलाबी शराब समरकंदहून मुद्दाम आणिवलेलं आहे. मजा पण मजा आहे नुसती. नुसत्या स्वादावर नागासारखं डुलत राहावं. कां आतां उशीर कां तर ? आपल्याच्यानं नाहीं बोवा आतां धीर निघत !

वीर०—(तो तिच्यापुढें जातो व ती मागे मागे सरते.) हं खबरदार. तुह्मी कोण मी कोण याचा कांहीं विचार ?

लाल०—सगळ्याचा आहे विचार ! उगीच ओढून किती आणतां बुआ आतां ? या वसंतीला आपल्यासारखं रत्न पैदा करायला सांगून आज किती दिवस झाले ! तो योगायोग हा आज आला.

वीर०—म्हणजे ? दुसऱ्याच्या गरत्या बायकांना फसवायचं आणि त्यांच्या आणि आपल्या अब्रूची राखरांगोळी करायची हाच कां आपला धंदा ? तुह्मांला आपल्या बायका बहिणी कोणी नाहींत वाटतं ?

लाल०—सगळ्या आहेत. पण तुझ्यासारखं एक पात्र कमी होतं तेवढं आज या वेश्येनं मिळवून दिलं ! तेव्हां—

वीर०—(आपल्याशीं) एकून खरोखरीच ही वेश्या तर ! तरीच इतकं हें कसब !

लाल०—आज धन्य समजतो मी आपल्याला. हं

चला तर. उशीर कां मग उगीच ? (तिचेजवळ जाऊन हनुवटीकडे हात नेण्याचा प्रयत्न करतो.)

वीर०–(दूर सरून उभी राहून) चार पावलं लांब उभे रहा. नाहीं तर जड जाईल. आणि याचा परिणामहि फार भयंकर होईल. सांगून ठेवते एकच—

लाल०–अशा प्रसंगीं हा असा प्रकार बिलकूल नाहीं उपयोगी. ही तुझी रमणीय मूर्ती पाहिल्यापासून माझी कांहीं विलक्षण स्थिति होऊन गेली आहे; हे पहाः–

बंजारा.

प्रिय सखे, सुचे नच आजी ।
सुंदरी, मला हो राजी ॥ धृ० ॥
प्रीत ही पहा तर माझी । मोहने लाल हा गाजी ॥
कर–पाशीं बांधी यातें । चुंबन-सुख दे मातें ॥

वीर०–(दूर सरून) मेल्या–
आग लागो, तुझ्या तोंडा, काय वच हें ?

लाल०–(जवळ जाऊन) चल्,
सखे हो राजी ॥ सुंदरी० ॥ १ ॥
सखि सोडिं सोडि विनयातें । व्यर्थ लाज ही शशि कांते ॥

वीर०–जीभ झडुनी, हात गळती, कां न तुझे ?

लाल०–चल् सखे हो राजी ॥ लौकरी मला हो राजी । सुंदरी मला० ॥ २ ॥

वीर०–आग लागो, तुझ्या तोंडा, काय वच हें, वदशि नीचा ॥
(तो पुढें जातो, ती त्यास झिडकारते) चल दूर हो–

लाल०—आजपर्यंत पुष्कळ पाहिलीं आहेत मीं असलीं सोंगं. हें कांहीं पहिलंच नाहीं!

वीर०पाहिलीं असतील. पण हें कांहीं सोंग नाहीं. चंडाळा तुला ठाऊक नाहीं कां हें कीं—

पद (शिरीं गंगा या चा०)

परस्त्रीची धरी इच्छा तया दंडी हरी जगतीं।
नसें ठावें काय नीचा मरति जे जे कुमति धरिती॥
रावणाचें काय झालें, सती सीता छळी कुमती।
द्रौपदीच्या छलानें त्या, कौरवांचे बळी पडती॥
इंद्र चंद्रा शाप मिळती, पहा धरितां मनीं कुमती।
धार–नृपती स्नुषा मी रे, सोडि कुमती,

लाल०— पहा सुदती॥
सखे आपुली जोडि जमली; मीच इथला खरा नृपती।
कोतवाली या पुरीची असे माझ्या पित्या हातीं॥

आहाहा! तर मग आजच्या आपल्या रंगाला कांहीं जोडच नाहीं. कारण—

धार–नृपती स्नुषा तूंगे, मीहि इथला खरा नृपती॥

चल दे दे तर मला एकदां घट्ट आलिंगन—

(दोघे ही मेजा भोंवतीं फिरतात. तो फार लगट करतो. इतक्यांत ती मेजावरील कट्यार घेऊन पुढें झटकते.)

वीरम०—हं लांब उभा रहा!

पद. (जा इवे राख, मुख नव भाख या. चा.)

जा चल जा, क्षण न रहा, नातरि हा, कठिण पहा॥ अवसर खचितचि कुटिल-कृती॥

लाल०–सुंदरी—

वीर०–वद न वचन, कृष्ण वदन दूर करुन जाई इयून ॥ नातरि ही कटियार । खुपसुन करते ठार ॥

लाल०–मत्प्राण, मत्प्राण, कासया, ऐटंग ही !॥१॥

(तो हात पुढें पुढें करूं लागतो.)

वीर०–दूर करि तव कर मलिन-मती ।
सम्मुळ मदन करिन कदन, करुनि हनन काळ-
सदन खास करिन हेंच । अनृत वच न हें ॥

एक पाऊल पुढें टाक कीं–(तरवार खुपसण्याचा आविर्भाव करिते.)

लाल०–आहारे, आहारे, आहारे, अवसान ! ॥ २ ॥

(तो तिचे हातांतील खंजीर एकदम झटकन काढून घेतो.)

वीर०–

पद. (मरण गणुनि या० चा०)

हाय, हाय, हाय, हाय ! वेळ येत आज काय ! ॥ ध्रु० ॥ रक्षि कोण मजशि येथ ॥ शस्त्र तेंहि, नीच घेत ॥ धीर कवहि मज न असत ॥ हाय हाय० ॥ १ ॥ हाय योजुं युक्ति काय ॥ कसाई हातिं जेंवि गाय ॥ तेंवि येत कठिण समय ॥ हाय हाय० ॥ २ ॥

(विचारयुक्त) छेः असा विचार करीत राहण्याची ही वेळ नव्हे. इथं कांहीं तरी युक्ती लढवून ही कट्यार अन् समशेर आपल्या हातीं येईल असं केलं पाहिजे.

आणि ह्या स्वारीला निशेनं धुंद होऊं देऊन मग जसा प्रसंग पडेल तसं वागावं; हो, असंच तर मग.

लाल०–कां विचार कसला चालला आहे?

वीर०–छेः विचार कसला? इथं यायचं तें देखील बरोबर समशेर आणि कट्यार घेऊन, हें जेव्हां पाहिलं तेव्हां ह्मटलं जरा विनोदच करावा आतां. पण इतकावेळ मी केलं हें सारं खरं वाटलं ना?

लाल०–पहिल्या छूट मी ताडलं कीं हें सारं सोंग आहे ह्मणून. पण ह्मटलं न जाणो! तर मग–आपण मात्र एकून ही अशी गंमत करून रंग आणलांत आज बहारीचा.

वीर०–हो. ह्मटलं अशी कांहीं गंमत केल्याशिवाय बरोबर रंग नाहीं यायचा.

लाल०–(मद्याचा पेला घेऊं लागतो) ह्या रंगांत हा रंग मिसळला ह्मणजे फार बहार उडेल.

वीर०–हो असं तर खरंच. आणि मलाहि पण हेंच पाहिजे होतं (एकीकडे) आपला कार्यभाग उरकून घ्यायला. या नीचाला हें मद्य पाजतें अगोदर आणि मग पुढचं पुढं.

ला०–मग उशीर कां तर!

वी०–उशीर कसचा? पण गडे, मला किनई एक विचारायचं आहे अगोदर.

ला०–विचारा काय विचारायचं आहे तें.

वी०–इतकंच विचारायचं कीं आपल्याला घरीं कोण-कोण आहेत. लग्न झालं असेलच!

ला०–घरी कां? आई आहे, बाप आहे आणि बायको आहे.

वी०—आणि ती ही पण आपल्या रूपाला साजेल अशीच असेल नाहीं?

ला०—साजेशी ह्मणून केली होती पण आमचं तिचं जुळत नाहीं. पण हें विचारण्याचं कारण?

वी०—कारण इतकंच कीं न जाणो ह्मटलं फिरली तब्येत, आणि सदोदित घरींच बसायचं झालं अथवा दुसरी भेटली कोणी एखादि रंभा, तर झालंच कीं नाहीं मग आमच्या साररूयांच्या जन्माचं मातेरं. ह्मणून ह्मटलं ठाऊक असावं सारं (विचार करीत उभी राहते) (एकीकडे) ह्याच्या हातांतून हा खंजीर आणि ही कंबरेला लटकलेली समशेर कशी दूर करावी?

ला०—कां? विचार कसला चालला आहे?

वी०—विचार कसचा? आमचं बायकांचं मन, एकदां नाहीं शंभरदा मनांत येतं कीं, देवा हें लाभेल कीं नाहीं शेवट पर्यंत आपल्याला? अन् दुसरं काय?

ला०—एवढंच ना? छे: वेडी नाहींतर! ह्या बद्दल मग माझ्या कडून लागेल तसली शपथ घे. मग तर झालं कीं नाहीं?

वी०—मग बरीक नाहीं हरकत.

ला०—तुझ्याच गळ्याची शपथ तर. जों पर्यंत माझ्या जिवांत जीव आहे तों पर्यंत तरी तुला नाहा दगा देणार मी. आतां तर झालं. च–च–च–चला तर–या पाहूं आतां (दारू ठोसतो.)

वी०—ही आलेच, पण ह्या वेळीं ही समशेर आणि ही कट्यार काय करायची आहे बाई जवळ? (काढून एका बाजूस फेकून देतं) पण हें आपल्याच हातानं काय बाई? (वी

पेला भरते) अगोदरच स्वारी झिंगलेली दिसते आहे. समरकंदी का फिमरकंदी आणली आहे ह्मणाला नाहीं? तीच पाजते स्वारीला यथास्थित. हं हें घ्यावं. (देते)

लाल०– (चाचरत) अ–अ–अ–अगोदर तूं–तूं घे. मी पु–पु–पुष्कळ घेतलंय घरीं–तर अगोदर तु–तु–तू–तुह्मी घ्या.

वीर०–मी घेतेच ह्मणा. पण अगोदर सुरवात होऊंदे इकडूनच. हो इतक्यांतच काय डोळणं जड येऊं लागलं?

लाल०–कुठं आहे? मी सांगितलंना एकदां तुह्मांला कीं मी घरून निघतानांच फार घेऊन आलोय ह्मणून.

वीर०–अस्सं! मला वाटलं कीं मी पहिल्यांदाच शब्द टाकते आहे तो तरी खचीत नाहीं खालीं पडणार. पण माझं नशीबच तसलं त्याला कोण काय करणार?

लाल०–ओः हो. एवढ्याच करितां जर आमच्यावर राग होत असेल तर एक नाहीं दहा पेले घेतो मी. मग तर झालं कीं नाहीं? चला आणा. अशा गुलनार हातानीं भरून दिल्यावर कोण घेत नाहीं ह्मणेल? (पेला घेतो. तों ती पुन्हा दुसरें मद्य त्यांत ओततें.) हें काय बुवा आणखी?

वीर०–काय ह्मणजे? हें तर आपण येणार ह्मणून मुद्दाम तयार करून ठेवलेलं. याचाहि मासला पहावा थोडा.

लाल०–(पितो व आपण स्वतः एक पेला भरून तिला देतो) आतां तुह्मीं घ्या हा एक.

वीर०– (ती हातांत घेते व दुसरा त्याचे हातात देते.) आहाहा काय स्वाद आहे! हा माझा ह्मणून घ्यायचा एक!

हा मासला कांहीं निराळाच आहे. (ती आपला पेला ओतून टाकते.)

लाल०–(दारू पीत असतां)

पद (पिओ पिओ जी)

अहा अहारे दारू ! गुंगवी मन ।
किति गुंगवी मन, किति गुंगवी मन ।१। अहा०।
प्यालेचे प्याले हे खुशीसे उठावूं ।
मला सखे दे भरुन भरुन ॥ २ ॥ अहा० ॥
बदाम, पिस्ते, मिश्री, पचाऊं ।
बीजबंद करुं मधुन मधुन ॥ ३ ॥ अहा० ॥
शमरकंदी शरबत घुटाऊं ।
जागा करी मधु मदन मदन ॥ ४ ॥ अहा० ॥

[वीरमती त्याच्या पेल्यांत वरचेवर दारू भरते व तो पितो.]

पुरे करा बोवा आतां हें ! तुमचा हा एक पेला केव्हांचा चाललाय, अजून सरत नाहीं तो ! (पेला खालीं ठेऊन कोचावर लोळूं लागतो व मध्येंच एकदम उठून बसून) हे बघ, आतां नाहीं धीर निघत आपल्याच्यानं तर—

पद (पिऊले दारुडा या चा०)

अधरपान दे । सूंदरी अधरपान दे ॥
हरिण नयन चंचल हे । करिति मजशि ठार ॥
वार मजशिं सहति न हे । स्फुरति मदिय ओष्ठ
फार ॥ १ ॥ अधर० ॥

वी०–नीचा, नीट शुद्धीवर ये. काय बोलतोस तूं हें ?

ला०–दुसरं काय बोलतो मी ? चल आटप–

मदिय कंठिं स्वकराचे । घालि सुदति रुचिर हार ॥
धरि दृढतर मज हृदयीं । हो तरि तनु गार गार । २ ।
पाजुनिया अधर–सुधा । वारि अदय मदन मार ॥
आलिंगुनि कडकडुनी । टाक हरुनि ताप भार ॥ ३ ॥

वी०– (आपल्याशीं) ही स्वारी अगदीं बेतावर येत चालली. तर आतां उगीच वेळ गमावून नाहीं उपयोग! अगं वीरमती, विचार कसचा करते आहेस उगीच! तो जंबिया घे अगोदर आपलासा करून. आणि वेळ पाहून तुला काय ध्यायचं तें घे उरकून! करूं का नको असा विचार करीत बसलीस, कीं फसलीस ह्मणून समज!

ला०–या पुढं कोणचा गध्धा धीर धरील?

वी०– (पळत आवेशानें जावून खड्ग व कट्यार उचलून) छेः धीर सुटायचीच वेळ आहे ही! पण आतां हे हातीं आलं आहे–

पद (सज्ज करुनि चाप० या चा०)

हेंच खड्ग साह्यकारि होत अर्जि मला ।
पुण्य कर्म, कीर्ति, सुकृत, साह्य तशि मला ॥ धृ० ॥
कंप सुटुनि खड्ग गळत । मन तैसें अधिरि होत ॥
नकळे मज काय घडत । निश्चय परि मुळिं न चळत ॥
मम शुचिता देत धैर्य, अतुलशा बला ॥ हेंच० ॥ १ ॥

ला०–कां? विचार कसचा चालला आहे? पुनः आली वाटतं मवाची लहर!

वी०–लहर! नीचा अजून तरी शुद्धिवर ये. तुझ्या सारखी मी निसवले नाही. मला माझ्या अब्रूची आणि कुळाची चाड आहे.

लाल०—मग इथं कोण बसलय तुझी बेअब्रू करायला?

पद (भांबा पावा गणपति. ब्यांडची चाल.)

चल ये, चल ये झडकरि । कंठीं टाकी निज
कर ॥ रचि नव हार । चल झट मिठि मज
मार मार मार ॥

वीर०—जारा, परकिय दारा मनिं गणि भ्रष्टा
फणिसम—खास खास खास ॥
दृष्टी अंधचि सुचवित चार । लवकर त्यज हे
मलिन विचार। नाहीं तरि गति नीचा नच
बरि जाशी निसवुनि—फार फार फार ॥

लाल०—सखये नत हा तवपदिं । पाही पाही
मम स्थिति ॥ स्मर-शर घाय। सहवत नच
मज हाय हाय हाय ॥

वीर०—चंडाऽळ चंडाऽळ पापीऽपापीऽकरि तव
शिर हें—दुर दुर दुर ॥ (ती खास लाथ मारते.)

लाल०—फा—फा—फार झाली आहे वाटतं दारू?
आणि ह्मणून हा पतिव्रतेचा आव घालते आहेस? भर
छिनाल वाड्यांत हें असलं पातिव्रत्य काय उपयोगी?

निर्लज्जे तूं असशि छिनाल ।—मुलखाची—

वीर०—जिव्हा झडुं ही तव चंडाळ। मांगा, करि
तव मुख हें दुर दुर दुर । नातरि रडशिल
धाय धाय धाय ॥

ला०—वश हो, लवकरि सुंदरि । नातरि होइल
तुजवरि ॥ बळजोरी खास ।

वीर०–मर तर, मर तर, ठार ठार ठार ॥ पाही
पाही यमपुरि नीचा–अधमा–पाप्या घे उरिं–
वार–वार–वार ॥ (ती त्याचे छातींत वज्यार खुपसते.)
घे उरिं नीचा खड्ग जलाल । बघ हें रक्तें लाल
लाल लाल ॥ पाही यमपुरि, नीचा लवकरि,
मर तरि मर तरि ठार ठार ठार ॥ पाही० ॥

लाल०–(तडफडतो.)

आ आ अअअअ, आ आ अअअअ,
आ आ अअअअ राम–राम–राम–

वीर०–(हातांत शस्त्रें असलेली व खून चढलेली अशी उभी राहते.)

[पडदा पडतो.]

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ–वसंतीचें मंदिर, व रस्ता.

प्रवेश–वसंती, कोतवाल, शिपाई वगैरे, माडीवर वीरमती.

वसं०– (कोतवालास) ती पहा खिडकी उघडी आहे. तिथून तेव्हांच चढून जातील तुमचे लोक आंत. (वीरमती खिडकीशीं येते) आणि हीच ती वेळा!

कोत०— (वीरमतीस) अगं ए छिनाल रंडी, खोलीचा दरवाजा खोलतेस कीं नाहीं? माझ्या पोराचा खून करून त्याची मोट बांधून तूंच त्याला खिडकी खालीं टाकून दिलास नाहीं? (शिपायांस) अरे, काय बघतां काय? शिडी लावा आणि चढा भराभर! (तिला) थांब, पाहतो आतां तुझा तमाशा! (शिपाई शिड्या लावितात)

वी०— (लालडोळे झाले आहेत व करकरा दात खात आहे अशी) या, या मेल्यानों कोण कोण येता ते—

पद (रामाशि अनकुल या चा०)

पातिव्रत्याचि साक्ष असें मज, खड्गाहि देवें मज दिधलें हें। पातिव्रत्या पासुनि कधिंही रज-पुत कन्या भ्रष्टचि नोहे ॥ येतां चढुनी कंठा खड्गें तोडुनि स्नानां घालिन रक्तें। औक्षचि जरि तें सरलें असलें घालिल तरि विधि कोठुनि-मग तें॥ पतंग दीपीं जैसा वेंघे, येतां मृत्यू सहजचि तैसें। ओढुनि तुम्हां कर्मचि आणी; घडतें लिहिलें प्राक्तनिं जैसें ॥ पातिव्रत्याचि साक्ष सतीतें तिळभर अंतर यांत न होतें। कर्दन काळ गळ्यावर टांकिति मागुनि फांस पहा अधि त्यांतें ॥

(ते शिपाई शिडीवरून वर चढून जातात, ती त्यांजवर वार करिते व ते पटापट मरून पडतात.) या आणखी कोण कोण येता ते!

कोत०— (शिपायांस) अरे बघतां काय, खिडकी

टाका फोडून आणि शिरा आंत मराभर. धिंड काढली पाहिजे रांडेची!

गिरि०– (आपल्याशीं) चंपावती राणी साहेबानीं पट्टणच्या दरबारीं आपला भाऊ धीरासिंह ह्मणून असतो त्याला पत्र देऊन जगदेवा संबंधानं सारं त्याच्या कानावर घातलं आहे. जगदेवाला ह्मणावं मी नांवचा गिरिधर आहे, चंपावतीच्या सांगण्यावरून आलो आहे इथं तुमची पाठ पुरवायला. (मोठ्यानं) अहो कोतवाल साहेब, (जगदेवास दाखवून) आ अदमी ओ बटीकका साथीदार है, जब इसकू दम देईंगा तो ओ छिनाल बशक दरवाजा खोलेंगा. और नही!

कोत०– (जगदेवास शिपाई धरूं पाहतात; जगदेव समशेर उपसतो; तें पाहून शिपायांस.) अरे कचरता काय असे? निःशस्त्र करा अगोदर त्याला.

जगदेव०–(शिपाई निःशस्त्र करूं पहात असतां त्यांस.) माझ्या पुढं जो येईल त्याचे तुकडे पडतील! (गिरिधरास पाहून आपल्याशीं) हा तर हरामखोर गिरिधर. ह्याला मायजीनीं पाठिवला वाटतं इथं माझ्या मागोमाग?

कोत०--भिता काय असे? बेहिमती नाहीं तर–बघता काय, गराडा द्या त्याला. (शिपाई गराडा देऊन उभे राहतात.)

[सिद्धराज जैसिंग, बक्षी ऊर्फ सेनापति, व इतर सरदार येतात.]

एक शिपाई:–हं, बाजूस हटा बाजूस. कोतवाल साहेब, आपल्या शिपायांचे खून पडल्याची बातमी आपल्या सिद्धराज जैसिंग महाराजांच्या कानावर गेल्याबरोबर ते बक्षी व इतर कांहीं सरदार यांसह इथें आले आहेत.

कोत०–(शिपायांस) अस्सेच उभे रहा त्याला गराडा देऊन. जातो कुठें हा इथून !

भालदार चोपदारः–(ललकारत आहेत,)

कवित्त.

पट्टणपूर कृपाळ नृपाळ चमकत चंद्र जसा नभमंडळीं ॥ धरि शिरपेंच शिरावरि रम्य, विलसित कर्णयुगीं वर कुंडलि ॥ देखुनि शौर्य, सुवीर्य सधैर्य, रिपुगण कल्पिति ज्या यम भीषण ॥ कोणि न दान प्रदानिं समान नृपवर कर्ण जणूं जगभूषण ॥ दीन जनांस दयाळ मवाळ, अरिकुल काळ कृतांत निकंदन ॥ वंदुनि त्या सुयशास बराच जो नृप मांडलिक कृतवंदन ॥

[राजास सर्व अदबीनें मुजरे करितात.]

राजा०–कोतवाल, कोणच्या औरतीनं खून पाडलेन ? आणि (गराडा पाहून) हें काय आहे प्रकरण ?

कोत०–महाराज, ती खुनी औरत त्या खोलींत आहे. बडी बदमाष, छिनाल आहे रंडी ! आणि हा तिचा साथीदार आहे असं बारीक तपासावरून समजतं. आणि संशयावरून याला धरूं लागतांच हा समशेर उपसून उभा राहिला. त्यामुळें झाला गराडा—

बक्षी०–(जगदेवास ओळखून) आणि तुह्मी कसे इथें आलांत ? (राजास) हेच आमचे पाहुणे. काल ज्या शूर पुरुषानें माझे प्राण वांचविले ह्मणून सांगितलें तोच

हा पुरुष. (शिपायांस) चला दूर व्हा. (जगदेवास भेटून त्याला) हे आमचे महाराज.

जग०–(मुजरा करून) तुमचे कोतवाल वाटेल त्याला निष्कारण पकडतात–

राजा–तुम्ही इथं नवखे दिसला ह्मणून संशयानें तुह्मांला धरलं असेल!

कोत०–खून करणाऱ्या औरतीच्या साथीदाराला खुला करायचा! ह्मणजे आहे काय हें? त्या औरतीनें हा वेळपर्यंत नऊ शिपायांचे खून पाडले आहेत!

गिरिधर–(स्वगत) आतां मात्र इथं राहण्यांत अर्थ नाहीं. आपला मागच्यामागं पाय काढावा हें उत्तम.

(लपतो.)

एक प्रेक्षक:–(पुढें येऊन) महाराज, तिच्या बोलण्यावरून ती कोणी रजपूत कन्या असावीसं दिसतं; आणि आपलं पातिव्रत्य रक्षण करण्याकरितां आपल्यास हे खून करावे लागले असं ती ह्मणाली. तेव्हां महाराजांनीं तिला अभय दिल्यास ती कोण कोठील हें महाराजांनाच कदाचित् ती सांगेल ऐका–तीच बोलते आहे कायससं—

वीर०–(" पातिव्रत्यचि साह्य असे मज " इ० पद्य ह्मणते.)

बक्षी–(आपल्याशीं) ही आमच्या पाहुण्याची तर स्त्री नसेल! (राजास) यावरून मला असं वाटतं कीं महाराजांनींच जर हिला अभयवचन देऊन दार उघडायला सांगितलं तर उघडील ती कदाचित्!

राजा–ठीक आहे. (वीरमतीस) मुली, तुला अभयवचन आहे तर हें सांग पाहूं–

पद. (सदय हृदय अदय या. चा.)

जनक, जननि, कवण असति वसति कवण
देशीं ? ॥ कांत कोण, श्वशुर कोण, होशि कां
विदेशी ?

वीर०–जनक राजराज नृपति, जनक जो प्र-
जेशीं ॥ श्रीजसिंग बंधुराज पूर्ण धैर्यराशी ॥
उदयनाथ धार-नृपति श्वशुर असति ईशीं ॥
कांत सहित येथ येत चुकुनि हो विदेशी ॥

राजा–कुटिल वार–वनिता गृहिं सांग कैशि येशी ?।
स्वजन वधुनि घोर कर्म काय आचरीशी ?

जग०–(एकीकडे) काय ? तर मग हे वारवनितागृह ! शिव शिव ! (दांत ओठ खातो.) बरं पण ही काय ह्मणते आहे आणखी—

वीर०–येथ कुटिल वारयुवति पूर्ण पापराशी ।
कपट वचन वदुनि लावि फांस हा गळ्याशीं ।
सर्व खळां वधुनि आज पाळिलें व्रतासी ॥

आणि याहि पुढं—

अधमाधम येउत कुणि ठार करिन त्यासी ।
जोंवरि मत्कंठि प्राण—स्मरुनि प्रियकरासी ॥
जोंवरि समशेर करीं—बधुनि दुर्जनासी ।
साध्वीव्रत पाळिन मी फेर मुळिं न यासी ॥

राजा–बरं पण तुझे पती कुठं आहेत ?

वी०–याच नगरिं नाथ चुकुनि होत मी विदेशी ।

सर्वसाक्षि श्रीश हरुनि सकल संकटासी ॥
भेटवील प्राणनाथ दंडुनी खलांशीं ॥ १ ॥

राजा—ठीक आहे तर, दार उघड मी तुझ्या पतीचा शोध करवून त्यास आणतो. तों पर्यंत तूं माझ्या बरोबर राजमंदिरीं चल, उघड दार.

वीर०—दार उघडूं? छेः तेवढी गोष्ट सोडून मी काय वाटेल तें ऐकेन. पण प्रत्यक्ष तिकडून येणं झाल्याशिवाय मी साफ नाहीं दार उघडायची!

बक्षी०— (जगदेवाशीं कुजबुजत असलेले) जगदेवराव, व्हा आतां पुढं (राजास) हे धारच्या उदयादित्याचे पुत्र जगदेव. हेच हिचे पती. (राजाशीं बोलत उभा राहतो)

जगदेव—(दरवाजा जवळ जाऊन.)

पद. (अंदर आवो नाथ या चा०)

सुंदरि उघडी दार। लौकरी-सुंदरि उघडी दार।
प्रियसखे तुज छळिलें फार ॥ ध्रु ० ॥
पाहि सखे हा नाथ तुझा गे ॥

वी०—खरंच कां पण हें?

ज०—हीच का शंका?

शंका सोडुनि सर्वहि वेगें ॥ ये बाहेरी उशीर कां गे ॥ अंतरिं हुरहुर कितितरि लागे ॥ चल ये झडकरि भेटूं दोघे ॥ झट टाकी कंठीं हार ॥ १ ॥ सुंदरि ० ॥

वीर० (जगदेवास पाहून चकित होऊन संभ्रमानें दार उघडून.)

स्वामिंच बघते काय ! । नाथमम । स्वामिंच बघते काय ।

जग०—(तिचे डोळ्याकडे पाहून.)

संभ्रमें शिर भ्रमलें हाय! ॥ धृ० ॥
पाहि सखे हा नाथ तुझा गे। शंका सोडुनि सर्वहि दे गे। बावरशी कां आशि तूं सांगे। संशय-संभ्रम संहारी गे। चल, आलिंगन देउनि वेगें। करि गार सुतप्तचि काय ॥ २ ॥ (भेटतात)

वीर०—अगबाई—

खरोखर बघते काय। कांत मम। खरो०— ॥

पद (झिनी केसरीलो०)

किती घाबरिलें हो नाथा। किती घाबरलें ॥ धृ० ॥
लज्जा राखी हरी माझी। कुलटा करी घात ॥
वाट किती पाहीयली। अंतरीं तगमग तगमग होय ॥ माझ्या—अंतरीं तगमग तगमग होय ॥ १

जग०—

पद (कालंगडा—त्रिवट)

प्रियदयिते किति कठिण दुर्दैवें। छळियलें तुज या जगदेवें ॥ धृ० ॥ मीच सखे तुज टाकुनि गेलों ॥ दूषण दैवा मग कां द्यावें ॥ क्षमा करी तरि लीन तुझ्या पदिं—

वीर०—हें काय बाई—

भलतें सलतें कायं वदावें ॥ १ ॥

भलतच, जागा बघायला जायचं, आणि परत येईतों-पर्यंत अर मीच त्या कवळाळणीच्या भुलथापांना भुलून इथं येऊन अशी फशी पडलें तर यांत कुणाचा बाई अपराध? इकडला का माझा?

पद. (अंकिता पदांबुजाची दासी या चा.)

नाथा मीच खरी अपराधी । तरि करा क्षमा मज आधीं ॥ धृ० ॥ प्रियपति-चरणीं नत दासी ही । क्षमा करा अपराधी ॥ १ ॥ ही समशेर सुवीर्य धैर्य हे । देत हीच जयसिद्धी ॥ २ ॥ पहा फेंकिते नमुनि इला मी । कार्य सखी जी साधी ॥ ३ ॥

(तरवार फेंकून जगदेवास बिलगून) इथं असल्यावर आतां ही कशाला हवी बाई माझ्या जवळ.

जग०--तेंहि खरंच ! पण शूर लोकांच्या जवळ शस्त्र हें नेहेमीं पाहिजेच.

वी०-हें एवढं अस्त्र जवळ असल्यावर मग हीं असलीं क्षुद्र शस्त्रं काय करायची बाई !

[एकीकडे हा संवाद चालला असतां दुसरीकडे राजा वसंतीस हकीगत विचारतो.]

राजा-खरं सांग काय तें सर्व.

वसं०-सर्वस्वी अपराधी आहे महाराज मी. (असें ह्मणून सर्व वृत्त सांगते)

राजा-(साश्चर्य बक्षीशीं कांहीं कुजबुजून जगदेवाजवळ जातो.)

बक्षी०-आपली सगळी हकीगत महाराजानां मी कळविली. आपण--

जग०-(विनम्र होऊन) आपला आभारी आहे मी-

राजा-तर मग ज्या वीर पुरुषांनीं आपले प्राण वांचविले ह्मणून सांगितलेत त्यांची धर्मपत्नी ही ! आणि चुकामुक पडली होती ह्मणलंत तीहि त्यांची यांचीच तर ? एकंदरींत आपलं पातिव्रत्य रक्षण करण्याकरितां ज्या अर्थी हिनं हे खून केलेन त्या अर्थी-

पद. (झंपा.)

धन्य ही धन्य जगीं वीरमति कन्यका ॥
शूरक्षाति साध्वि ही वीर्यराशी ॥
सत्व जी रक्षि निज अर्पुनी प्राणही ॥
दुर्जना दंडुनी शोभते वीर-जाया ॥
धन्य मी धन्य इस पाहुनीया ॥
भाग्य जरि कन्यका हो मदीया ॥

मुली, आजपासून तूं आमची कन्या झालीस.

वीरम०–(जगदेवाकडे पाहून त्याचा नेत्रसंकेत समजून महाराजांस व इतरांस नमस्कार करून) आपण मला आपली कन्या ह्मणिवल्यावर आणखी काय पाहिजे !

राजा०–दिवाणजी, आमच्या ह्या अद्वितीय शूर कन्येला मेण्यांतून वसंत बागेंतील विलास-मंदिरांत घेऊन चला. तिथं आज राणीवसा जायचा ह्मणून सगळी तयारी आहेच. आह्मींहि येतो तिकडं इतक्यांत.

दिवाण–तयार आहे महाराज मेणा.

[वीरमति जगदेवाचा नेत्रानेंच निरोप घेऊन जाते.]

राजा–कोतवाल कुठं आहे तो? त्याला हाक मारा पाहूं इकडं. (कोतवाल येतो त्यास) काय रे, तुझं काय ह्मणणं आहे या बद्दल?

कोत०–माझं काय असायचं ह्मणणं महाराज? खुनाला खून हा घेतलाच पाहिजे!

राजा–खुनाला खून! चोरा! नेहेमी असाच उमदा न्याय करितोस तर एकून! जिनं आपलं पातिव्रत्य रक्षण करण्या करितां दुष्टांना शासन केलनं तिला हा कायदा! चाष,

हरामखोर नाहीं तर, (बक्षीस) बक्षीसाहेब, ह्याच्या हातापायांत जबरदस्त लंघर ठोकवून याला तुरुंगांतील अंधेऱ्या कोठडी खालील तळघरांत टाका. आणि ह्या कुलटेची सगळी चीजवस्त जप्त करून, हिची सगळ्या पट्टणपूर भर धिंड काढून, हिचा योग्य सत्कार करून हिला नगरा बाहेर हांकून द्या. (जगदेवास) वीरसिंह जगदेवराव, आपलं आणि आपल्या स्त्रीचं हें साहस आणि शौर्य पाहून आह्मांला अत्यंत आनंद झाला आहे. आपण इथं नोकरी करितां आल्याबद्दल बक्षीनीं मला सांगितलं; आणि त्यावरून मी तुह्माला आज पासून ‘ राजसंरक्षक ’ नेमिलें आहे. चला तर आपण आतां वसंत–बागेकडे जाऊं. (सरदारांस) पाहिलीत, कशी साध्वी आहे ती—

पद. (हरियश रंगी सज्जन संगी)

पतिरत साध्वी चरित्र दावी उपमा नच ज्याला ।
साक्षात् देवी वंद्यचि व्हावी कां नच जगताला ॥
पांचचि साध्वी परि ही सहावी ख्यात जगीं हो फार ।
अंतरिं धरुनी कीर्ती गावी सतिची वारंवार ॥
पतिरत साध्वी वंद्यचि व्हावी कां नच जगताला ।
मूर्तिमती ही साध्वी देवी ! पार न भाग्याला ॥
पातिव्रत्या साठीं साध्वी करि जरि जग संहार ।
हानि नव्हे ती सत्यचि समजा करि सति जगदुद्धार ॥

(पडदा पडतो.)

अंक ४ था समास.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थल–राजवाड्या बाहेरील चौथरा.

प्रवेश–भीमसिंग, क्रूरसिंह, आणि धीरसिंह बोलत आहेत.

भीरुसिंग०–कोणी कांहीं ह्मणो. आपल्याला तर नाहीं बोवा हें पसंत राजेसाहेबांचं करणं!

क्रूरसिंह०–अहो भीरुसिंग, तुमच्याच प्रमाणं आपल्यालाहि नाहीं हें पसंत! पण इथं तर निव्वळ सारा खुळ्यांचा बाजार माजला आहे!

धीर०–बाजार तर काय हो आणखी! आह्मी पिढीजात नोकर. ते राहिलों एकोचकडे! आणि ह्या हो कोण उपटसुंभ्या मध्र्येच? एक दिवस नाहीं दोन दिवस नाहीं, आज सात वर्षे झालीं, अगदीं फुकट पगार खातोय!

भीरु०–फुकट ह्मणजे काय हो? अगदीं फुकट! रोजच्या शंभर मोहरा ह्मणजे काय झाऊं काय?

क्रूर०–आणि त्याहि निव्वळ बसून, आणि राजेसाहेबांजवळ पडून ख्याली खुशालींत दिवस काढून!

धीर०–आणि हे सारे सोहळे कोणाच्या जिवावर? केवळ एका बायकोच्या! बायकोनं शूरपणा केला ह्मणून नवऱ्याला सरदारी! वाः काय न्याय! बरं, कांहीं भलतं सलतं उठवून ह्या स्वारीला हांणून पाडावं तरीहि पंचाइतराजाचा हा अगदीं पंचीप्यारा होऊन बसला आहे.

क्रूर०–तर मग तिच्याच संबंधानं कां नाहीं कांहीं वेडवाकडं उठवीत? ह्मणजे दोन दिवसांत आपल्या आपण स्वारीचे पाय सुटतील इथून!

भीरु०–वाः ही युक्ती बरीक नामी आहे.

धीर०–अहो, पण तिच्या संबंधानं असं उठिवणं तर अगदींच अशक्य. कारण एकतर पातिव्रत्या संबंधानं अगोदर ती गाजलेली, दुसरं राजेसाहेबांनीं तिला आपली कन्या ह्मणविली आहे, आणि शिवाय तिला मुलं बाळं झालीं असून त्यांच्यावर राणीसाहेबांचं आणि राजेसाहेबांचं विलक्षण प्रेम! त्यांचे रोज नवनवे चोजले चाललेले आहेत.

भीरु०–हो, हें नव्हतं माझ्या लक्ष्यांत आलं. तर मग तें अगदींच अशक्य! त्यांच्या विरुद्ध एक शब्द काढणं–

धीर०–शुः हे पहा त्या जगदेवाच्या दोन्ही मुलांसह महाराजच इकडं येताहेत! (आपल्याशीं) जगदेवावर किटाळ आणायला कुठं कांहींच छिद्र सांपडत नाहीं. चंपावती ताईचे तर धारेहून निरोपावर निरोप!

(इतक्यांत महाराज सिद्धराज, जैसिंग व जगदेवाचे वडील पुत्र जयसिंह, व एका दूताचे हातीं धाकटे पुत्र जगपाळ असे येतात.)

राजा०–(सरदारांस) पाहिलंत कां हे आमचे छोटे जगदेव, ' मलाही एक नोकरी सांगा ' ह्मणून माझ्या मागं लागले आहेत!

क्रूर०– (एकीकडे दुसऱ्यास) खास, जगदेवाचीच युक्ती ही पैसा उकळण्याची अन् दुसरं काय?

भीरु०–शुः जरा हलके! महाराज ऐकतील तर काय ह्मणतील आपल्याला?

जयसिंह०–(राजास) मग सांगतानां?

राजा०–काय सांगू बाबा? यवनांपासून गाईंचं रक्षण करशील? करीत असलास तर ही पहा तुझ्याकरितां छोटी तरवार करविली आहे–

जय०–

(बंजारा)

घ्या समशेर, (राजा समशेर देतो ती घेऊन.) या समशेरें। अटकाविन गोबध सारे। घ्या समशेर०॥ समशेर–बलें भुज सारें॥ अट०॥ गोवध होय जिथें। चमकेल तिथें। ही समशेर। यांत न फेर। घ्या समशेर, या समशेरें॥ अट० ॥ चाल॥ अरे यवन मारिती गाई। चिरितात हाय कसाई। अभिमान कसाही नाहीं!। अरे धिक् धिक्, उठुनि बेशक्, करूं रिपु हक्, चला यारे। या समशेरें–अटकावूं गोवध०॥ १॥

राजा०–(हंसून) अरे–

पद.

चिमुकल्या तुझ्या तरवारी। क्षम काय शत्रु-संहारीं॥ धृ०॥ अरिवर्ग मत्त तो भारी। शक्ति त्या असत सहकारी॥ रणमस्त मल्ल मदकारी। प्रविण ते आयुधागारीं॥

जयसिंह०–चाल॥ जरि शूर मत्त शत्रू ते। पाहतां वरिति भीतीतें। करितील धिःक् जगिं त्यातें॥ धनुकली माझि। सज्ज ही आजि। धनुच्या कार्जी। शत्रु संहारी। चिमुकली, तरी जयकारी।१।

राजा०–(सरदारांस)

पद.

हें कोमल बालक असतां । पहा, धरी किती अवसान! ॥ ध्रु० ॥ प्रबल यवन ते परी तयांचा । धरी मुळीं न गुमान् ॥ १ ॥ पहा० ॥ वीर्यतेज हें तीव्र किती हें । वयें असूनि लहान ॥ २ ॥ पहा० ॥ बालवीर हा तरुणपणीं किति । रंगवील रणमैदान ॥ ३ ॥ पहा० ॥

बक्षी साहेब, भीरुसिंगजी, धीरासिंह, क्रूरसिंह, पाहिलंत-जयसिंहाचं ह्या वयांत कोण विलक्षण अवसान हें!

बक्षी०—उघडच आहे जशी खाण तसं वाण!

सरदार०—(बरकांती) हो हो हो हो! उघडच आहे.

राजा०—पण जयसिंह, ह्या नोकरीबद्दल पगार काय घ्याल तुह्मीं?

जय०—रोज पन्नास मोहरा.

राजा०—(हंसून) रोज पन्नास! आणि त्या घेऊन काय करणार काय तुह्मी?

जय०—काय करणार ह्मणजे?

पद. (दास चातका० या चा०)

रम्य धेनु-मंदिरा—सुमंदिरा । उभारुनी तिथें सधेनु वासरां । करीन खास आसरा, सुहेतु हा खरा । अशास यवन आड जे ॥ तयांसवें करीन मी अफाट संगरा । मला सुलाभ होति जें । तयांस अर्पिणार मी समग्र मोहरा ॥ १ ॥

राजा०—

पद. (धन्य जाहला तुह्मी राम पाहिला॰ या चा॰)

अहा धन्य जाहलों । यास लाधलों ॥ धृ॰ ॥
बालक असुनि उदार किती हा, वीरांसम
समशेर करीं धरि हा ॥ आनंदांत निमालों ॥
अहा॰ ॥ १ ॥

बक्षी साहेब, याच्या तनरुयाची व्यवस्था आजपासून झाली पाहिजे. समजलं? चला तर, पहिल्यानं ह्याला आपल्या अश्वशालेकडे घेऊन जाऊं ह्मणजे तिथून हा आपल्याला हवा तो घोडा निवडून घेऊं दे.

बक्षी॰–ठीक आहे. चलावं तर.

(राजा, बक्षी, जयसिंह व इतर नोकर जातात.)

क्रूर॰–(इतर सरदारांस) ह्या तुमच्या नाकावर पाय-देऊन आणखी पन्नास मोहरा सुरूं झाल्या!

भीरु॰–आपण पिढीजात नोकर खरे. पण असं झालं तर यापुढं आपल्या पोराबाळांची कांहीं चांगलीशी धड-गत नाहीं दिसत! त्यांची आपल्याला कांहींतरी तजवीज करून ठेविली पाहिजे.

धीर॰–अगोदर ह्या जगदेवाची अन् त्याच्या ह्या मुलांची कांहीं तरी चांगली व्यवस्था लावल्या शिवाय आप-ल्याला आपल्या मुलाबाळांची व्यवस्था खास नाहीं लावतां येणार! तर–

क्रूर॰–चला इथं नका उभे राहूं आतां. इकडं या. मी सांगतों तुह्मांला त्यांची कशी काय व्यवस्था लावा-यची तें–

पद (जगीं या शूर असे जो शूर॰ या चा॰)

खुली तरवार, करा सरदार, करू संहार,

सर्पाचा । फणीवर वार, करा अनिवार, महा फूत्कार, सर्पाचा । जरी कचराल, तरी मृत व्हाल, खचित हा काळ, सर्वांचा । धरा करवाल, वीर इरसाल, करा हाल हाल, काळाचा । तुह्मी बलवान्, जवान्, मर्दान्, धरा अवसान, जरा तरि ध्यान जरा तरि ध्यान । चला घ्या प्राण, चला घ्या प्राण, चला घ्या प्राण ॥१॥

(जातात.)

प्रवेश २ रा.

स्थल—धार नगरींतील राजवाडा.

(राजा, उदयादित्य, चंपावती, रणसिंह, त्यांचा स्त्रीं वगैरेस मानदुर्गच्या राजाचा सेनापति येऊन भाले व बंदुकीवाळे लोक आणून गराडा घालतो.)

गिरिधर०—हे उदयादित्य, हे त्यांचे चिरंजीव रणसिंह, आणि हा त्यांचा राणीवसा.

सेनापति०—मानदुर्गावर स्वारी करून मोठा विजय संपादन केलात त्याचा सूड उगवला आज!

उदया०—कोण आहेरे? कुणीच कां नाहीं इथं!

सेना०—मानदुर्गचे मानी आणि मर्दाने शिपाई गडी आहेत आपल्या तैनातीला.

उदया०—वा: गिरिधर, तूं शत्रूनां बातमी देतोस?

गिरि०—हो मीच देतो. सेनापती साहेब, बघता काय, पकडा त्यांना—ह्यांच्याशीं फार बोलण्यांत अर्थ नाहीं.

उद०—एकंदरींत असा प्रकार ओढवला ना!

पद (मला देखुनी कोप करतील कां० या चा०)

अहा राजवंशा कशी ये दशा ! ॥
कशी साहुं ही दुःसहा दुर्दशा ॥ ध्रु० ॥

चंपा०–पहा दैव तें लागलें पाठिशी ॥
जशी घेउनीया कटोरा कशा ॥ १ ॥

सेना०–

पद (क्या हम पलटनमे भरेहुवे० या चा०)

(राजा राणीस) कां दैवाला दूषण देता ? ।

सेना० व गिरि०–(शिपायांस) चला धरारे या सकलांस ॥ धृ० ॥

चंपा०–अहह ! विधिच अति, असुनि कुटिल कृति, वरित विषम रिति, कशि गत यास ! ।

(अश्रु येतात.)

सेना०–विफल नयनिं जल, विफल विगत बल, विफल वच सकल, गमत मनास ॥ २ ॥ सुदीप्ति अरि युवति, जरि न असति वश, विजयि रिपुसि तरि, करुंच तयास ॥ ३ ॥

चंपा०–नृपति रमणि-गण, करिशि अवगणन तरि करिशि गमन अधम नरकास ॥ ४ ॥

सेना०–मज न वचनशर सहति अधमतर अवरुनि झट धर निज वदनास ॥ ५ ॥ असि नग्नचि करिं, फिरवुनि वरि वरि । करुनि बंदि अरि, करुं गमनास ॥ चला धरा रे० ॥ ६ ॥

(शिपाई सरसावतात.)

चंपा०–(शिपायांस) या नीचानों, माझ्या पुढती, ।

उद०–(राणीस) सख्ये श्रमशी व्यर्थ कशास ? ॥
चंपा०–(राजास) वीर्य नष्ट तें झालें कैसें ?
उद०–(राणीस) दैवचि उलटे होय अम्हांस ! ॥
गिरि० व सेना०–कां दैवाला दूषण देतां ? चला धरा रे या सकलांस ॥ १ ॥

रण०–(शिपाई सर्वांस धरूं लागून रणसिंहासहि धरूं लागतात) अरे, मी राजाचा पुत्र आहे-

सेना०–आणि मी राजाचा सेनापति आहे. (शिपायांस) अरे बघता काय. धरा त्याला. (शिपाई रणसिंहास धरूं लागतात.)

रण०–(शिपायांस)

पद.

हां हां–मी राजपुत्र रणसिंह, नृपति-कुलालंकार !
शिपाई०–अन् अमीबि बानदार जवान्मर्द गडी सरदार ॥
२ रा शि०–रणझुंझार ।
३ रा शि०–धरूं कटियार ।
४ था शि०–मारूं तरवार, करून गोळीबार–भडिमार (बंदूक दाखवून)
रण०–भिऊन पळा झटपट, अरे मी राजपुत्र रणसिंह नृपति–कुलालंकार ॥
हलक्या स्वरानें) म्या म्या–
सेना०–कां मुर्खाशीं भाषण करितां, चला धरा रे ह्या अधमांस ।
बघतां काय ? दिवस रात्र कांहीं एक न बघतां यांना

मानदुर्गास ताबडतोब नेलं पाहिजे. घाला तर यांना शृंखला. उशीर नका करूं. (शिपाई शृंखला घालूं लागतात) गिरिधर, मानदुर्गास गेल्यावर आमच्या महाराजांजवळ तुमची तारीफ करून तुह्मांला सरदारी देववूं. समजलं? चला तर—

उद०—

पद.

अहा राजवंशा कशी ये दशा, ॥
कशी साहुं ही दुःसहा दुर्दशा! ॥ ध्रु० ॥

चंपा०—अहा लागलें दैव तें पाठिशी ॥
कशी घेउनीया कठोरा कशा! ॥ १ ॥

(कैद करीत असतां पडदा पडतो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—पट्टण येथील महाराजांच्या शय्यामंदिरा नजीकचें दालन.

[देखावा—भाद्रपदी आमावास्या. धूमधार पाऊस, विजांचा कडकडाट, मेघनाद, अशी भयंकर रात्र असतां मध्येच पाऊस जरा थांबला असतां पूर्वेच्या बाजूनें ४।५ बायका रडल्याचें ऐकूं येतें व त्यांच्या उजवेकडे कांहीं बायका खो खो करून खिदळत असल्याचें ऐकूं येतें.]

प्रवेश-(राजा व सरदार. सरदार आपापसांत कांहीं कुजबुजत आहेत. व त्यांचे मद्रेवर आश्चर्य व भीती यांची चिन्हें दिसतात.)

राजा०—(सरदारांस)

पद. (हे शिवधनु रघुविर मोडि मोडि० या चा०)

हें रुदित हसित हें काय काय! ॥ ध्रु० ॥

ऐकलंत,

अशिव हंसित हें, मग हें रोदन। चाल-
तसे किति धाय धाय! ॥ १ ॥ रात्र भयंकर
घोर अशी ही। भीतिभेंर नच जाय जाय ॥
२ ॥ कर्कश रव मज मधुनि मधुनि हे। सु-
चविति अशुभचि हाय हाय ॥ ३ ॥ वीर ब-
हाद्दर रणमर्दानों। यास वदा सदुपाय काय।४।

त्या शिवाय मला झोंपही यावयाची नाहीं आणि चैन-ही पण पडायचं नाहीं.

क्रूर०–आह्मी जाऊन लावून येतों याचा छडा.

धीर०–मी जातों आणि लावतों सारा तलास. महा-राजांनीं स्वस्थ असावं. (राजा विचारांत निमग्न होऊन, रुदित व हसित ऐकत आहे.)

भीरु०-(सरदाराशीं हलक्या स्वरानें) पण मी ह्मणतों महाराजांनीं रोज शंभर मोहरा ठरवून ज्याला आपला ' राम-रक्षक ' नेमला आहे त्यानं कां नव्हे जाऊं याच्या शोधाला? हंः महाराजानां तीन दिवस झोंप नाहीं पण तो तिकडं खुशाल डारडूर करून दिवस रात्र घोरत पडला असेल! तोबऱ्याला तो आणि चाबकाला आह्मी! उलटं आहे सारं जगामध्यें.

श्लोक (शार्दूल०)

तट्टू ताबडतात ज्यास न मिळे दांतावरी मारण्या।
दाणा एकहि; मात्र त्यास मिळती खर्पूसशा काढण्या;।
ज्याला पोंसुनि ठाणबंद करिती, दाणा, खरारा तया।
देती लोक पहा जगांत सगळे! न्याया ह्मणूं काय या?१।

धीर०–गृहस्था, महाराज ऐकतील, जरा हलक्यानं चालूं दे हलक्यानं–

राजा०—बरं मग कसं काय भीरुसिंह ?

भीरु०—हो हो हो हो—आह्मीं सारे लावतों याचा छडा. पण—

राजा०—पण काय ?

भीरु०—नाहीं ह्मटलं शंभर मोहरा—

राजा—काय बक्षीस पाहिजे ह्मगतां ?

भीरु०—छे छे छे छे तसं नव्हे महाराज ! ह्मटलं रोजच्या शंभर मोहरा खाणारे ते जगदेवराय—ते काय करताहेत—त्यांना यावेळीं लावावं महाराजानीं कसोटीला—आह्मीं तर महाराजांचे—पिढीजात नोकरच आहोंत—आह्मांला याचा केव्हां छडा लावूं आणि केव्हां नाहीं असं झालंय—कां धीरसिंह क्रूरसिंगजी—मी ह्मणतो असंच कीं नाहीं ?

क्रूर० व धीर०—हो हो असंच अगदीं असंच झालंय आह्मांला.

राजा०—(आपल्याशीं विचारांत निमग्न असा) निःसंश मत्सर, मत्सरच हा !

पद. (हा मदन मलारे० या चा०)

हा मत्सर जगिं करि हाहाःकार ॥ ध्रु० ॥
या जनन अंतरिं । तरि सुखहि विसरी ।
वरि सुनिति संहरि । मन भ्रष्ट करी । हा
सकल जगीं । हा मत्स० ॥ १ ॥ हा हृदयिं
शिरुन । विष जहर भरुन । पर निधनिं ध-
रुन । रति, शस्त्र वरी । मग ठार करी ।
जणुं यम अपरा ॥ हा मत्सर० ॥

(उघड) हो बरी आठवण केलीत. (पुनः रडें व हसें

ऐकूं येतें.) ऐकलंत पुनः तोच प्रकार! (दूतास) अरे, जगदेवराय माझ्या मंदिराभोंवती पाहऱ्यावर आहेत त्यांना पाठवून दे इकडे. (इतक्यांत जगदेव वीरवेषांत येतो त्यास पाहून) अहो हे जगदेवरायच आले कीं इकडे. (जगदेव राजास प्रणाम करतो) बरे वेळेवर आलांत (पुनः रडें व हसें ऐकलंत हें–[" हें रुदित हंसित हें काय काय ?" इत्यादि पूर्वोक्त पद्य म्हणतो.]

जग०– पद. (आरदे० या चा०)

ही कृती, पडुनिया श्रुतीं, भ्रमवि मन्मती, दिनत्रय झाले । किति मन्मन हें, शंकुनी सं-भ्रमीं पडलें ॥ १ ॥

राजा०–तर मग भीतीनं—

यामिनी, ही तमस्विनी, घोरतर रजनी, अशी करकरुनी । पद टाकि काय, नृपकार्यी विन्मुख करुनी ? ॥ २ ॥

जगदे०–यामिनी, ही तमस्विनी, घोर अशि रजनी, जरी करकरते । तरि काय जना, स्वामिकार्यि विन्मुख करिते ! ॥ ३ ॥

हा प्रकार काय आहे हें तीन रात्रीं पाहून आज याचा छडा लावावा असें—

योजुनी, हेंचि मन्मनीं, शस्त्र घेउनी, येथवर आलों । नृपपद वंदुनि, (वंदन करून) जावया सिद्ध मी झालों ॥ ४ ॥

मी जाऊन हें सारें काय प्रकर्ण आहे काय नाहीं

याचा चांगला छडा लाऊन येतों. यावर महाराजांची काय आज्ञा आहे ?

राजा०–एवढ्याच करितां आपल्यास बोलिवलं होतं (पुनः रडें व हसें ऐकूं येतें) हें पहा पुनः—

जगदे०–(प्रणाम करून) येतों तर; आतां नाहीं राहात. (जातो.)

राजा–(इतर सरदारांस) तुह्मींही याचा शोध करा. आणि हा खरोखरी जातो कीं नाहीं तेंहि नीट पहा. मी जातों–पाहतों थोडा डोळा लागल्यास. गेल्या तीन रात्रीं मला स्वस्थ झोंप नाहीं.

पद. (ठेऊं देह कशाला० या चा०)

निद्रा नाहिं जयाला । मुळिं ही ॥ ध्रु० ॥
दुर्दिन वाटे सर्वचि त्यातें ॥ स्वस्थपणा न
मनाला ॥ १ ॥ लवही निद्रा० ॥ तनुवरि ज-
डता सहजचि पसरे ॥ शैथिल्यचि अंगाला॥२॥
नयन मिटति हे क्षणोक्षणिं किति ॥ शूल भेदि
शीर्षाला ॥ निद्रा० ॥ ३ ॥

जातों तर मी. मी सांगितल्या प्रमाणं छडा लावून सकाळीं येऊन कळवा मला सारी हकीगत. या तर–

(सरदार राजवाड्याचे बाहेर पडतात.)

राजा–(आंतून काळा पोषाख घेऊन येऊन)

पद. (वाटे सर्वथा० या चा०)

जातों झांकुनी सर्व काया ॥ ध्रु० ॥ कृष्णपट
हा असा, साह्यकारी मला । रात्रही अनुकु-

ला, कृष्णतर कज्जला । वेळ ही बरि दिसे, जग पहाया ॥ १ ॥

(राजवाड्याचे बाहेर सरदार बोलत आहेत व राजा आडून ऐकत आहे असा देखावा.)

क्रूर०—काय भयंकर रात्र ही!

धीर०—कल्परात्रच ही! हा विजांचा कडकडाट, मेघांचा गडगडाट, आणि रात्रींचं हें भयंकर करकरणं—

भीरु०—तसाच हा सोंसाट्याचा वारा-वाऱ्याला जसं कांहीं भूत आलं आहे. शिवाय ही पावसाची मुसळधार—जावं कुणी यांतून? अन् तो जगदेव तरी कां जाईल ह्मणता? छेः नांव कशाला घेता त्याचं. तो मुकाट्यानं घरीं जाईल अन् रात्रभर चापून झोंप काढून उजाडल्यावर महाराजांकडे येऊन, आपण जाऊन असं असं पाहून आलों-तिथं भुतं, खेतं, जाखिणी, जोखिणी, खवीस, हडळी, सैतान वेताळ, हे जमून त्यानींच हे असले भयंकर प्रकार चालिवले होते असं कांहीं तरी सांगून महाराजां-च्याकडून तो आणखी कांहीं तरी नवीन बक्षीस उपटणार झालं, अन् दुसरं काय?

धीर०—मला सुद्धां असंच वाटतं. पण भीरुसिंह हा जातो कीं नाहीं याबद्दल—याच्यावर चांगली पाळद राखून—तल्लास लाविला पाहिजे!

भीरु०—काय? याच्यावर पाळद राखायची ह्मणतां? जरूर! राजा मरो राणी मरो.

राजा०—(एकीकडे) शाबास! भीरुसिंगजी शाबास!

भीरु०—आपली सरदारी थोडच बसलंय कोणी काढून घ्यायला! कां होय कां नाहीं क्रूरसिंह?

क्रूर०—अलबत, अगदीं रास्त बोलतां तुह्मीं.

राजा०—(एकीकडे) रास्त, अगदीं रास्त आँ ? काय नीचपणा आहे मनुष्याचा हा !

क्रूर०—आणखी समजा, तो गेला, तरी त्याला खोटा ठरवायला किती उशीर ? आपण तिघांनीं मिळून एक अगदीं मिळतं सांगून दिलं ह्मणजे झालं !

राजा०—(एकीकडे) हं ! आणि खऱ्यालाहि खोटं ठरविणार अशा लुच्चेगिरिनं ! शाबास एकून खूब उर-फाटी छाती आहे बोवा तुमची !

भीरु०—खाशी, तोड मात्र सुरेख काढली क्रूरसिंहजीनीं. होय कीं नाहीं धीरसिंह ?

धीर०—बेशक्. ही पहा (वीज कडकडते व मेघांचा गड-गडाट होतो.)

पद.

वीज कडकडे ।
भीरु०—ऊर धडधडे ।
क्रूर०—पाय वांकडे ।
भीरु०—पडति चहुंकडे ।
सर्व०—अशा या काळीं ॥ प्राण कोण संकटीं
घाली ? ॥ १ ॥

भीरु०—ही प्रळयकाळची रात्र ! त्यांतून आज ही करकरलेली अवस ! जातो कोण अन् येतो कोण ?

राजा०—(एकीकडे) शाबास ! निस्सीम स्वामिभक्त आणि पिढीजात सरदार हे !

धीर०—नाहीं पण भीरुसिंघजी, असं करून नाहीं

उपयोगी. जगदेव खरोखरी काय करतो तें पाह्यला तरी त्याच्या मागून कोणी गेलं पाहिजे! आपल्यावर त्याचा नक्‌शा काय ह्मणून उगीच सदोदित ?

भीरु०–हें पहा–तुह्मांला जर जायचं असेल तर खुशाल जा तुह्मीं–आमची ना नाहीं–आपण तर साफ नाहीं येणार.

क्रूर०–मलाहि जगायचंय चार दिवस.

धीर०–अन् मला मात्र मरायचंय वाटतं ?

भीरु०–तुह्मी बोआ आहांत शूरसिंह. नांवच तुमचं अगोदर धीरसिंह! सिंहाला सुद्धां फाडून टाकाल तुह्मी.

धीर०–तुह्मी काय कमी आहांत? तुमचं नांव तर भीरुसिंग–सिंग ह्मणजे सिंहच. सिंहाला देखील भेदरून टाकाल तुह्मी! (धीरसिंह ओरडतो व भीरुसिंग भिऊन अगदीं गर्भगळीत होऊन जातो.)

क्रूर०–यं रे अवसान? धीरसिंह आरडले–आणि भीरुसिंह भेदरले! (भीरुसिंगास) अहो राजेश्री यायचंय कीं नाहीं घराकडे? ते जाऊं देत त्यांना कुठं जायाचंय तिकडं!

भीरु०–हे पहा धीरसिंह, तुह्मी जा जगदेवाच्या मागोमाग, अन् काय काय होतं तें सगळं भल्या पाहांटेस येऊन सांगा ह्मणजे झालं आह्मांला.

क्रूर०–असंच. (भीरुसिंहास) चला तर.

(दोघे जातात.)

राजा०–(एकीकडे) शाबास तुमच्या धैर्याची आणि इमानाची!

धीर०–बेहिमती! इतका नादानपणा नाहीं उपयोगी. मी सशस्त्र होऊन जातों आहे हें सगळ्यापरी बरं

आहे. एक तर ही अशी रात्र—अन् दुसरं संधी सांपड-ल्यास जगदेवाला निजधामाला पाठवून आपल्याला दोन कार्यें साधितां येतील. एक—इथं जगदेव जो आ-मच्या हिताच्या आड जिथं तिथं येतो तो येणार नाहीं;—आणि दुसरं—चंपाताईचा वेडसर पुत्र रणसिंह—जगदेवाचा सावत्रभाऊ—आणि माझा भाचा—त्याच्या आड येणारा हा कांटा—गादीचा खरा वारस—उपटून टाकला, ह्मणजे भा-च्याच्या नांवावर मामाच्या हातीं येईल सर्व राज्याधिकार! असं जर आहे तर मग उशीर करून नाहीं उपयोगी. जगदेवाला गांठलं पाहिजे अगोदर. (पुनः विचार करून) पण मी जर त्याला ठार केला, तर माझ्या आंगशीं तर नाहीं यायचं हें?—छेः अशा अंधेऱ्या रात्रीं केलेलं कृत्य पाह्यला येतो कोण? पण मन किती शंकेखोर! जावंच तर.

(जातो.)

राजा०—(एकीकडे) जगदेवाच्या आणि ह्यांच्या मागो-माग जाऊन तो आणि हे काय करतात तें पहावं ह्मणून हा पोषाख करून मी बाहेर पडलों तों या चोरांची ही स्वामीभक्ती आणि मतलबी धीरसिंहाचे जगदेवासंबंधाचे हे दुष्ट हेतू, हे मात्र आपोआप आपल्या नजरेला पडले! हंः एकेक पहावी ती मजाच! बाहेर पडल्याशिवाय कळत नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटं नव्हे. कारण आज मी बाहेर पडल्या मुळंच— साकी.

स्वामिभक्ति मम मंत्रिजनांची, स्पष्टचि दृष्टिस
ये ही ॥ राजमंदिरीं कळति नृपां नच, कृष्ण-
कृती ह्या कधिं हीं ॥ यास्तव नृपतीनीं ।
असावें दूरदृष्टि धरुनी ॥ १ ॥

तर इथें उभं राहून नाहीं आतां उपयोग. जगदेवाच्या आणि या दुष्टबुद्धी धीरसिंहाच्या मागोमाग राहवं, अन् हे काय काय करतात तें पहावं–यांच्या दृष्टीला मात्र पडूं नये. भलता सलता कांहीं प्रसंग दिसल्यास आहेच हें! (तरवार उसपतो) एकून मी केलेल्या त्या योजने पासून पुष्कळ गोष्टींचा आपल्या आपण निकाल लागण्याचा रंग दिसतो आहे. हेंही एक प्रकारें बरेंच आहे ह्मणायचें. हे तिमिरमय रजनी, ह्या कृष्णवस्त्रावरून तुझें हें कृष्णतर वस्त्र टाकून मला झांकून टाक.

(जातो.)

प्रवेश ४ था

स्थल–स्मशान.

प्रवेश–जगदेव सशस्त्र जात आहे.

[देखावा–पर्जन्य, मेघांचा गडगडाट, पर्जन्यवृष्टी व वन्यपशूंचें आरडणें]

जगदे०–

पद. (परम सुवासिक० या चा०)

चंचल चपला चमकुनि वरि वरि होत असे मज सहकारी। मधुनि मधुनि या गगन-दुंदुभी भीति देति जरी मदंतरीं। जलवृष्टी ही पाहुनि वाटे बुडतों यांतचि काय तरी?। प्रलय समीरण सुचवित मज हा निकटचि लय ये काय तरी। हिंस्र पशूंचे कर्कश रव हे, किरें

ध्वनी जे रात्र करी। भिवविति मज परि,
नृपभक्ती दे मम करिं धृति-करवाळ खरी॥ १॥

(रडण्याचा आवाज ऐकून) खास, बायकांचाच आवाज हा! पण अशा अपरात्रीं, आणि तेंहि स्मशानांत, कां बरं रडत बसल्या आहेत ह्या? [पुढें जातो व त्याच्या दृष्टीस तीन नगरदेवी शोक करीत बसलेल्या दिसतात, त्यांस उद्देशून.]

पद. (शांति धरा नृपराज॰ या चा॰)

रात्र भयंकर कोण!। त्यांतुनि पूर्ण भयाण
स्मशान। कोण अहा तरि कोण?॥ धृ॰॥
असा तुह्मि डांकिणी, कुणि भुताटणी, परि
ही रजनी, उगि कां रडुनी, करितां जास्त
भयाण?॥ १॥ रात्र भ॰॥

नगरदेवी॰–रात्र खरोखर कोण!। त्यांतुनि
पूर्ण भयाण स्मशान। येशि कशाला? कोण
॥ धृ॰॥

जगदे॰–मी रक्षक नृपराया, अशुभचि रुदना
या, ऐकुनि आलों, मग या ठाया, रडतां
कां? तुह्मि कोण?॥ रात्र॰॥ २॥

नगरदे॰–अह्मि नगरदेवि, जीव धरूं कैंवि,
हाय! ज्यां नृपकंठीं ठेवी, कर्दन-काळ कृपा-
ण!॥ ३॥

जगदे॰–हाय! हाय! शब्द-भयंकर कोण?॥
(तुटक शब्द उच्चारतो.) छेः तुह्मी–

साकी.

खास भुताटणि डांकिणि अथवा चेटकिणी

कुणि असुनी । फसवूं बघतां, अशुभ अमंगळ शब्द, नृपातें वदुनी ॥ तर– जिव्हा छेदुनिया । करितां शासन या समया ॥ १ ॥

नगरदे०–अरे, नुस्त्या जिव्हाच का छेदतोस ? आह्मां तिघी जणींवर हें आपलं दिव्य शस्त्र टाकून आह्मांला ठार करून टाक, ह्मणजे झालं सुटलों. मग आह्मांला सिद्धराजाचा तो भयंकर अंत, आणि त्याला मूल बाळ नसल्यामुळं मग अर्थातच पट्टणपुरीवर फिरणारा तो नांगर, ह्यां पैकीं कांहींच पाह्याला नको! खरोखर तुला कोणी तरी देवानींच पाठविला ह्मणायचा आमच्या करितां.

जग० –(आपल्याशीं) छेः ह्या डांकिणी, भुताटणी, यांपैकी कोणी खास नव्हेत. यांच्या ह्मणण्याप्रमाणं ह्या नगरदेवीच खास. (उघड) देवींनों, तुह्मांला मी न ओळखल्यामुळं मजकडून हा प्रमाद घडला. तर क्षमा असावी मला याबद्दल.

नगरदेवी०–क्षमा ! छेः क्षमा कसची बाबा यांत ! चल, चालीव आपलं शस्त्र आमच्यावर, ह्मणजे उद्यांचा तो भयंकर प्रसंग पाहण्याचं तरी टळेल–

जग०–तर मग–(हुंदके येतात) महाराजांचा उद्यां अंत होणार ह्मणतां ? आणि ह्मणूनच गेल्या तीन रात्रीं तुह्मीं रडून काढल्यात ? (हसें ऐकूं येतें) बरं पण हें हंसतं आहे कोण ?

नगरदेवी०–तें नाहीं आह्मांला ठाऊक. तूंच तिथवर जा, अन् शोध करून येऊन सांग आह्मांला, कोण आणि कां असं हंसतय तें.

जग०–ठीक आहे. येतों. पण माझ्या उद्धटपणा-बद्दल–

पद. (उमापती नमू नमू. या चा०)

क्षमा करा, क्षमा करा, । नतावरी दया करा ॥
व्यर्थ तुह्मा निंदियलें । उदार-धी दया करा ॥
क्षमा० ॥ १ ॥

नगरदेवी०– क्षमा असे उठी उठी । राजकार्यि
दक्ष तया ॥ शिवचि असो भय न उरो ।
जरी निशी भयंकरा ॥ २ ॥

जग०–क्षमा करा, क्षमा करा । नतावरी दया
करा । व्यर्थ व्यर्थ निंदियलें । उदार-धी दया ॥
करा ॥ क्षमा० ॥ ३ ॥

नगरदे०–उठी क्षमा; स्वताचिया । जिवा गणी
तृणापरी ॥ नसे अशिव त्या निशी । तमें
जरी भयंकरा ॥ क्षमा असे० ॥ ४ ॥

जग०–(प्रणाम करून) येतों तर– (जातो.)

जग०–(हंसणाऱ्या देवींच्या समीप जाऊन-आपल्याशीं) यांच्या वेषांवरून याही देवीच असाव्या. (त्यांस प्रणाम करून) हे देवीनों, प्रणाम करितों मी तुह्मांला. पण तुह्मीं कोण, कुठच्या आणि अशा अपरात्रीं इथं नगरा बाहेर येऊन तुह्मीं जो हा उत्सव मांडला आहे, याचं कारण कृपा करून जर मला सांगाल तर माझ्यावर आपले मोठे उपकार होतील.

देवी०–अरे, पण तूं कोण ?

जग०—मी इथल्या राजांचा एक गरीबसा राजरक्षक आहे.

देवी०—अस्सं!

पद. (महाश्वेता० या चा०)

ऐक जरि तूं राज-रक्षक। नृपतिची तव नि-धन-वार्ता ॥ धृ० ॥ दिल्लिच्या आम्हि नगर-देवी। पाश बघ हे सज्ज केवी। टाकुं या रवि उदय होतां। नृपति-कंठीं, स्नान करि-तांना ॥ १ ॥ उत्सव-प्रिय म्हणुनि आम्ही। दिल्लिपतिच्या मग्न कामीं। हर्ष-भरिता रमत असतां। आड येशी कां महंता रे ॥ २ ॥

जग०—शिव! शिव!

पद.

प्रजा पालनीं दक्ष नृपति हा नीतिमान गुणि ही। असुनि दयाघन, धर्मशील हा, शूर, धीर, रणिं ही। नेता मग कां सांगा यातें टाकुनि अन्यानां। हा नृप-मृत्यू टळेल कैसा सांगा या दीना। लीन असे मी चरणीं तु-मच्या प्राणहि अर्पाया ॥ १ ॥

देवी०—ज्या अर्थी तूं इतक्या नम्रपणानं विचारतो आहेस त्या अर्थी हें टळायला जी एक तोड आहे ती सांगतों तुला, ऐक—

जग०—(उत्सुकतेनें) कोणची कोणची तोड?

देवी०—हें बघ—

पद. (जाऊं कामाला या चा०)

रक्षूं नृपतीला। जरी त्या मृत्यु असे आला

॥ धृ० ॥ पट्टणनृपसम उत्तम नृपकुलिं घेउनि जननाला । धीर वीरवर नृपसुत कुणि जरि अर्पिल भागाला ॥ १ ॥

जग०–हं! (विचार करून) बरं, मी जर आपलं हें शीर अर्पण केलं तुह्मांला तर चालेच कां? तुह्मी देवी आहांत त्याअर्थी माझं कुलशील तुह्मी जाणतच असाल सर्व.

देवी०-हो, हो. तुझं शीर न चालायला काय झालं?

जग०–असं असेल तर ठीक आहे. हा तयार आहे तर मग मी बळी जायाला. (तरवार देऊन) हें ख आणि हें शीर!

देवी०–पहा–नीट विचार कर. मागून फिरशील नाहीं तर–

जग०–यांत एक तिळभर देखील अंतर होणार नाहीं. पण हो बरी आठवण झाली– ह्या पूर्वी माझं तुह्मांला एक मागणं आहे.

देवी०–मागणं? आणि तें काय? जिवंत रहावं हेंच कीं नाहीं?

जग०–छेः छेः छेः छेः तसं नव्हे. किंचित् घरीं जाऊन मला आपल्या स्त्रीचा निरोप घेऊन आलं पाहिजे. ह्मणने तिला दगा दिल्यासारखं होणार नाहीं. आज्ञा होईल तर हा याच पावलीं जाऊन परत आलों ह्मणून समजा.

देवी०–ह्याच पावलीं परत! हंः (तिरस्कारयुक्त हंसून) प्रत्यक्ष आपल्या नवऱ्याच्या मरणाला–

पद. (कधिं तिला बघिन० या चा०)

जगिं अशी कुठनि युवती? ॥ पतिवरि ।

प्रेमा । असुनी । देइल जी । कांता । संमतिला । निजकांता । निधनाला ॥धृ०॥ सकल जगतिं या अशि रीती । नर वेडे किति होती ॥ स्त्रीच्या । दृढपाशीं । पडुनी ते । कर्तव्या । अंतरुनी । वरितातो अपकीर्ती ॥ १ ॥

जग०–तुह्मी काय वाटेल तें ह्मणा. पण–

देवी०–जा जा. तूं जाऊन येतों ह्मणून ह्मणतो आहेस तर जा आमची कांहीं हरकत नाहीं. पण ह्या पाशांपेक्षां तिकडचे पाश अधिक करकचून बसतील येवढं मात्र लक्षांत ठेव.

जग०–(प्रणाम करून) येतों तर. (स्वगत) बळी जाण्याच्या माझ्या निश्चयाबद्दल देवी देखील शंकित आहेत एकून! (जातो.)

वीर०–देवांनां आपला बळी देण्याचा याचा तर कृतनिश्चय दिसतो. पण घरीं गेल्यावर याचा हा सर्व निश्चय डळमळून जाईल. पाहूं तरी हा प्रकार कोणाच्या थराला जातो तें. पण अशानं हातची शिकार मात्र घालविल्या सारखं होईल. (तरवार उपसून) तर ही वेळ व्यर्थ नाहीं जाऊं देऊन उपयोग.–तरी पण ही घाईच होते आहे माझ्याकडून फार–

राजा०–(आपल्याशीं–तरवार उपसून वीरसिंहाच्या मागें असलेला) तरी वेळेवर आलास शुद्धीवर.

वीर०–त्याला घरीं जाऊन येऊं दे अगोदर–मगच पाहूं. जगदेव सत्यप्रतिज्ञ आहे. आपला शब्द खोटा नाहीं पडूं देणार तो.–मेलाच कीं पग हा–याच्या मागोमाग च आवं. (जातो.)

राजा०–

पद.

राजभक्ति ती अतुलचि जगतीं ।
सेवक जरि ते नृपती साठीं ॥
प्राणहि अर्पाया सरसावती ।
खड्ग धरुनि कंठीं ॥ १ ॥

याच्या मागोमाग जावं. ह्मणजे वीरमतीचा हा निरोप मागूं लागला ह्मणजे ती काय ह्मणते तेंहि समजेल. जावंच तर.

(जातो.)

प्रवेश ५ वा.

स्थळ–जगदेवाचें मंदिर.

प्रवेश–[जगदेवपुत्र जयसिंह "कुठें असे माझी तरवार" ह्मणून ओरडत उठतो. वीरमती शामदान घेऊन जवळ येते.]

वीरम०–अगबाई, झोंपेत सुद्धां माझी तरवार कुठं आहे ह्मणून ओरडत उठतो. बाळ, कांरे? माझी तरवार कुठं आहे असं ह्मणत कां उठलास? (तो उठून कावराबावरा होतो.)

जयसिं०–तरवार कुठं आहे माझी तरवार?

वीर०–अरे वेड्या, करायची काय ती तुला अशा या अपरात्रीची?

जय०–अपरात्र! तर मग रात्रीची वेळ पाहूनच दुष्टांनीं हल्ला केला

वीर०–ह्मणजे! कशावर? आणि कुणी बाबा हल्ला केला?

जय०–कशावर ह्मणजे? माझ्या गोशाळेवर!

वीर० हत् वेड्या! असं स्वप्न पडलं वाटतं तुला?

जय०–हो. स्वप्नच तर मग तें! नाहीं–पण तिथवर मी एकदां जाऊन येतों!

वीर०–वेडं ग बाई वेडं अगदीं! वेड्या, तुझ्या गोशाळेच्या दरवाजावर नागव्या तरवारींचा खडा पाहरा असतांना–

[जगदेव ओलाचिंब झालेला येतो व राजा व वीरसिंह गुप्तपणें आड एके बाजूस उभे राहतात.]

जय०–तें कांहीं एक ऐकणार नाहीं मी. चल सांग मला–

पद.

कुठें असे माझी तरवार? । तिची धार, बघणार, करुन वार अरि ठार ॥ धृ० ॥ कुठे० ॥
चर् चर् चिरिताती गाई चल् सोडी सोडी ।
शूराचा बच्चा शत्रूची छाती फोडी फोडी
फोडी । धनू मला प्यार असे फार; करिन
ठार अरि–भार । धेनू साठीं कडोकडी मारून
उडी–उडी–उडी । रणिं रिपु रगडिन् सोडी
सोडी सोडी ॥ कुठे० ॥ १ ॥

वीर०–(मागें वळते; व जगदेवास पाहून) अगबाई, केव्हां यायचं? आणि हें असं भिजत?

जग०–पण हा कसा या वेळीं जागा?

वीर०–गोशाळेवर हल्ला केल्याचं त्याला स्वप्न पडलं, तेवढ्यावरून वेडं " माझी तरवार कुठं आहे " ह्मणून बसलं!

राजा०–(स्वगत) गोशाळेचा कोण ध्यास हा ह्याला?

जग०–हं?

वीर०–पण हें काय बाई, अंगावरचे हे कपडे नाहीं का अगोदर काढायचे? सगळे ओलेचिंब झाले आहेत कीं– आणखी मुद्राहि कां अशी कावरीबावरी झाल्यासारखी दिसते आहे बाई!

जग०–तें कांहीं एक विचारूं नकोस मला आतां. मी इथं तुझी नुस्ती भेट घ्यायला आलें आहे–मला याच पावलीं परत गेलं पाहिजे.

वीर०–ह्मणजे! काय ह्मणून तरि विचारू बाई मी?

जग०–कांहीं विचारूं नकोस. तूं विचारल्या शिवायच सगळं सांगतें मी तुला–[तिच्या कानाशीं कुजबुजते.]

वीर०–हं, आतां आलं सगळं माझ्या लक्षांत.

जग०–मग महाराजांना वांचिवण्या करितां मी आपलं शीर अर्पण केलं तर चालेल कां ह्मणून विचारलं, त्यावर त्या देवीनीं चालेल ह्मणून सांगितलं. तेव्हां मी त्यांना तुला भेटून याच पावलीं परत येतें ह्मणून सांगून इथवर आलें. तर तुझी परवानगी आहेना याला–

वीर०–काय? याला माझी परवानगी!

पद. (बेत हाच झाला अंतीं० या चा०)

सुदिन सत्य आला नाथा! श्रीहरि त्राता ॥
अर्पुनिया वर शिर मियकरूं, सदयच नृपहंता
॥ ध्रु० ॥ काय नृपति मरण टळत असुनि
संपादूं कुटिल अधमता? ॥ अर्पिन मी ही
प्राण प्रियासह ॥ १ ॥

जग०—छेः छेः छेः छेः

वीर०—

नाहिं नका ह्मणूं अजि जगि कांता॥ ध्रु०॥ १॥

कारण एवीतेवीं इकडच्या मागं—फार झालं तर मला दोन तीन घटकाच काढाव्या लागणार!

जग०—अन् असं झालं तर ह्या दोघांची काय वाट?

वीर०—ह्यांची वाट! यांची वाट कसली? महाराज आणि राणीसाहेब आहेत कीं यानां! नाहीं तर आजोळीं जातील हीं आपल्या.

जयसिंह०—अंह मी नाहीं जा. मी तुमच्या बरोबर येणार. आणि जगपाळालाहि घेऊं पाहिजे तर आपल्याबरोबर. ए जगपाळ ऊठ ऊठ. चल आपण गोशाळेकडे जाऊं.

जग०—(निःश्वास टाकून) अरे त्याला नको उठवूंस आणखी—तूंच उठला आहेस तो पुरे आहेस. (हंसून वी'मतीस) आपण काय आणि कशासंबंधानें बोलतों आहों याची यांना कांहीं कल्पना तरी आहे कां?

जय०—होः सगळं समजलं मला. महाराजांच्या करितां देवीला तुह्मी आपलं शीर अर्पण करणार! मी येणार बरोबर—(जगदेव त्यास पुढं घेऊन पाठीवर हात फिरवितो)

वीर०—(जगदेवाचे गळ्यांत हात टाकून शुन्यवत् उभी राहून व एकदम मुलांकडे दृष्टी लाऊन)

जग०—हें काय? विचार कसचा चाललाय आतां? मघाचं बोलणं काय? आणि आतां हा प्रकार काय?

वीर०—प्रकार! छेः कांहीं नाहीं. ही तयार आहे मी—(तयार होते.)

जय०-आणि मीहि दिखील तयार आहे. आई, बाळाला तेवढं तूं घे ह्मणजे झालं!

वीर०-(तिच्या वृत्तींत एकदम फेर पडून आनंदानें) हो मडे, असंच असंच! (जगपाळास वर उचलून घेऊन जगदे-वास) जायचं नां?

जग०-पण यांना कशाला?

वीर०-कां नको बाई? यांनाहि जाऊं घेऊन तिथं-मग पुढचं पुढं-ह्मणजे शेवटपर्यंत डोळाभर आपल्याला बघायला तरी मिळेल यांना. (जगपाळाचें चुंबन घेऊन) याच्याकडे कित्ती बघितलं तरी तृप्तीच नाहीं बाई होत माझी. असला हिरा इथं टाकून कोण जाईल बाई! (जगपाळास घेऊन)

पद. (रिपु वधावया० या चा०)

त्यजि न बालका। माता, त्यजि न बालका ॥
धृ० ॥ वागविलें नऊ मासावरी। प्रिय बाळा
पोटीं; कैशी टाकी तयास संकटीं। ती धेनूही
जरि पशू टाकि न स्वकिय अर्भका ॥ माता० ॥ १ ॥

जग०-जशी तुझी मर्जी-चल तर (जयसिंहास वर उच-लून घेऊं लागतो) जयसिंहा, चल तूं ये माझ्याकडे.

जयसिं०-नको, मी चालतच येतों.

जग०-नकोरे बाळ, रस्त्यांत फार चिखल आहे. त्यांतून पाऊस आणि रात्र काळोखी. (वीरमतीस) चल माझ्या मागोमाग ये.

(जातात.)

राजा०-(स्वगत) शाबास! धन्य धन्य आहे जोडा हा! यांचा मुलगाहे पण कसा अगदीं यांच्या सारखाच!-

त्या देवडीवाल्यानं जर मला इथं आणून बशिवलं नसतंन् तर हें माझ्या दृष्टीला कशानं पडलं असतं ?—ह्यावेळीं असं वाटतं आहे कीं पुढं व्हावं आणि जगदेवाला घट्ट प्रेमालिंगन द्यावं मी जगावं ह्मणून हीं दोघेहि आपले प्राण अर्पण करायला तयार झालीं; तेव्हां धन्य आहे यांची. (पुढें जाऊं लागतो तों कांहीं विचार आल्यावरून) छेः पण अशी घाई करून नाहीं उपयोगी. सगळ्यांची खात्री झाली पाहिजे ! हीं गेलींच कीं पण-यांच्या मागोमागच जावं तर आतां— (जातो.)

धीर०—ही दोघं आपल्या दोन्ही मुलांनां घेऊन कुठें चाललीं ! आणि यांच्या मागून हा लङ्कभारती कोण चाल-लाय ? (नीट पाहून) तोच तो. जगदेवाचा तो अडदांड देवडीवालाच; बरं पण हे सगळेजण चालले आहेत कुठं ?— पळून तर जात नाहींत पट्टण सोडून—असं असेल तर औषधावांचून खोकला गेला ह्मणायचा—नाहीं पण हे चालले कुठं तें पाहवं. (जतो.)

प्रवेश ६ वा.

स्थल—स्मशान.

प्रवेशः—(तीन देवी उभ्या आहेत. इतक्यांत जगदेव स्त्रीपुत्रां सह येतो; त्याचे मागून राजा व धीरसिंह हे येतात.)

जग०—(नमस्कार करून) आपल्या आज्ञे प्रमाणं हा मी जाऊन आलों.

वीर०—मी नमस्कार करतें. (धाकट्या मुलास देवींच्या

पायांवर घालून) आणि या माझ्या जगपाळालाहि तुमच्या पायांवर घालतें.

जय०—अन् मीहि पण नमस्कार करतों.

देवी०—(वीरमतीस) सौभाग्यवती भव. (मुलास) कल्याण असो. (जगदेवास) हीं कोण ? तुझीं बायका मुलं वाटतं ?

जग०—हो.

देवी०—बरं, पण तूं आपलं शीर अर्पण करायला तयार आहेस ना ? का बदललास ?

जग०—बदललों! हें एवढं मात्र कालत्रयींहि व्हायचं नाहीं.

वीर०—इतकंच नव्हे, पण मी दिखील आपलं शीर तुम्हांला अर्पण करावं म्हणून आलें आहे. कारण—

अंजनीगीत.

प्रजा-रंजनीं दक्ष नृपमणी ।
लक्षावधि जन रक्षी पाळुनि ॥
वांचत असतां, प्राण समर्पुनि ।
कोण न वांचवि त्या ? ॥ १ ॥

जग०—बरं पण मला अगोदर एक विचारायचं आहे. मी आपलं शीर अर्पण केल्यानं महाराज किती वर्षं जास्त जगतील ?

देवी०—एक तप जास्त.

वीर०—आणि मी आपलं शीर जर अर्पण केलं तर महाराजांना आणखी कांहीं जास्त वर्सं द्याल का ?

देवी०—कांहीं कां ? तुझ्या शिराबद्दल आणखी एक तप जास्त.

वीर०—(आनंदानें) मग ठीक आहे बाई ! (जास्त उत्सुकतेनें, धाकट्या मुलास दाखवून) आणि ह्याच्याबद्दल ?

जय०—आणि माझ्या शिराबद्दल ?

देवी०—ह्यांच्याबद्दलहि बारा बारा वर्षं जास्त आयुष्य घालूं तुमच्या राजाला.

जग०—(वीरमतीस) ह्मणजे ! यांना देखील कां तूं देवीनां अर्पण करणार ?

वीर०—(श्रमानें) होः ! काय हरकत आहे ? माझ्या बरोबर पाहिजे बाई माझं बाळ ! (तोंडावर हात फिरवून मुके घेते) हें पहा—

पद. (पांडु नृपति जनक० या चा०)

वत्साविण धेनु जशी । बाळाविण माय तशी ।
दुष्ट विरह साहि कशी । वत्स टाकुनी ? ॥ १ ॥
खचित कठिणहृदया ते । राक्षसि जी निज हातें ।
संकटिं प्रिय वत्सातें । देत टाकुनी ! ॥ २ ॥

जय०—आणि मीगं ?

वीर०—(त्याचे तोंडावरून हात फिरवून) तूंहि पाहिजेस रे माझ्या लाडक्या माझ्या बरोबर !

जग०—(हुंदका टाकून वीरमतीस) जशी तुझी इच्छा—पण तूंच ह्मणाली होतीस ना कीं हीं आजोळी नाहीं तर महाराजांच्याकडे राहतील ह्मणून ?

वीर०—हो खरं तें—पण ह्या अशा मध्यान्ह रात्रीं—अन् पुनः ह्या अशा ठिकाणीं ह्यांना एकटं कसं टाकायचं ?

देवी०—हं आतां उशीर कां ? आटपा लौकर. झाला निश्चय ?

जग०–हो, हो. तो तर केव्हांच झाला.

वीर०–(एकदम उद्गारते) चौघांची मिळून अठ्ठेचाळीस वर्षें तर! (देवीस) बरं, पण मला एक विचारायचं आहे. विसरलें होतें मी अगदीं!

देवी०–काय विचारायचं आहे? खुशाल विचार.

वीर०–हें पहा–मी जर माझ्या या छबकड्याला बळी दिला तर महाराजानां पुत्र द्याल का?–मग त्यानं त्यांचीं १२ वर्षं कमी झाली तरी हरकत नाहीं.

देवी०–तूं आपल्या डोळ्यांतून एक देखील टिपूस न टाकतां जर आपला मुलगा दिलास तर तसंहि करूं.

वीर०–(हुंदका येऊन.) हो, होः होः होः येवढंच ना! इतकं अभिवचन असल्यावर आणखी काय पाहिजे? मी एक दिखील टिपूस काढायची नाहीं मग तर झालं ना?– इतकंच नव्हे पण याच्यामुळं राणीसाहेबांना मुलगा होणार म्हणून उलटा आनंदच मानीन! (जगदेवास) हं. मग आतां उशीर कां? काढावी समशेर म्यानांतून. (ती त्याच्या म्यानांतून समशेर काढूं लागते.)

जग०–थांब, मी काढतों कीं–(काढतो)

वीर०–(मुलांसह देवीपुढें मान करिते.) हं. कां बाई आतां उगीच उशीर?

जग०–म्हणजे? मला सांगतेस कीं काय स्त्री आणि पुत्रहत्या करायला!

वीर०- अगबाई, तर!–

जग०–तर! तर काय?– ज्याचं त्यानं आपलं शीर अर्पण करावं हीच याला तोड.

वीर०—(मान पुढें करून) मग—माझी कुठं ना आहे ? करावं अर्पण—इकडचं अर्धशीरच आहे हें.

जग०—(स्वगत) हिनं ही मात्र सुरेख काढलीन शक्कल ! (उघड तिचा हात धरून) पण हा हातही माझाच आहे मग उशीर कां ?

वीर०— असं का ? घ्यायची तर तरवार ! (घेऊं लागते) बरं, पण बाई मग ह्या दोघांचं कसं काय करायचं ?

जयसिंह०—(आईस खड्ग दाखवून)

पद. (मला देखुनी कोप करतील का० या चा०)

नसे युक्त गे वीर-मातेस ही । अशी काळजी;
पाहि असि पाहि ही ॥ ध्रु० ॥ कधीं वीर-पुत्रा
न सोडील ही । जरी अंत ये सत्य तारील
ही ॥ १ ॥

जगदेव व वीर०—अहा धन्यता वाटते ऐकुनी ।

जय०—(तरवार दाखवून) जगीं हीच दे धैर्य ही
वीर्य ही ॥ २ ॥

जगदेव व वीर०—खऱ्या वीर-पुत्रा असे युक्त हें ।

जय०—तरी कासया काळजी व्यर्थ ही ? ॥ ३ ॥
(तरवार दाखवून) कधीं वीर-पुत्रां न सोडील ही ।
खरी माय ही मजशि तारील ही ॥ ४ ॥

वीर०—(त्याचे तोंडावरून हात फिरविते व त्याचें चुंबन घेऊन) तुला आहे बाबा तुझी समशेर, पण (धाकट्या मुलास दाखवून) ह्याला कुठं आहे ?—

जय०—त्याला काय करायची ? त्याला तूं आत्तां धरला आहेस असाच कडेवर धर म्हणजे झालं ?

वीर०—हो खरंच बाई ! मी याला अशी धरते ह्मणजे झालं ! (जगदेवास) नाहीं तर द्यायचं होतं याला तिकडेच !—नको बाई नाहीं तर मी याला असा धरला ह्मणजे ही समशेर माझ्या मानेवरून घुसून याच्यावर पडेल. (मुलास घट्ट धरून) बाळ माझं तें ! असाच नीट नीज हां !

जग०—अथवा असं करण्यापेक्षां ही माझी आणि जयसिंहाची अशा दोन्ही समशेरी या देवतांच्याच हातांत दिल्या तर ?

वीर०—हो बाई, हें तर सगळ्यांत उत्तम !

जग०—(तरवारी देवींच्या हातीं देऊन) आह्मीं चौघेहि आपल्या आज्ञे प्रमाणं आपापले बळी द्यायला सादर आहों. तर कृपा करून आपल्या हातांनीं आमचे बळी घ्या !

देवी०—तरीहि हरकत नाहीं. (तरवारी घऊन) चला व्हा तयार !

वीर०—(देवीस सविनय) बरीक, माझ्यावर अगोदर हां.

देवी०—ओळीनं जसं येईल तसं.

वीर०—ह्मणजे ? तुह्मींच आशीर्वाद दिला आहेत ना मला "सौभाग्यवती भव" ह्मणून ! आणि मग आतां असं कां ह्मणतां ? मी वावगं का कांहीं ह्मणतें यांत !

जग०—ह्मणजे तुमचं हें पाह्यला तुमच्या मागं मी राहावं असं एकून तुझं ह्मणणं ? (देवीस) अगोदर माझ्यावर.

जय०—मी लहान आहे. माझ्याकडून करा आरंभ. ह्मणजे मला भय नाहीं वाटायचं कसलं !

जग०—अथवा असं कशाला ? आपण सगळेच असे देवतांच्या पुढें माना देऊन बसूं. ह्मणजे त्याच वाखतीळ

मग सगळ्यांच्या वर एकदम घाव—ह्मणजे झालं! (बसतात)

जग० वीर० व जय०—

पद. (निष्फळ भासे प्राण० या चा०)

सार्थचि होतिल प्राण। खरोखरी किती तरि प्रेम तुमचें ॥ धृ० ॥ रक्षुनि प्राणा नृपनाथाचे करितां लोकत्राण। उशीर कां मग? चरणिं दीन नत. अर्पितसों जरि मान ॥ बहु आनंदें बळी जातसों, राखा नृपवर प्राण ॥ १ ॥ वधा-वधा-वधा-वधाऽ—तरि, ॥ सार्थ० ॥

चला आटपा लौकर—

पद. (त्वरा करी चल जाऊं रणा० या चा०)

त्वरा करा हो त्वरा करा। रुधिर—प्रिय समशेर चालुं द्या। सज्ज आह्मी असु द्याया ॥ न फिरे—मुळिंही—निश्चय हाच खरा ॥ धृ० ॥

जग०—(धीरा) पैलथडी उतरूं। हृदिं यांस धरूं। मन घट्ट करूं। हरि, राम, स्मरूं। तरि खास तरूं ॥ त्वरा० ॥ १ ॥

वीर०—पैलथडी उतरा। परि बाळ धरा। हृदिं घट्ट जरा। मग राम स्मरा। आणि खास तरा ॥ त्वरा० ॥ २ ॥

तिघे०—हे देवतेनों,

शांतपणा न धरा। झणि कंठ चिरा। मनिं नच कचरा ॥ शिर मुक्त करा। पदिं घ्या रुधिरा ॥ त्वरा० ॥ ३ ॥

देवी०—(तरवारी टाकून देऊन)

पद.

तुह्मां हा शिव वर अह्मि देतों ॥ धृ० ॥ अचल गिरिसम राजभक्ती दृढता हितकरा, नरवरा करिलही कवच जणुं दुर्भेद्य जगिं हा ॥ तुह्मां० ॥ स्पष्ट या सुविमलता, अतिगंभिरा, शौर्या, वीर्या, धैर्या पाहुनी, तुष्ट मनिं, अति होउनी; सुमंगला देतों घ्या वरा; "पूर्ण आयु नृपमणी, विपुल संतति लाधुनी, पावुं सद्यश त्रिभुवनीं;" "राज्य तुह्मां प्राप्त होउनि फडको कीर्तीध्वज जगिं हा" ॥ तुह्मां० ॥

उठा उठा तर, जिवदान आहे तुह्मांला–

तिघ०–(विनम्रपणें उठून)

पद.

कितितरि सदय, करुण, शरणांगत शरणा ॥ धृ० ॥

धीर०–(आपल्याशीं) आतां पुढं गेलंच पाहिजे. कोण राजभक्ती आणि कोण आत्मयज्ञ हा! (पढे येऊन देवीस व नंतर जगदेवादिकांस साष्टांग नमस्कार करून) क्षमा असावी मला. जगदेवराय मला आपण ओळखलं नाहींसं दिसतं. मी धीरसिंह–

जग०–धीरसिंहजी, या अशा वेळीं अन् तुह्मी इथंसे?

वीर०–अगबाई, मला वाटतं महाराजांनीं गुप्त रीतीनं इकडच्या संरक्षणा कारतां ह्मणून पाठविलं असावं यांना.

धीर०–(आपल्याशीं) थोरांच्या मनाला नीच, क्षुद्र व दुष्ट विचार कधीं शिवत नाहीत, हेंच खरें! (उघड) तसं नव्हे, मी आज्ञा होऊनच आलों. आणि कां आलों तें क्षमा असेल तर सांगतों.

जग०–अहो, क्षमा कसची ?

धीर०–तें कांहीं नाहीं, क्षमा ह्मणाल तर सांगतों. खरोखर मी मोठा शरमिंदा आहे सांगायला !

जग०–क्षमा आहे क्षमा. सांगा तर पाहूं काय तें.

धीर०–हा नीच धीरसिंह–आपल्या सापत्न मातेचा भाऊ–तिच्या कानमंत्रानं व स्वहित साधण्याच्या दुष्ट हेतूनं आपल्याशीं स्पर्धा करून कांहीं घोर व भयंकर कृत्य करण्याचा हेतू धरून आपल्या मागोमाग इथवर आलों; पण तुमचं तुमच्या कुटुंबाचं आणि तुमच्या पुत्राचं हें धीरोदत्त आणि उदार वर्तन पाहून मी अगदीं थक्क होऊन गेलों. आणि अतां मला असं झालं आहे कीं, आपल्या चरणीं मस्तक लोळवून–आपली क्षमा मागून - मी एकदां केव्हां उत्तीर्ण होईन !

जग०–अहो, मनुष्याला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला ह्मणजे झालं; मग दुसऱ्यांनीं क्षमा करण्याचं सुद्धां कारण नाहीं.

धीर०–आपण ह्मणतां तेंहि खरं; पण मी तरी काय करूं ? माझ्या हातून राहवेनाच असं केल्याशिवाय. (देवीस) आपणहि मला क्षमा करून माझ्यावर आपला अनुग्रह असावा.

देवी०–ज्या अर्थी तुला खरोखर पश्चात्ताप झाला आहे त्या अर्थी तुला क्षमा आहे; कल्याण होईल तुझं. मात्र यापुढं जगदेवासारख्या सत्पुरुषांशीं नसता द्वेष मात्र करूं नकोस.

धीर०–आज्ञा प्रमाण. हें ह्यांनीं आपल्या उदार चरितानींच शिकविलें आहे मला. आणि हा योगहि देवीनींच

आणला ह्मणायचा! या पुण्यशील पुरुषाच्या पुण्याईनं आपल्या चरणांचें दर्शन झाल्यामुळं मी आपल्याला आज धन्य समजतों. (वंदन करितो.)

देवी०--कल्याण, कल्याण, ऊठ. (तिघेहि नमस्कार त्यांस करितात.) कल्याण, कल्याण, उठा.

तिघे०--

पद.

कितितरि सदय, करुण, शरणागत शरणा ॥ धृ० ॥ पात्र न असतां करुनी करुणा, सहजचि संहरुनी मरणा । पूर्णायुषि नृपमणिला केलें वारुनि सकलहि असुखगणा । अतिचिर वंदिति अभिमत जन ज्या, सविनय नमितों ह्या चरणां ॥ १ ॥

तिघे०--(देवीस) येतों तर. (देवी वरदहस्त मस्तकावर ठेवितात.)

देवी०--कल्याण! कल्याण!! कल्याण!!!

(जगदेव, वीरमति व धीरसिंह जयसिंहास उचलून खांद्यावर घेतो व सर्व जातात.)

राजा०--(ते गेले असें पाहून) माझ्या युक्तीची नामी चीज झाली. माझे पिढिजात सरदार जगदेवाचा मत्सर करितात ह्मणून माझ्या कानावर आलं. तेव्हां ह्मटलं आतां असं नाहीं उपयोगी. सगळ्यांचीच परीक्षा पहावी--पण आतां इथं उभं राहून नाहीं उपयोग. आपण आल्याचं ह्यांनासुद्धा कळून नाहीं उपयोग. (जातां जातां) कोण विलक्षण स्वामीभक्ती ही! हा वेष घेऊन--असा गुप्तपणें इथवर आलों ह्मणून हें नजरेस पडलें. महानं-

दाच्या भरांत मी पुढं होऊन जगदेवाला घट्ट आलिंगन देणार होतों, आणि जयसिंहाचं सहस्रशः चुंबन घेणार होतों. आणि तसंच वीरमतीच्या मस्तकाचं आघ्राणकरून तिला आशीर्वाद देणार होतों; पण त्या वेळीं माझ्या मनाला मी आवरून धरलं. उदईक दरबार भरवून, ह्या पिढी-जात सरदारांना खालीं माना घालायला लावून त्यांच्या देखतच काय तें करावं, हाच विचार.

(जातो.)

प्रवेश ७ वा.

स्थल-पट्टणची वेश-देवडी-वेशींत दोन्हीकडे दोन कंदील आहेत.

प्रवेश-(एकीकडे जगदेव व सुमति बोलत आहेत, दुसरीकडे जयसिंह व वीरमती व धीरसिंह बोलत आहेत.)

जग०-(सुमतीस) एकंदरींत मानदुर्गकरांनीं असा प्रकार केला तर ? उदयादित्य महाराजांना, मायजीनां, आईला, रणसिंहाला, झाडून साऱ्यांना शत्रूंनीं पकडून आणले आहे ह्मणतोस ? आणि त्या गिरिधरानं मोठमोठ्या नगरशेटांचीं नांवं सांगून हरामखोरपणा केलान्! ठीक आहे—

सुम०-सगळ्यांना कैद केलं असं पाहून मी मात्र थोडी युक्ती लढविली. मी शत्रूला फितूर आहे असा बहाणा करून महाराजांच्या तैनातीला-त्यांच्यावर पाळत राखण्याकरितां ह्मणून राहिलों. पट्टणच्या मुक्कामास आ-

त्यावर संधी साधून—आपली भेट घेऊन—मग काय तो पुढचा विचार करावा असं मनच्या मनांत ठरवून टाकलं. पुढं इथं आलों तों देवडीवरच मला मज्जाव झाला; आणि देवडीवरच मला अडकून ठेविलं. मोठ्या नम्रपणानं आपल्याबद्दल चौकशी करितां देवडीवाल्यानं आपण नगराबाहेर कांहीं राजकार्यानिमित्त गेल्याचं सांगून लवकरच परत याल ह्मणून सांगितलं. त्यावरून हा वेळपर्यंत मी इथं आपली वाट पहात होतों. तों आपण येतांच आपण माझी सुटका केलीत. तर आतां उशीर न करितां शत्रू अगदीं गाफील आहेत हीच संधी साधून त्यांच्यावर एकदम हल्ला करून आपल्या मंडळीस सोडवावं. याशिवाय दुसरा मार्ग नाहीं—

जग०—गाफील शत्रूवर हल्ला! छे: ही गोष्ट होणं नाहीं त्यांना सामन्याची अगोदर इशारत देऊन मग त्यांच्याशीं सामना ठोकूं.

सुम०—दुसरं कांहीं नाहीं—अशानं आपल्या मंडळीच्या जिवास कांहीं धोका होईल ह्मणून भय वाटतं!

जग०—हो तेंहि खरंच. अगोदर आपली मंडळी आपल्या हस्तगत करून घेऊं आणि मग त्यांच्याशीं सामना करूं. चला तर धीरसिंह; जयसिंह, तूं येतोस कां?

जय०—हो, मी येणार तर!

जग०—चला तर—तुझ्या गोशाळेवरून जाऊं. आणि तिथं संरक्षणास असलेल्या हत्यारबंद लोकांना घेऊन शत्रूवर चालून जाऊं. दोन स्वार यक्षीकडे पाठवूं त्यांना ही वर्दी द्यायला. (देवडीवाल्यास) तूं (वीरमतीकडे बोट करून) ह्या मंडळीना आमच्या वाड्यांत नेऊन पोंचीव.

वीर०—पण मी ह्मणतें—बरोबर असल्यावर मीही बरोबर आलें ह्मणून काय झालं?

जग०—समशेर गाजवायची आहे वाटतं? चला—आमची कांहीं ना नाहीं. हें घ्या हत्यार. पण माझ्या मनांतून तातानां वगैरे यावेळीं मुळीं ओळखच द्यायची नाहीं आहे. तर तूं घरींच जावंस हें मला बरं दिसतं.

वीर०—जशी आज्ञा.

जग०—(जयसिंहाकडे बोट करून) हा असूंदे बरोबर—(वीरमती जाते.) जा तूं. आह्मीं देखील येऊंच मागोमाग. सुमती, चल तूं आमच्या बरोबर पाहिजेस. पाहिलंत धीरसिंह—कोण हा इमानी सेवक! आह्मीं धार सोडून निघालों तेव्हां यानं आह्मीं 'नको' म्हणूं, ह्मणून आह्मांला नकळत—सुमार ७० मोहरा—ह्मणजे ह्यानं आपल्या साऱ्या जन्मांत संपादन केलेला खजीना—आमच्या सामानांत हळूंच घुसडून दिल्यान्. असो. कोण चमत्कारिक योगायोग हा आजचा! आजच्या प्रसंगांतून आह्मीं जगून आमच्या हातून आमच्या वडिलांची मुक्तता व्हावयाची होती—अथवा कोणी सांगावं या पुढं आणखी काय काय होईल तें! कांहीं होवो, चला धीरसिंहजी—

धीर०—चला जयसिंह.

जय०—थांबा, मला समशेर उपसूंदे—

पद. (आश्रीं सुरवर० या चा०)

खड्गा, संहरि चल रिपुशीं ॥ धृ० ॥ बहुत दिन तूं बंदिवासीं राहशी, नच प्राशिशी ॥ मत्त रिपुचा रक्त-बिंदू। वाट कां तरि पाहशी? ॥ १ ॥ रक्तपाना वांच्छिशी तरि चूर्ण करि

रणिं शत्रूशीं ॥ खचित वाटे क्षुधित असशी ।
गट्ट करि तरि शत्रुशा ॥ २ ॥

धीर०—येवढ्याच करितां थांबायचं वाटतं? (हंसून) एकून आपल्या समशेरीकडून शत्रुला गट्ट करून टाकविणार तर! चल बाबा—

(सर्व जातात.)

प्रवेश ८ वा.

स्थळः—मानदुर्गकरांचा सेनापती उतरलेला तंबू.

प्रवेश—(जगदेव, जयसिंह, धीरसिंह व हत्यारबंद लोक)

जग०—(लोकांस) अगदीं हलके या. मुळीं दिखील चाहूल नका होऊं देऊं. मी शीळ घातल्या बरोबर एकदम वेढा द्या. (धीरसिंहास) धीरसिंह, मी जगदेव आहे असं आमच्या वडिलांना कळवूं नका. मी इथल्या राजाच्या पदरचा एक सरदार आहे येवढच कळवा. समजल!

धीर०—ठीक आहे तसंच. [जयसिंह धीरसिंहा बरोबर उभा राहतो.]

जग०—(शीळ घालतो व सर्व हत्यारबंद लोकांसह एकदम जाऊन मानदुर्गकरांच्या सेनापतीस गराडा देतो) हरामखोर, चल ऊठ. या वेळीं कैदी आहेस तूं. हे तुझे राजकैदी असून यांना वाऱ्या पावसांत ठेवून तूं तबूत—चैनींत—पडतोस याची शरम वाटली पाहिजे तुला! धीरसिंह, कैद करा ह्याला. (जयसिंह आपल्या लोकांस नेऊन शत्रूस कैद करवितो, तें पाहून त्यास) जयसिंह, आपल्या लोकांना घेऊन तुम्ही आ-

णि धीरसिंह मिळून ह्या (उदयादित्य वगैरेकडे बोट दाखवून) कैद्यानां खुलं करा अगोदर.

उदया०–(जयसिंहास) तुह्मी कोण?

जय०–पट्टणच्या महाराजांच्या गोशाळेचा गोपाळ.

धीर०–आपली मुक्तता करण्या करितां महाराजांनीं या सरदारांना पाठिवलं व त्यांच्या बरोबर मलाही पाठिवलं.

उदया०–(जयसिंहाकडे पाहून धीरसिंहास) ह्या अशा वयांत–आणि अशा वेळीं ह्या छोट्या वीराला आणण्याचं प्रयोजन?

धीर०–ते ह्यांचे वडील. ह्या स्वारीनीं येण्याचा हट्ट धरल्यामुळं यांना आणणं भाग पडलं.

उद०–अस्सं!

चंपा०–(स्वगत) दृष्ट होईल बाई अशा वीरपुत्राला. अगबाई हे तर धीरसिंह! दादा, आह्मांला असं कैद करून आणल्याचं कळलं कसं तुह्माला?

धीर०–तें सारं मग सांगेन. (उदयादित्यास) महाराज, असं शरमण्याचं कारण नाहीं. हा प्रसंग आहे मनुष्यावर.

जय०–(सेनापतीस शृंखला घालवून शिपायांस) चला, खेंचा त्यांनां (गिरिधरासही धरतात.)

गिरि०–धीरसिंह, मी आपला गिरिधर आहे. हाच तो मानदुर्गकरांचा सेनापती. खेंचा याला.

रण०–(सेनापतीस) काय रे ए सेनापती, मी राजपुत्र रणसिंह असून आह्मांला कैद केलं होतंस काय? भोग आतां याचीं फळं. (लाथ मारतो) (गिरिधरास) शत्रूंच्या

स्वाधीन तूंच केलंस नाहीं का आम्हाला? (लाथ मारतो) कैद करा याला. चोर, हरामखोर आहे हा–

जग०–(रणसिंहास.)

पद (वाहवा थेर०या चा०)

छेः छेः अनुचित क्षत्रिय कुलजांना। ऐसें अव-
गणणें रिपुनां ॥ धृ० ॥ दुर्दैवानें रणसंग्रामीं,
अपजय ये शूरांनां। ह्मणुनी त्यांवरि प्रहार
करणें, युक्त न हें वीरांना। शस्त्र प्रहारहि बर
परि सह्य न दुर्वच-शल्यें अरिनां। मानधनांना
मरणाहि बरवें सहति न कधिं अवमाना ॥ १ ॥

उद०–रास्त आहे यांचं ह्मणणं. शत्रूशीं देखील किती उदार पणाचं वर्तन हें! पण ह्या नीच गिरिधराला नाहीं दाखऊन उपयोग असा उदारपणा.

सेना०–असल्या उदारधी पुरुषांना अपजय कसा येणार? असल्या पुरुषांच्या हातीं कैदेंत पडण्याला देखील पुण्याईच लागते.

जग०–(एकीकडे) धीरसिंह, कैद्यांना बक्षींच्याकडे पोंचवा. (हळूंच) आणि इतर मंडळींनां तुह्मीं आपल्या वाड्यांत घेऊन जा तुमचा आप्तपणा आहेच अशा वेळीं मी ओळख देणं बरं नव्हे.

गिरि०–(चंपावतीस) राणीसाहेब, मी तुमचा सेवक नव्हे का? माझ्याबद्दल तुम्ही तरी कांहीं रदबदली करा.

चंपा०–मेल्या, लाज नाहीं वाटत आमचा सेवक म्हणायला? शत्रूनां तूंच वाड्यांत आणलंस ना?

गिरि०–तुमची मुक्तता करण्या करितां तसं करावं लागलं मला–

सेना०–काय हरामखोर आहे हा!

उद०–अस्सं, मानदुर्गकरांच्या कडून सरदारी मिळवून मग सोडविणार होतास आह्मांला?

जग०–धीरसिंह–आपल्याकडं पट्टणहून मार्ग एकदां आला होता तोच हा गिरिधर! (आपल्याशीं) मी इथं पट्टणांत ज्यावेळेस आलों त्यावेळेस ह्याच हरामखोरानं "कोतवालाला ओ अदमी ओ बटीकका साथीदार है." असं सांगून मला मोठ्या धोक्यांत घातलं होतंन. (धीरसिंहास) माझ्या संबंधानं मायजीचे कान भरणाराहि हाच, समजलांत?

धीर०–जयसिंह, बघतां काय. कैद करवा त्या चोराला.

जय०–(शिपायांस) धरारे, घाला शृंखला घाला याला–

(शिपाई त्यास शृंखला घालतात.)

पद.

वीर बहाद्दर, चला चला, अरिसी घेउनिया
नगरांत ॥ धृ० ॥ प्रखर समर करूं, रिपुस
समरिं धरूं, विजय सहज वरूं, असत मनांत।
सुयश सहज वश, हतरिपु-यश कृश, असत
परि न मज, सुयश अशांत। क्षुधित असिस
नच, रिपुरुधिरहि लव; समर नच असिस
असूनि करांत। रिपु अवगणतिं जरि, अव-
रुनि मन धरूं, अतुल मिळवुं तरि, विजय जगांत॥ १

प्रवेश ९ वा.

स्थल—पट्टण येथील राजवाडा.

प्रवेश—(राजा सिद्धराज जैसिंग, इतर सरदार, धीरसिंह, उदयादित्यासह जगदेव व त्याचीं मुलें जयसिंह व रणसिंह, मानदुर्गकरांचा सेनापती, गिरिधर, सुमति व चिकाचे पडद्यांत राणीवशांतील मंडळी, वीरमती, चंपावती, वीरप्रसू वगैरे.

सिद्ध०—(बक्षीस) बक्षीसाहेब, मी सांगितल्या प्रमाणं राणीवसा, वीरमती व तिच्या सासरची मंडळी यांना चिकांत बशिवलं आहे ना ?

बक्षी०—होय महाराज.

सिद्ध०—हे कोण ?

बक्षी०—ते वीरकोट्याचे बीजसिंह, वीरमतीचे बंधू. उदयादित्यांची हकीगत ऐकून त्यांनीं मानदुर्गावर स्वारी करून त्यांना कैद करून आणलं आहे इथ.

सिद्ध०—बरे वेळेवरच आले ह्मणायचे !

धीर०—(महाराजांस) आणखी धारंचे उदयादित्य ते हेच. कालची रात्रीची हकीगत मी मघाच विदित केली आहे महाराजांना.

सिद्ध०—(स्वागत पूर्वक) उदयादित्य, असे या. तुमचा मान आमच्या बरोबरीचा आहे. तुह्मांला शरमण्याचं बिलकूल प्रयोजन नाहीं. (कांहीं कानाशीं कुजबुजतो)

उद०—असं !

सिद्ध०—भीरुसिंग, रात्रीं तुम्हीं गेलां होता त्याचं काय झाल ! लावलात का छडा ?

भीरु०—(हात जोडून) महाराज, फार भयंकर रात्र

कालची. पाऊस कोण, वारा काय, गारांचा मारा काय, आणि तें विजांचं काळीज फाडून टाकणारं कडकडणं, यांच्या तडाक्यांत जेव्हां तीं कोल्हीं सांपडलीं तेव्हां तीं अर्थातच रडूं आरडूं लागलीं. तोच तो रडण्याचा आवाज. आणि ही रडारड ऐकून भुतं खेतं समंध, हडळी, यांना मोठा हर्ष झाला आणि आपल्यास आयतीच मेजवानी मिळाली म्हणून त्यांनीं हंसून खिदळून अगदीं रंग चालविला. आणि हंसण्याचा जो आवाज ऐकूं येत होता तो तोच.

धीर०–चोर-हरामखोर–(क्रूरसिंह धीरसिंहाचा शेला ओढतो त्यास) चप्प बसा हो–

सिद्ध०–शाबास, छडा लावलात तर तुम्हीं एकून ! एकंदरींत ही कोल्हेकुई तर सारी एकून ! हो पण क्रूरसिंहानां विचारूं. कस काय क्रूरसिंह, तुम्हीं काय पाहिलंत ?

क्रूर०–धीरुसिंगानीं सांगितलंयापेक्षां आणखी एक जास्त मी पाहिलं. कोणी एक गांवचा बायकापोरांसह गाडींत बसून जात असतां पावसाच्या सपाट्यांत-वीज अंगावर पडून मेला अन् त्याचीं बायका पोरं रडूं लागलीं–कोल्हींहि रडत होतींच–तेव्हां वेताळ आणि त्याचा भूतगण धीरुसिंगानीं सांगितल्याप्रमाणं हंसूं खिदळूं लागला.

सिद्ध०–ओ हो हो हो ! शाबास, फार मोठी कामगिरी बजावलीत तुम्हीं ! बक्षीसाहेब, यांना ह्या कामगिरीबद्दल जास्त तनखा सुरू केला पाहिजे यानां. मला याचं स्मरण करायला विसरूं नका. समजलं ?

बक्षी०–आज्ञा–

सिद्ध०–जगदेवराय, तुम्ही गेलां होतां काय शोधाला ?

तुमच्या पाहण्यांतही हा असाच प्रकार आला कीं काय ?

भीरु०–हे जगदेवराय पाहायाला जातात! आम्हांला दोघांनां तर नाहीं कुठं भेटले हे!

क्रूर०–एवढ्या एका निमित्त्यानं घरीं जाऊन छान डारढूर घोरत पडायला सांपडलं असेल यांना.

भीरु०–हे शोधाला जाणार! हें वाटतं तरी कसं खरं महाराजानां ?

सिद्ध०–काय हो, गेलां होतां कां तुह्मी ? अथवा न जाऊन–त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलंच आहे–यांच्याच प्रमाणं सांगा ह्मणजे झालं! तुह्मांला खोटं कोण ठरिवणार ?

जग०–छेः महाराज, माझ्या पाहण्यांत कांहीं वेगळाच प्रकार आला.

सिद्ध०–तो काय ?

जग०–त्या कोणी देवता होत्या. आणि त्यांपैकीं कांहीं रडत होत्या आणि कांहीं हंसत होत्या.

भीरु०–(हंसून एकमेकांच्या हातावर टाळी देतात.) स्वप्न बरं हें स्वप्न!

सिद्ध०–(जगदेवास) तें कां बरं ?

जग०–महाराज, माफी असावी. तें कां तें मला सांगतां येत नाहीं.

सिद्ध०–सांगतां येत नाहीं! तं कां ? जसं येईल तसं सांगा.

जग०–क्षमा असावी. याबद्दल महाराजांनीं मला जास्त आग्रह करूं नये.

क्रूर०–त्याला जर कांहीं ठाऊकच नाहीं तर सांगणार काय तो आपलं कपाळ!

धीर०–महाराज, मला ठाऊक आहे सारं.

भीरु०–(त्यास) अगदीं आमच्या प्रमाणं सांगा हां.

धीर०–चप् बसा–माझा शेला कां ओढतां ? (राजास) महाराजांची आज्ञा होईल तर मी सांगतों सगळं. कारण या दोघां सरदारांशीं खलबत करून, मी एकटा हत्यारबंद होऊन–यांच्या सल्यानं–दुष्टबुद्धी धरून–जगदेवरायांच्या मागोमाग त्यांचा खून करण्या करितां ह्मणून गेलों. पण जगदेवाची, त्यांच्या कुटुंबाची व ह्या छोट्या जयसिंहाची स्वामीभक्ती पाहून मला पश्चात्ताप होऊन मी शुद्धीवर आलों आणि–

सिद्ध०–(त्यास) बस्स पुरे करा. त्या वेळीं जगदेवावर जर तुमची तरवार चालती तर मी तित्थं तुह्मांला ठार केलं असतं! अव्वल पासून अखेर पर्यंत मी जगदेवाचे मागं होतों. जगदेव, वीरमती आणि जयसिंह यांसह जेव्हां आपल्या घरून स्मशानास जायला निघाला तेव्हां त्यांच्या मागं तुह्मांला "लठ्ठंभारती अडदांड देवडीवाला" जो दिसला तो मी होतों. काळा पोषाख करून मुद्दाम गेलों होतों मी. (भीरुसिंग व क्रूरसिंह लाजतात) (सिंहासनावरून उठून जगदेवास आपल्या अर्ध सिंहासनावर बसायास सांगतो व जयसिंहास आपल्या मांडीवर घेतो.)

जग०–महाराज, इतक्या मानास पात्र नाहीं हा!

राजा०–याहि पेक्षां जास्त मानास पात्र आहांत तुम्हीं. पण यांत आश्चर्य करण्यासारखं कांहीं नाहीं. धीरसिंहानीं मी आणि आणखी कांहीं जणांना पाहिला तसा कालच्या रात्रीचा प्रकार तुम्हीं पाहिला असतां म्हणजे तुम्हींही असेच आश्चर्यानं थक्क होऊन गेला असतां! ह्या वेळेस आज मी

इथं आहे—नाहींतर—(हंसून) असंच नाहो बक्षीसाहेब? कीं—

पद. (मांड—जोगी धुमाळी.)

हीच वेळ मम मृत्यूची निःसंशय ठरली होती ॥ धृ० ॥ त्या दिल्लिपुरीच्या देवी कालपाश घेउनि हातीं। मत्कठिं टाकण्या येती मत्कठिं टाकण्या येती ॥ चाल ॥ परि त्यांस जगदेवानीं। स्वप्राणा तृणसम गणुनी ॥ अर्पण्या सिद्ध होवोनी। वांचविलें मज निज हातीं ॥ चाल ॥ स्वामिभक्त सेवक मिळती। त्यांना मुळिं नच जगिं भीती ॥ १ ॥

आणखी यांची स्त्री आणि मुलं देखील यांना अनुरूप अशींच आहेत, कारण मी वाचावं म्हणून त्या देवीनां—कुलशीलानं माझ्याच तोलाच्या राजकुलांतले बळी पाहिजे होते म्हणून—

पद. (चाल—सदर.)

वीरमती ह्यांची वनिता। जयसिंहहि बालक असतां। सिद्ध प्राण अर्पण करण्या। नवलची हें मजला, बघतां ॥ चाल। खड्गांस देविच्या हातीं। देउनिया निश्चल चित्तीं। निजकंठा लववुनि पुढती। “ झणिं तोडा तोडा ” ह्मणती ॥ चाल ॥ ऐसे ज्या सेवक मिळती। त्यांना कशि वरि अपकीर्ती! ॥ २ ॥

जगदेवाची राजभक्ती पाहून (हंसून) आमच्या बक्षीसाहेबांच्या देवांनीं प्रसन्न होऊन मला पूर्णायुषी केलं. आणि माझा आजचा अपमृत्यु टळला. कारण अराजानिष्ट

सरदारांचं सान्निध्य ह्मणजे अपमृत्यूच ! असे राजनिष्ठ पुरुष माझ्या पदरीं असतां हे निमकहराम, ऐदी, पिढीजात व मत्सरी सरदार–"राजा मरो कीं राणी मरो" ह्मणून, आलेल्या संकटाचा–मग तें काल्पनिक कां असेना–प्रतिकार न करितां जगदेवाचा नाहक मत्सर करितात. (उदयादित्यास) उदयादित्य, तुमच्या पदरींही असेच सरदार आहेत कीं काय? काय हो, मानदुर्गकर तुमच्या दरबारींही असेच सरदार आहेत? कसं काय भीरुसिंग, भुतं खेतं रडत होतीं काय? कां क्रूरसिंह, कोल्हेकुई ना सारी! अथवा या द्दोन पायाच्या कोल्ह्यांची ही काल्हेकुईच ! असे बेइमानी, हरामखोर आणि मत्सरी सरदार ज्या राजाजवळ असतात, त्यांचं राज्य रसातळास पोंचायला फार काळ नको. आणि एवढ्याच करितां असल्या ह्या बेइमानी सरदारांना मी आपल्या राज्यांतून ह्यावेळीं हद्दपार करतों! चला, चालते व्हा यावेळीं इथून–

भीरु० व क्रू०–(नम्रपणें) महाराज, मत्सरामुळं अंध होऊन आह्मी हें केलं. याबद्दल क्षमा असावी-कृत कर्माचा पश्चात्ताप होतो आहे आम्हांला–तर क्षमा असावी.

जग०–त्यांना खरोखर पश्चात्ताप झालेला दिसतो, तर महाराजांनीं क्षमा करावी त्यांना एक वेळ.

सिद्ध०–जगदेव, तुम्ही फार उदार अंतःकरणाचे आहांत. हे प्रत्यक्ष तुमच्या प्राणावर उठले असून ह्यांना तुम्हीं क्षमा करायला सांगता?–(सरदारांस) उठा, क्षमा आहे तुम्हांला. उदयादित्य, असा पुत्र तुम्हांला लाधला म्हणून मी तुम्हांला फार धन्य समजतों. मीही ह्यांना आपले पुत्र समजूनच आजपासून माझं अर्धं राज्य ह्यांना देतों.

वीरमतीला चोळी बांगडीकरितां हें पट्टणपूर आणि जयसिंहाला गाईचं पालन करण्याकरितां पट्टणची ही पचक्रोशी देतों. आणि आम्हीं आजपासून जयपट्टण ही आमची राजधानी करणार. (सिंहासनावरून उठून) चला, जगदेवराय ह्या समशेरीला आणि कच्यारीला प्रणाम करून चढा सिंहासनावर—हात्र मुहूर्त उत्तम आहे. घोटाळूं नका असे.

जग०–(कच्यारीस नमन करून महाराजांसही नमन करितो) महाराजांनीं आपला पुत्र म्हणविल्यावर मोझा नाइलाज आहे. पण मला मातोश्रीला आणि वडिलांना प्रणाम करून त्यांची आज्ञा घेतली पाहिजे अगोदर.

सिद्ध०-ठीक आहे, या त्यांना प्रणाम करून. (जगदेव चिमाच पडद्याकडे जतो व सर्वत्रांस नमस्कार करतो.)

चंपा०–जगदेव, तुझ्याशीं बोलायला मला मोठं अवघड वाटतं. त्या मेल्या गिरिधराच्या सांगीनं, आणि वेडसर हांवभरीनं मी तुझा, तुझ्या बायकोचा आणि तुझ्या आईचा व्यर्थ छळवाद केला. त्या बद्दल जर तूं मला क्षमा-

जग०–छे: छे: छे: छे: मायजी, मी लेकर नं कसली क्षमा करायची? तें सगळं केव्हांच विसरलों आहे मी. (एकीकडे) हिला पश्चात्ताप झाला एवढं बरं झालं !

चंपा०–वीरसिंहानीं तुमच्या संबंधाची सारी हकीकत सांगितली आहे आह्मांला. माझ्या पायीं–

जग०–छत् मनांत मुद्धां आणूं नका त्यांतलं कांहीं. (सर्वांस) बरं मग आपली सर्वांची आज्ञा आहेका मला महाराजांची आज्ञा ऐकण्याची? (सर्व रुकार देतात.)

चंपा०–मग धारेत कोण राज्य करील?

जग०–रणसिंह आहे कीं–

चंपा०–जगदेव, असं नको बोलूंस; अशानं मला जास्त दुःख होतं. तो अर्धवट वेडा पिसा आहे तो; तो काय राज्य चालिवणार तें उघडच दिसतंय!

जग०–तसं जरी असलं तरी राज्यकारभाराची सर्व व्यवस्था चांगल्या लोकांच्याकडून मी लावीन. मग तर झालं ना?

चंपा०–मग नाहीं हरकत माझ्याकडून. आणि तिकडूनही नाहीं मग कांहीं व्हायची. मात्र–

[जगदेव श्रीजसिंगास भेटतो व उदयादित्यास प्रणाम करून कठ्यारीस व समशेरीस प्रणाम करून सिंहासनावर चढतो. वाद्य गजर होतो.]

श्रीज०–अशा आनंदाच्या समयीं मीहि या राणाजगदेवानां हे राजे मानसिंग मानदुर्गकर यांचं राज्य अर्पण करितों.

जग०–श्रीजसिंग, मानसिंगांना आणि त्यांच्या सेनापतीनां खुलं करा.

पद. (चाल–झंपा.)

मुक्त ह्यातें करा पोंचवा ह्या क्षणीं ॥ रक्षका देउनी मानदुर्गा ॥ ह्यानि अवमानिलें मत्पित्या ह्मणुनिया क्रुद्ध उद्दंड ती चंडि दुर्गा ॥ १ ॥
जा झणी सज्ज व्हा संगरातें ॥ दंड हा युक्त ह्या अधमतेतें ॥ धृ० ॥ सूड घ्यायासि हें खड्ग मम स्फुरतसे । रंवरंवातें कर तसे; ज्वलित अग्नी ॥ २ ॥

जयसिंह०–आणि मीही पण प्रतिज्ञा करितों कीं–

गांडुनी समरिं या घोरतर झुंझुनी। लोळविन अरिशिरां तात चरणीं ॥ २ ॥

जगदेव व जयसिंह०–

जा म्हणी, सज्ज व्हा संगरातें ॥ हीच शिक्षा अशा अधमतेतें ॥ धृ० ॥

मान० व सेना०–(नम्रपणें वंदन करून)

पद.

सदया, शरण तुम्हां अम्हि आलों। अभिनव ऐशा उदार चरिता पाहुनि हतमद झालों ॥ धृ० ॥ वर चरणावरि लोळवुं शीर्षा, स्वांतरिं दंगुनि गेलों ॥ १ ॥

हे वीरपुत्रा जयसिंहा–

मत्कंठा या खड्गें तोडा, लीन पदांबुजिं झालों ॥ २ ॥ अथवा शरणा, रिपुवरि योजुनि मारि, गणूं तरि तरलों ॥ सद० ॥ ३ ॥

जग०–ऊठा ऊठा, क्षमा आहे तुम्हांला. तातांची आणि सिद्धराज जैसिंगांची क्षमा मागा. (ते त्यांची क्षमा मागतात.)

सिद्ध० व उद०–क्षमा आहे तुम्हांला–उठा.

रण०–(मानसिंगास) अशी पहिल्यानेंच क्षमा मागताम तर! (सेनापतीस) कां सेनापतीसाहेब, त्यावेळीं "मला धरा" म्हणून सांगत होतां नाहीं आपल्या शिपायांना? आतां कां आलांत असे नरम? मी राजपुत्र–राजबंधू–राजकुलालंकार असून आमची तुम्ही अप्रतिष्ठा केलीत, त्याचं फळ हें!

सेना०-क्षमा असावी महाराज.

रण०—जा तर पळा इथून झटपट. हा राजपुत्र क्षमा करतो आहे तुम्हांला. सुमति, तो बघ लुच्चा गिरिधर. तोंड पहा कसा लपवितोय आतां. यानेंच आम्हांला शत्रूच्या जाळ्यांत अडकविलंन. त्याला धरून माझ्या चाबकाखालीं मार द्या. बाळ, जयसिंह ' हा रणवीर ' तुझा काका रणसिंह. ये पाहूं तर इकडं माझ्याकडं. तूं मारशील कां चाबकाखालीं या चोराला? आणि तसंच त्या मानदुर्गकरांना आणि त्यांच्या त्या सेनापतीला?

जय०—छेः छेः—

पद. (प्रिय निज तनहुनि० या चा०)

हतबल रिपुवरि सदयित सुवीर ॥ वरितिल,
तरि जगिं गणतील "सुधीर" ॥ अवगणा
न तरि तिळभरि अरिकुल, हे रणवीर ! ॥ १ ॥

सिद्ध० मान० व इतर सर०--[आश्चर्यानें]

पद.

हें कोमल बालक अमुनी । पहा किती दिलदार ॥ धृ० ॥ हतबल रिपु जरि परी तयावरि । असत अमोघ उदार ॥ १ ॥ सुदीप्त क्षत्रिय वीर्यचि चमके । नच अनुदार विचार ॥ २ ॥ वीरपुत्र ज्या लाधति त्यांना । जगीं सुखचि अपार ॥ ३ ॥ भो जगदीशा, निर्मी भूवरि । वीर असेच उदार ॥ ४ ॥

पद. (प्रिये पहा. या चा०)

सर्व०-प्रभो पहा, दास-वृंद चरण-कमलिं विनटतसे ॥ धृ० ॥

सिद्ध० व इतर सर०—

निर्मि प्रभो शूर वीर । जगदेवा सम सुधीर ॥ राजनिष्ठ, चतुर वीर, । तनयहि जयसिंहसे ॥ १ ॥ वीरमती सम युवती । पतिरत अति धीर कृती ॥ भुवनत्रायिं कीर्तिमती । सकल अवनि तारितसे ॥ २ ॥

जगदेव वीरमति व जयसिंह०—

दक्ष प्रजा–रंजनि अति । गुणवेत्ते चतुर सुमति जगतिं सतत सुकृति करिति । निर्मि प्रभो, नृप असे ॥ ३ ॥

सर्व०—कुमति सकल ने विलया । पापमती जाउं लयां ॥ सुमति आह्मां दे सदया । हेचि प्रभो विनति असे ॥ ४ ॥

समाप्त.

ईश प्रार्थना.

पद्य. (या वर गुरुवर इ० या चा०)

हे सुरपतिवर । अघहर रघुविर ।
कवि विनवि नमुनि चरणरजातें ।
कवनिं सुमति दे । कवि जरि लघु मति ।
स्मरणिं तव सतत । करि मन रत हें ॥ १ ॥

कुसुम-मृदुल मन । कमलनयन ।
सुमुकुलित वदन । फिरवुनि सुहासा ।
कविस अभय करि । वर कर शिरिं धरि ।
ज्यांहि होय काव्यांत सुगति हे ॥ २ ॥

वाल्मिकि वर कवि । तव कवनिं सुकवि ।
होत सहज जगिं । दीन दयाळा ।
दशरथ--नंदन, शतमुख--कंदन ।
अघवन निवटुन । भवनदि उतरुन ।
मति तरल हरुन । चरणिं विनटवुन ।
स्वपदरजें । उद्धरि जन हे ॥ ३ ॥

उमजुनि निजमनिं निज-नृप आर्यें ।
शौर्यें । वीर्यें । निरुपम धैर्यें । उरकुनि
चातुर्यें । निज-नृप अभिमत कार्यें ॥
प्रकटिलि जरि जगिं नय विनयें ॥
त्या रघुपद लभताहे ॥ ४ ॥